CMYK



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

आसमंतसह

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | रविवार, ९ मार्च २०२५। युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक १२१ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

महत्त्वाचे


## आज ठरणार चॅम्पियन




**दुबई** : रविवारी दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर भारत आणि न्यूझीलंड यांच्यात आयसीसी चॅम्पियन्स चषकाचा अंतिम सामना खेळला जाणार आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील अपराजित संघ तिसऱ्यांदा जेतेपद पटकावण्याच्या दिशेने लक्ष केंद्रित करेल, तर २००० मध्ये स्पर्धा जिंकल्यानंतर मिचेल सॅण्टनरच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंड संघ दुसऱ्यांदा चॅम्पियन्स चषकाचे विजेतेपद मिळवण्याच्या प्रयत्नात असेल. भारत आठ संघांच्या या स्पर्धेत एक प्रभावी संघ म्हणून पुढे आला आहे. भारताने सलग चार विजयांसह विजयाची गती वाढवली असून, यात उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियावर ४ गड्यांनी विजय मिळवला आहे. न्यूझीलंडने उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेचा ५० धावांनी पराभव करून भारताविरुद्धच्या अंतिम फेरीच्या सामन्यात आपले स्थान निश्चित केले.

# महिलांचा आदर हेच विकसित भारताच्या दिशेने पहिले पाऊल

## जागतिक महिला दिनी लखपती दीदींना मोदींची ४५० कोटींची भेट



**नवसारी, ८ मार्च**
मला कोट्यवधी माता, बहिणींचे आशीर्वाद लाभल्याने मी स्वतःला जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती समजतो. आई आणि बहिणींचे आशीर्वाद ही माझी सर्वांत मोठी ताकद व सर्वांत मोठे संरक्षक कवच आहे. महिलांचा आदर करणे हेच विकसित भारताच्या दिशेने पहिले पाऊल असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त गुजरातमधील नवसारी येथे लखपती दीदींशी संवाद साधल्यानंतर मोदींनी येथून जवळच असलेल्या वंसी बोरसी गावात 'गुजरात यशस्वी' आणि 'गुजरात मैत्री' या दोन योजनांचा शुभारंभ करताना २५ हजारांवर महिला बचत गटांमधील २.५ लाख महिलांना ४५० कोटी रुपयांचे वाटप केले. कार्यक्रमाला संबोधित करताना मोदी म्हणाले, देशाच्या आर्थिक विकासात महिलांचे योगदान अतुलनीय आहे. पंतप्रधान आवास योजनेतून लाखो घरे आणि शौचालये देऊन आमच्या सरकारने महिलांचा आदर केला. महिलांनी बँक खाती उघडून त्यांना सक्षम बनवले. उज्ज्वल योजनेंतर्गत त्यांना गॅस सिलेंडर दिले आणि आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

### तीन कोटी महिलांना मिळाले हक्काचे घर

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज जगात सर्वांत जास्त महिला वैमानिक आपल्या देशात आहे. हे पाहून आपल्या सर्वांना अभिमान वाटतो. हे महिला सक्षमीकरणाचे एक उदाहरण आहे. राजकारण, क्रीडा, न्यायव्यवस्था किंवा पोलिस देशाच्या प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक आयामात महिलांचा झेंडा उंच फडकत आहे. २०१४ पासून सुमारे ३ कोटी महिला गृहिणींना हक्काचे घर मिळाले. आज जल जीवन मिशनच्या माध्यमातून देशातील प्रत्येक गावात पाणी पोहोचत आहे. गांधीजी म्हणायचे की, देशाचा आत्मा ग्रामीण भारतात राहतो. आज मी त्यात आणखी एक ओळ जोडतो, ग्रामीण भारताचा आत्मा ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणात आहे.

पूर्वी महिलांना १२ आठवड्यांची प्रसूती रजा मिळत होती, पण आम्ही ती वाढवून २६ आठवडे केली. तिहेरी तलाक आणि कलम ३७० वर भाष्य करताना मोदी म्हणाले, मुस्लिम महिलांनी संरक्षणाची मागणी केली होती, त्यामुळे तिहेरी तलाक कायदा आणला. जेव्हा काश्मीरमध्ये कलम ३७० लागू होते, तेव्हा तेथील महिलांना अनेक अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले होते, आमच्या सरकारने हे कलम हटवल्यानंतर तेथील महिलांना देशातील इतर महिलांप्रमाणे समान अधिकार आहेत. (वृत्तसंस्था)

# बार्शीतील संघवी बायोटेक कंपनीला भीषण आग; ६० लाखांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि मार्च**

औद्योगिक वसाहत क्र. ३, गाताचीवाडी येथे असलेल्या संघवी बायोटेक या शेती औषध व रसायने उत्पादन करणाऱ्या कंपनीला गुरुवारी रात्री अचानक आग लागली. या आगीमुळे कंपनीचे साठ लाखांचे नुकसान झाले.

कंपनीचे मालक विनय मनोहरलाल संघवी यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास कंपनी बंद करण्यात आली. त्यानंतर काही वेळातच शेजारील कंपनीत काम करणाऱ्या आनंद वाघमारे यांनी फोन करत कंपनीला आग लागल्याची माहिती दिली. संघवी यांनी त्वरित घटनास्थळी धाव घेत अग्निशामन विभागाने त्वरित घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न सुरु केले. सुमारे दोन तासांच्या प्रयत्नानंतर ही आग आटोक्यात आली. तोपर्यंत



संपूर्ण कंपनी सर्व सामान जळून खाक झाले होते. या नुकसानीची पाहणी केल्यानंतर यामध्ये लोखंडी शेड, यंत्रसामग्री, कच्चा माल, तयार माल, प्रक्रिया चालू असलेला माल तसेच पॅकिंग साहित्य संपूर्णतः जळून गेले आहे. प्राथमिक अंदाजानुसार ६० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. ही आग कशामुळे लागली याबाबत चौकशी सुरु आहे.

# योजनांवरील खर्चाचा प्रभाव भांडवली गुंतवणुकीवर पडणार नाही

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन

**मुंबई, ८ मार्च**
निवडणुकी पूर्वीजाहीर केलेल्या 'लाडकी बहीण'सारख्या योजनांवर ६० हजार कोटी रुपयांचा खर्च होत आहे. त्याचा प्रभाव भांडवली गुंतवणुकीवर पडणार नाही, हे सुनिश्चित केले जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

शाश्वत व्यवसायांसाठी संसाधने एकत्रित करण्यास मदत करून लाभार्थी महिलांना दिले जाणारे पैसे उत्पादक उद्देशांसाठी वापरण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे फडणवीस यांनी सोमवारी सादर केल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पापूर्वी सांगितले.

ज्यावेळी तुम्ही अशा प्रकारच्या खार्चिक योजना राबवता, त्यावेळी त्याचा अर्थसंकल्पावर ताण येतो, हे खरे आहे. पण, आम्ही ते व्यवस्थापित करण्यास सक्षम आहोत आणि त्याचा परिणाम आमच्या भांडवली गुंतवणुकीवर होऊ न देण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे त्यांनी एका कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितले.

भांडवली गुंतवणुकीत कपात न करता आम्ही संतुलित अर्थसंकल्प देण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. हे लक्षात घेतले पाहिजे की, महायुती सरकारला सत्ता टिकवून ठेवण्यात यश मिळवून देणाऱ्या घटकांपैकी एक म्हणून या सवलतींना मोठ्या प्रमाणात श्रेय दिले जाते. परंतु, अशा देयकांच्या आर्थिक परिणामाबाबतही चिंता व्यक्त केली गेली आहे.

आपले सरकार याकडे एक सामाजिक गुंतवणूक म्हणून पाहते. महिला गटांद्वारे पैसे वळवल्याचे एक उदाहरण देत त्याची पुनरावृत्ती करण्याची गरज असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# आता कन्फर्म तिकीट असलेल्यांनाच फलाटावर प्रवेश

### रेल्वेचा निर्णय ६० स्थानकांवर होणार अंमलबजावणी

**नवी दिल्ली, ८ मार्च**
भारतीय रेल्वेने फलाटांवरील नियमांत बदल केले आहेत. ज्या प्रवाशांचे तिकीट कन्फर्म झाले आहे, त्यांनाच आता फलाटावर प्रवेश दिला जाणार आहे. देशभरातील ६० प्रमुख रेल्वे स्थानकांवर हा नवीन नियम लागू केला जाईल. या नियमाची लवकरच अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे रेल्वेने म्हटले आहे.

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. जास्त प्रवाशी असलेल्या स्थानकांवर गर्दी व्यवस्थापनासाठी कार्यक्षम उपाययोजना केल्या पाहिजे, यावर बैठकीत सहमती झाली. या नवीन धोरणाचे उद्दिष्ट गर्दीच्या हंगामात फलाटांवरील गर्दी नियंत्रणात आणणे हा आहे. विशेषतः सुट्या आणि सणांच्या काळात भारतीय रेल्वे स्थानकांवर गर्दी असते. बरेच लोक त्यांच्या नातेवाईकांना सोडण्यासाठी किंवा घेण्यासाठी रेल्वे स्थानकांवर येत असल्याने गर्दी वाढते. त्यामुळे रेल्वे स्थानकावरील गर्दी रोखण्यासाठी आणि प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी मोठ्या शहरांमधील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांवर लवकरच हे धोरण लागू केले होईल. या नवीन नियमांमुळे अनपेक्षित गर्दी टाळता येईल आणि प्रवास सुरळीत होईल, असे मंत्रालयाने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### 'या' शहरांचा समावेश

नवी दिल्ली रेल्वे स्थानक
छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस
हावडा जंक्शन
चेन्नई सेंट्रल
बंगळुरू सिटी स्थानक



## मणिपुरात पुन्हा हिंसाचार; एक ठार

**इम्फाळ** : मणिपूरच्या कांगपोक्पी जिल्ह्यातील विविध भागांत शनिवारी कुकी निदर्शक आणि सुरक्षा दलांत झालेल्या हिंसाचारात एक निदर्शक ठार झाला, तर महिलांसह २५ जण जखमी झाले, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.

लालगौथांग सिंगसिट असे ठार झालेल्या निदर्शकाचे नाव आहे.

## सीरियात संघर्ष, २०० जणांचा मृत्यू

दमास्कस : सीरियाच्या नवीन सरकार समर्थित लढाऊ सैनिकांनी गुरुवार आणि शुक्रवारी अनेक गावांवर हल्ला केला, ज्यात मोठ्या संख्येने लोक मारले गेले. ब्रिटिश मानवाधिकार संघटना 'सीरियन ऑब्झर्व्हेटरी फॉर ह्यूमन राईट्स' ने ही माहिती दिली.

मानवाधिकार संघटनेच्या मते, हे हल्ले पदच्युत राष्ट्राध्यक्ष बशर अल-असद यांच्या समर्थकांनी सरकारी सुरक्षा दलांवर केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून करण्यात आले. गावांवर हल्ले गुरुवारी सुरू झाले आणि शुक्रवारीही सुरू राहिले. एका मानवाधिकार गटाच्या मते, गुरुवारी जबलेह या किनारी शहराजवळ सरकारी दलांनी एका वॉन्टेड व्यक्तीला ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता पुन्हा संघर्ष सुरू झाला. मानवाधिकार संघटनांच्या मते, दोन दिवसांत झालेल्या संघर्षात २०० हून अधिक लोक मारले गेले आहेत. हल्ल्यात ठार झालेल्या अंदाजे १४० लोकांव्यतिरिक्त मृतांमध्ये सीरियन सरकारी दलांचे किमान ५० सदस्य आणि असदशी जुळलेल्या ४५ लोकांचा समावेश आहे.

## भारताची शुल्क कपातीसाठी सहमती : ट्रम्प

**वॉशिंग्टन, ८ मार्च**
आयात शुल्कावरून सुरू असलेल्या व्यापारयुद्धादरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठा दावा केला आहे.

अमेरिकेतून निर्यात वस्तूंवर भारताने शुल्क कमी करण्यास सहमती दर्शविली असल्याची माहिती ट्रम्प यांनी दिली. दुसरीकडे त्यांनी रशियाला झटका दिला. आता अमेरिका रशियावर शुल्क लागू करेल, अशी घोषणा त्यांनी केली. सर्वाधिक शुल्क आकारणाऱ्या देशांवरही त्यांनी जोरदार टीकास्त्र सोडले. भारत आमच्याकडून मोठ्या प्रमाणात शुल्क आकारतो. तुम्ही भारतात काहीही विकू शकत नाही. तेथे काही निर्बंध आहेत. त्यांनी आता त्यांचे शुल्क खूपच कमी करण्यास सहमती दर्शविली आहे, असे त्यांनी सांगितले.

## पुण्यात भररस्त्यात BMW गाडी उभी करून मद्यधुंद तरुणाची लघुशंका

**पुणे, दि. ८ मार्च**
पुण्यात मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवून अपघात होण्याचे प्रकार अनेकदा घडले आहेत. गेल्यावर्षी कल्याणीनगर भागात एका अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत आलिशान पोर्श कार बेदरकारपणे चालवत दुचाकीला धडक दिली होती. यात दोन जणांचा मृत्यू झाला होता. यानंतर आता आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. आलिशान बीएमडब्लू गाडी रस्त्याच्या मधोमध थांबवून मद्यधुंद अवस्थेत असलेल्या तरुणाने रस्त्यातच लघुशंका केली. यानंतर स्थानिकांनी जेव्हा या युवकाला हटकले, तेव्हा युवकाने अश्लील हावभाव करून दाखवले. या घटनेचा व्हिडीओ स्थानिकांनी काढला असून तो आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

पुणे नगर मार्गावर असलेल्या शास्त्रीनगर चौकात सदर संतापजनक घटना घडली आहे. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये सिग्नलवर निळ्या रंगाची एक आलिशान बीएमडब्लू गाडी उभी असल्याचे दिसते. तर गाडीच्या शेजारीच तरुण लघुशंका करत आहे. व्हिडीओ काढणाऱ्यांनी जेव्हा तरुणाला याबाबत जाब विचारला तेव्हा सदर तरुणाने



अश्लिल हावभाव करून दाखवले. तसेच यावेळी गाडीत आणखी एक तरुण बसलेला दिसत आहे. ज्याच्या हातात दारूची बाटली दिसत असून तो व्हिडीओ काढा असे सांगत आहे. स्थानिकांनी वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले की, मद्यधुंद तरुणांना हटकल्यानंतर त्यांनी अश्लील हावभाव करून दाखवले आणि गाडी वाघोलीच्या दिशेने वेगाने पळवली.






## महिला दिन उत्साहात

# ‘ती’च्या सन्मानासाठी राबल्या शहरातील विविध संघटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ मार्च-**

**शहरातील विविध शाळा, महाविद्यालय, संस्थांच्या वतीने महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यात आला. महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या दिवशी विविध संस्थांच्या वतीने महिलांसाठी सवलतीच्या दरात सेवा देण्यात आली.**




## जिजामाता प्राथमिक शाळा

जिजामाता प्राथमिक शाळा तुळशीदासनगर कोंडी येथे जागतिक महिला दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचे बक्षीस वितरण गटशिक्षणाधिकारी सिध्देश्वर निंबर्गी, विस्तार अधिकारी बापूसाहेब जमादार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अपर्णा चव्हाण होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलू, कोंडी ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया भोसले, सुनिता वनगे उपस्थित होते. यावेळी रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, स्क्वेअर/सर्कल नंबर गेम,१०० मीटर धावणे स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील विजेत्या महिलांना बक्षीस वितरण करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक उदय जाधव, बालवर्ग प्रमुख सुरेखा नान्नजकर उपस्थित होत्या. प्रास्ताविक वनमाला ग्राम यांनी केले तर सूत्रसंचालन राजश्री ढवणमॅडम यांनी केले. आभार प्र शुभांगी पाटील यांनी मानले. स्पर्धेतील विजेत्या महिला पालक (प्रथम व द्वितीय) रांगोळी स्पर्धा : सुनिता हावळे, रुचिता माने संगीत खुर्ची : सारिका भोसले, स्वप्नाली चाफेकर सर्कल/स्क्वेअर नंबर गेम: संगीता फंड, पौर्णिमा वाघमारे १००मीटर धावणे : भाग्यश्री भोसले, प्रविजा पवार.



## कुचन प्रशाला

महिला दिनाचे औचित्य साधून कुचन प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण विभागात सर्व महिला शिक्षिका, प्राध्यापिका व महिला शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा फेटा बांधून प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. प्रत्येक कृतीतून महिलांचे सक्षमीकरण, संधींची समानता आणि समाजातील सकारात्मक बदल घडवण्यासाठी पुढे येऊन योगदान देत आहोत, असे मत प्राचार्य युवराज मेटे यांनी मांडले. याप्रसंगी उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे उपस्थित होते.



## सेवासदन प्रशाला

येथील सु. रा. मुलींची सेवासदन प्रशालेत महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध स्पर्धा व मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले. संध्या सुतार, श्रुती मोहोळकर, सुविधा कदम, स्नेहल वागवडे या शिक्षकांनी खेळांचे आयोजन केले होते. शाळेतील सर्व महिला शिक्षिका व सेविका यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे, उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई आणि पर्यवेक्षिका स्वाती पोतदार यांच्या हस्ते सहभागी महिला शिक्षिकांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन श्रुती मोहोळकर यांनी केले.



## विश्वभूषण विद्यालय

सदसंकल्प शिक्षण समूहाच्या राष्ट्रसंत प्राथमिक शाळा आणि विश्वभूषण विद्यालय सोलापूर येथे जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान मातांचा आणि शीलवंत, ज्ञानवंत, गुणवंत, धाडसी विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर यांची उपस्थिती होती. यावेळी बौद्ध महासभेच्या राज्य उपाध्यक्ष धम्मरक्षिता कांबळे, डॉ. अहिल्यादेवी गायकवाड, सत्यवान पाचकुडवे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी पार्वती माने, श्रीदेवी बगले, विद्या स्वामी, सुजाता कोणदे, सविता गायकवाड, मुमताज पटेल, राजश्री गायकवाड, परविन मुजावर, सुमन शिंदे, महिबूबी मकानदार, करिष्मा पठाण, इंदुमती हिरेमठ, भाग्यश्री अलकुंठे, कोमल बाळशंकर, राजलक्ष्मी इरवाडकर यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन प्रवीण पाटील यांनी केले. प्रास्ताविक रामचंद्र व्हनकडे, दिनेश भालशंकर यांनी आभार मानले.



## समता मराठी विद्यालय

समता मराठी विद्यालयात माध्यमिक विभागाच्या उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेले यांच्या प्रमुख उपस्थितीत आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेच्या अधिव्याख्याता रोहिणी बारगजे, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण वेतन विभागातील वरिष्ठ सहाय्यक सोनाली केत, भारती पटेल, अशोक म्हमाणे, मुख्याध्यापक, जयवंत हक्के, पर्यवेक्षक सुरेश राठोड उपस्थित होते. समिना मुजावर, जयवंत हक्के, स्वाती हवेले यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक सुहास माने यांनी केले तर गणेश राठोड यांनी सूत्रसंचालन, आभार नामदेव देशमाने यांनी मानले.



## भारती विद्यापीठ

भारती विद्यापीठ अंतर्गत अभिजीत कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अ ॲन्ड सोशल सायन्सेस सोलापूर व राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनाचे औचित्य साधून कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून व्ही. एम. मेडिकल कॉलेजच्या विभाग प्रमुख डॉ. स्मिता चाकोते व प्रसिद्ध अर्थतज्ञ सीए निलाशा नोगाजा लाभल्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्या डॉ. स्मिताचाकोते यांचा सत्कार इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा.डॉ. एस. बी. सावंत यांच्या हस्ते तर दुसऱ्या प्रमुख पाहुण्या सी.ए. निलाशा नोगाजा यांचा सत्कार राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रांजली मोहीकर यांच्या हस्ते करण्यात आला. प्रस्ताविक उपप्राचार्य डॉ. पी. पी. कोठारी यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. शबनम माने व प्रा. स्मिता गंभीरे यांनी करून दिली. यावेळी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये संघर्ष करून समाजाच्या विकासासाठी ज्यांनी भरीव योगदान दिले अशा तीन महिलांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये शिक्षणतज्ञ कै. ग.सा. पवार यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती विमल पवार यांचा समाज कार्यातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सत्कार करण्यात आला.

त्याचप्रमाणे श्रीमती शामाबी नदाफ यांचा लघु उद्योगातील भरीव कामगिरीबद्दल सत्कार करण्यात आला व भारती विद्यापीठाची विद्यार्थिनी वैष्णवी गवळी हिने एम. एस. डब्ल्यू. परीक्षेमध्ये विद्यापीठात गोल्ड मेडल मिळाल्याबद्दल तिचाही सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थिनी व महिलांसाठी व्यक्तिमत्व विकास तसेच गुड टच व बॅड टच या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्रमुख वक्त्या म्हणून कल्याणी ढवळे लाभल्या. सूत्रसंचालन साक्षी बरबडे व अनिशा गवेकर यांनी केले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. शिवगंगा मैंदर्गी यांनी काम पाहिले. आभार प्रांजली मोहीकर यांनी मानले.

## शहरात महिला दिन उत्साहात साजरा



## स्वच्छता दूत महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

जागतिक महिला दिनानिमित्त सोलापूर महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या माध्यमातून सोलापूर झेन एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने आज सोलापूर महापालिकेतील स्वच्छता दूत महिला कर्मचाऱ्यांचा साडी व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी कामगार नेते अशोक जानराव, मुख्य आरोग्य निरीक्षक अन्वर शेख, महाराष्ट्र राज्य आरोग्य निरीक्षक संघटना शाखा सोलापूरचे अध्यक्ष शेषराव शिरसट, झेन एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष अभिषेक तुळसे, महाराष्ट्र राज्य आरोग्य निरीक्षक संघटनेचे उपाध्यक्ष जितू मोरे, संघटनेचे संयोजक अमोल कांबळे, कार्याध्यक्ष सुनील राठोड, पवन वाघमारे आदी मान्यवरांचे प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे सभासद विकास जाधव, सुनील साबळे, अभिजीत शिरसागर, रोहित पोतदार, संदीप सरवदे, रंजन शिंगे, जमादार चंद्रकांत गायकवाड, अक्षय सोसायटीचे संचालक उत्तम कसबे उपस्थित होते.

## ए.जी. पाटील तंत्रनिकेतन




ए. जी. पाटील तंत्रनिकेतनमध्ये कार्यरत जागृती महिला विचार मंचतर्फे आयोजित महिला दिन साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने सोलो सिंगिंग, वेशभूषा, मिमिक्री व फळांपासून वेगवेगळ्या वस्तू बनविणे अशा स्पर्धांचे आयोजन मुलींकरता करण्यात आले होते. यावेळी जागृती महिला विचार मंचतर्फे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते व त्याच बरोबर वैशाली गुंड (विभूते) या प्रमुख पाहुण्या या कार्यक्रमाला उपस्थित होते.

वैशाली गुंड यांच्या हस्ते विजेत्या समर्थकांचे बक्षीस देऊन गौरव करण्यात आले. कार्यक्रमाकरिता संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, उपाध्यक्ष शिवानंद पाटील, प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले आणि उपप्राचार्य एस.के. मोहिते यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जागृती महिला विचार मंचाच्या समन्वयक एल. एस. बिराजदार, जयश्री सचदेव, लक्ष्मी केंदुळे, ऐश्वर्या सोलनकर व सर्व महिला शिक्षकांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्राध्यापिका संजोता मरेड्डी, विद्यार्थिनी साक्षी उपीन हिने आभार मानले.

**स्पर्धेचे विजेते :**

फॅन्सी ड्रेस : भक्ती जाधव व भक्ती कुलकर्णी
सोलो सिंगिंग : राधिका पुजारी व सृष्टी ढाबे
मिमिक्री : सायली जाधव व नेहा कुलकर्णी
फ्रुट आर्ट एक्झिबिशन : सृष्टी अंगडी व भक्ती कुलकर्णी



## पंढरीनाथ ऑफसेट

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पंढरीनाथ ऑफसेट सोलापूर येथे मुद्रण क्षेत्रातील महिलांचा भेटवस्तू व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. १०० वर्षांची परंपरा असलेल्या अरूणोदय प्रिंटींग प्रेसच्या स्नेहल काकडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि मुद्रण क्षेत्रातील सर्व महिलांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये लक्ष्मी नंदाल, वनिता कैरमकोंडा, अर्चना गंजी, धनश्री गवंडी, संध्या बटगिरी, संगिता वल्लाल, वसुधा धारा, राधिका कोटा, रूपा आडकी, श्रध्दा कन्ना, दिपा कुनगिरी, श्वेता चिल्लाळ, चंद्रकला यन्नम, रजनी दुस्सा, अर्चना मेंगजी, सुनिता सीता, रूपाली देशपांडे, गार्गी देशपांडे, उमा इगडे, किर्ती सरवदे, गीता साळी, अपर्णा कोंडाबत्तीनी, वैष्णवी दिकोंडा, रजनी कुडल, ममता गोसकी, सुजाता कोंडा, सरिता वैद्य, रूपा दोरनाल या महिलांचा सन्मान करण्यात आले. सूत्रसंचालन सोलापूर मुद्रक संघाचे सचिव यशवंत बिराजदार यांनी केले. प्रास्ताविक अध्यक्ष आनंद लांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष अजित चौहान यांनी केले. यावेळी सोलापूर मुद्रक संघाचे पदाधिकारी सर्वश्री. सचिन सरवदे, सुशील कन्ना, श्याम खंडेलवाल, बालाजी म्हंता, गंगाप्रसाद बंडेवार, सुरज चव्हाण, योगेश भाईकट्टी, सचिन चिल्लाळ, अजित गड्डम उपस्थित होते. तसेच संघाचे सल्लागार नागेश शेंडगे, संदिप कन्ना, सुधीर कुलकर्णी, कल्याण भाईकट्टी, ईश्वर झुंजा, अनिल देवलपल्ली उपस्थित होते.



## चहा कट्टा तर्फे एमपीएससी उत्तीर्ण भोजने भगिनींचा सत्कार

चहा कट्टातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त जेष्ठ हास्य कवी अशोक नायगावकर यांच्या हस्ते भोजने भगिनींचा सत्कार करण्यात आला. संजीवनी भोजने व सरोजिनी भोजने या भगिनी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या आहेत. त्यांचे शालेय शिक्षण संभाजी विद्यामंदिर तसेच महाविद्यालयीन शिक्षण संगमेश्वर महाविद्यालय येथे झाले आहे. घरची परिस्थिती सामान्य असताना देखील त्यांनी मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे. त्यांचे वडील सोलापुरात एक मेकॅनिक म्हणून काम करतात. घरची परिस्थिती सामान्य असलेले ज्योतिबा भिकाजी व रेशमा ज्योतिबा भोजने या दोघांनी त्यांच्या दोन्ही मुलींना चांगले शिक्षण मिळावे म्हणून खूप कष्ट घेतले आहेत. त्या कष्टाचे चीज आज या दोन्ही भगिनींनी एमपीएससी परीक्षेत मिळवकेल्या यशामुळे झालेले आहे अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी श्री नायगावकर यांचा सत्कार चहा कट्ट्याचे सदस्य ज्येष्ठ पत्रकार अविनाशजी कुलकर्णी यांनी केला. याप्रसंगी चहा कट्ट्याचे सदस्य ॲड. बसवराज सलगर यांनी मनोगत व्यक्त केले.

## महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ



महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे येथे जागतिक महिला दिनानिमित्त आदर्श माता आणि उच्च शिक्षण पूर्ण करुन विविध क्षेत्रात कार्यरत माजी विद्यार्थिनींचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. संस्थेच्या मार्गदर्शिका माजी आमदार निर्मला ठोकळ यांच्या प्रेरणेने जागतिक महिला दिनानिमित्त आदर्श माता व विविध क्षेत्रात कार्यरत माजी विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला. स्त्री रोग तज्ञ डॉ. मिनल चिडगुपकर यांच्या हस्ते व माजी नगरसेविका मंदाकिनी तोडकरी यांच्या उपस्थित आदर्श माता श्रीमती राधिका आगतराव पुजारी यांचा सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रात कार्यरत माजी विद्यार्थिनी अभियंता शिवाणी राजुरे अभियंता शिवांजली शिंदे परिचारिका सविता स्वामी शिक्षिका मंदाकिनी जाधव यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन पूर्वा भोसले, पाहुण्यांचा परिचय अश्विनी कोकणे, प्रास्ताविक संध्या लोंढे आभार आफ्रिन शेख यांनी मानले.



## कोठारी प्रशाला

श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूलमध्ये महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक रमेश यादवाड उपस्थित होते. प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. नेहा जोशी, प्रमुख अतिथी म्हणून ज्योती रमेश यादवाड, वैशाली स्वामी, बसम्मा पाटील, शोभा गायकवाड, ज्योती गायकवाड उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे सुरुवात करण्यात आली. डॉ. नेहा जोशी यांनी संतुलित आहार व स्त्रियांचे आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. प्रशालेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते कर्तृत्वत्वान महिला पालक सुगलाबाई म्हेत्रे, संगीता मशाळकर, सुनिता कुंभार, लक्ष्मी गजदाने, कविता इंगळे, गौराबाई कांबळे, पूजा कांबळे, लक्ष्मी कुंभार, सुनीता कुंभार, नौशाद शेख, यांना पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित पालकांमधून शुभांगी सोनवणे, कविता इंगळे, महानंदा कोळी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रशालेच्या वतीने महिला पालकांसाठी लकी ड्रॉचा आयोजन करण्यात आलेला होता. यामध्ये लायव्वा गोरंदेवाले, काजल लष्करवाले, सुरेखा गोरलेवाले या विजेत्या पालकांना साडी भेट देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन ए. एस.माने, उपाध्ये, एस. एस. शिंदे व आरोही बनसोडे, आराध्या चंदनशिवे, वैभवी सोलंकर, इच्छा नाडगुंडे या विद्यार्थ्यांनी केले.

## श्रमिक पत्रकार संघ, राष्ट्रवादी कॉँग्रेस महिला आघाडी

महिलांना प्रत्येक वेळी समाज व्यवस्थेने प्रोत्साहन दिले आहे. देवी नव्हे तर महिला म्हणून समानतेची वागणूक मिळाली पाहिजे. महिला सक्षमपणे विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. महिलांनी न डगमगता पुढे गेले पाहिजे. केवळ महिला दिनच नव्हे तर प्रत्येक दिवशी महिलांसाठी जगण्याचा महोत्सव साजरा व्हायला पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी महिला आघाडीच्या वतीने माध्यमात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात पार पडला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या कार्याध्यक्षा चित्रा कदम यांच्या हस्ते माध्यमात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी विचार मंचावर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक सरचिटणीस सागर सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन खजिनदार किरण बनसोडे यांनी केले. पत्रकार अश्विनी तडवळकर यांनी आभार मानले. याप्रसंगी सत्कारमूर्ती महिलांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विविध माध्यमातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



कार्याध्यक्षा चित्रा कदम यांनी जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देत महिला दिन हा दररोज साजरा झाला पाहिजे. महिलांचा सन्मान केला पाहिजे. महिला या विविध क्षेत्रात धैर्याने, जिद्दीने, चिकाटीने आपला ठसा उमटवीत आहेत.

## जुळे सोलापुरात रूपनिहार पार्लरने महिलांसाठी दिली मोफत सेवा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.८ मार्च,**

जागतीक महिला दिनानिमित्त जुळे सोलापूरातील ज्ञानेश्वर नगर परिसरातील रूपनिहार ब्युटी पार्लरने एक दिवस मोफत सेवा देण्याचा उपक्रम राबवला. या सेवेचा अनेक महिलांनी लाभ घेतला.

शहर व जिल्ह्यात महिला दिनानिमित्त विविध संस्था, संघटनाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले गेले. त्यामध्ये विविध क्षेत्रात कार्यरत महिलांच्या सन्मानासह विविध खेळ, स्पर्धा घेण्यात आल्या. काही संस्थांकडून कमी दरात तर काही संस्थाकडून मोफत सेवा देण्याच उपक्रमही राबवला गेला. यामध्ये जुळे सोलापूरातील ज्ञानेश्वर नगर बँक कॉलनीतील रुपनिहार ब्युटी पार्लरने महिला सप्ताहाचे आयोजन केले होते. त्यामध्ये विविध सेवा सवलतीच्या दरात तर काही सेवा मोफत दिल्या गेल्याचे संचालिका अश्विनी जोशी यांनी सांगितले. या पार्लरच्या वतीने संपूर्ण एक दिवस मोफत ॲब्रोची घोषणा करण्यात आली होती. समाजमाध्यमातून ही माहिती अनेक महिलांपर्यंत गेल्याने या सेवेचा सर्वाधिक फायदा महिलांनी घेतला. यामध्ये परिसरातीलच नाही तर शहराच्या विविध भागातील महिलाही सहभागी झाल्या होत्या. सप्ताहकाळात सुमारे दीडशे ते दोनशे महिलांनी लाभ घेतल्याचे सौ. जोशी यांनी सांगितले.







# महिलांनी आत्मविश्वासाने आयुष्याची लढाई जिंकावी : डॉ. गोळवणकर

## ● मिस महाराष्ट्र अवॉर्ड २०२५ वितरण सोहळा थाटात; पुरस्कारांमुळे महिलांमध्ये वाढला आत्मविश्वास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

स्त्री ही सृजनतेची शक्ती आहे. स्त्रीमुळे जग आहे. महिला दिनाचा केवळ एकच दिवस न राहता प्रत्येक दिवस महिलांसाठीच असावा. महिलांनी आत्मविश्वास, धैर्य आणि जिद्दीने आयुष्याची लढावी जिंकावी, असे प्रतिपादन उद्योजिका डॉ. किर्ती गोळवणकर यांनी केले.

टीव्ही महाराष्ट्र न्युज चॅनलच्या वतीने दैनिक तरुण भारत, चंदुकाका सराफ, यश डेव्हलपर्स आणि धूत सारीज यांच्या सहकार्याने मिस महाराष्ट्र अवॉर्ड २०२५ चा वितरण सोहळा थाटात पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, डॉ. किर्ती गोळवणकर, उद्योजिका पुनम लोणावत, चंदुकाका सराफचे प्रतिनिधी कुमार राठोड, यश डेव्हलपरचे संचालक बापूसाहेब पाटील, टीव्ही महाराष्ट्र न्युज संचालक धनंजय शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. किर्ती गोळवणकर यांनी पुरस्काराने महिलांच्या कार्याचे कौतुक करताना अभिमान वाटतो. पुरस्काराने प्रेरणा मिळते. प्रोत्साहन मिळते. उच्च पदावर जाऊन महिलांनी वेगळा ठसा उमटविला आहे. जोमाने काम करत राहिले पाहिजे. कुमार राठोड म्हणाले यांनी पुरस्कार प्राप्त महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. चंदूकाका सराफ पेढीने १९८ वर्ष पूर्ण केले आहेत. सामाजिक बांधिलकी जोपासत विविध क्षेत्रात अग्रेसर आहे. अनेक घटकांना मदत केली आहे. आज विविध क्षेत्रात महिला या अग्रेसर आहेत याचा आनंद वाटतो.

यश डेव्हलपर्सचे पाटील म्हणाले, कोणत्याही क्षेत्रात महिलांनी न घाबरता पुढे गेले पाहिजे. स्त्री-पुरुष अशी स्पर्धा नाही, ते दोघेही एकमेकांना परस्पर पूरक आहेत. स्वतःहून महिलांनी वाटचाल केली पाहिजे. स्वतःचा विकास साधला पाहिजे, असे ते म्हणाले.

दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने म्हणाले, महिलांनी व्यक्त झाले पाहिजे तरच त्यांची दखल घेतली जाईल. महिलांच्या कार्यकर्तृत्वामुळे त्यांना यश मिळते. महिलांना मान सन्मान मिळाला पाहिजे. महिलांनी स्वतः विषयी एक लक्ष्मण रेषा आखली पाहिजे. समाजात वावरताना सावधानता बाळगली पाहिजे. स्वातंत्र्याचा योग्य उपयोग केला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.पुनम लोणावत म्हणाल्या, महिला सर्व क्षेत्रात अग्रेसर आहेत. सक्षमपणे स्वतःच्या पायावर उभे आहेत. महिलांच्या कार्यकर्तृत्वाचा सन्मान हा अभिमानास्पद आहे. कुटुंबात पती-पत्नींनी एकमेकांना समजून आनंदी ठेवले तर प्रवास सुख आणि समाधानकारक राहील.

मनोगत व्यक्त करताना पुरस्कार विजेत्या शुभांगीनी चव्हाण यांनी विजेत्या महिलांना शुभेच्छा देताना बांधकाम व्यवसायातील यशाबद्दल सांगितले. महिलांनी अपयशाची काळजी न करता यशासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत असे सांगितले.

याप्रसंगी निधी सेठीया, डॉ. सुप्रिया पवार, राजश्री पोतदार, सोनाली चौगुले-गाडेकर यांनीही मनोगत व्यक्त करताना सर्व महिलांना शुभेच्छा दिल्या. पुरस्कार प्राप्त मान्यवर महिलांनी आपल्या मनोगतात पुरस्कार दिल्याबद्दल आभार मानले. सूत्रसंचालन संपादक पल्लवी माने यांनी केले.

### या मान्यवर महिलांचा झाला पुरस्काराने सन्मान

यावेळी सुवर्णा दिलीप पेठे (संचालिका पेठे फूडस् ), डॉ. स्नेहल नितीन कोंडेवार ( दंत स्पेशालिस्ट), शुभांगिनी नवनाथ चव्हाण (डायरेक्टर), सुषमा तानाजी कट्टे (आदर्श माता), वंदना सचिन शिंदे (योग प्रशिक्षिका), सोनम प्रशांत बंकापूर (फाऊंडर केक शॉप), सुनिता फावडे (सामाजिक), डॉ. नयना व्यवहारे (डॉक्टर),प्रगती क्षिरसागर (मेकअप आर्टीस्ट), चित्रा वसंत पोतदार (सिंचन विभाग), डॉ. सुप्रिया युवराज पवार (डॉक्टर),डॉ. वासंती ज्ञानेश्वर पांढरे (प्राचार्या), सुचिता नरेंद्र मदने (सहशिक्षिका), हर्षदा राजकिरण चव्हाण (रॉयल हॅट पब्लिकेशन), निधी सेठिया (लेखक, गायिका, अँकर), सुवर्णा माने (वीरमाता, वीरपत्नी), राजश्री व्यंकटेश पोतदार (इलेक्ट्रिकल इंजिनियर), रचना धनराज व्हनमोरे (डान्स कोरिओग्राफर), सोनाली चौगुले - गाडेकर (शिक्षिका), भारती गणेश गुंडला (सहशिक्षिका) आदी यशस्वी महिलांचा मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. पुरस्काराचे संयोजक महाराष्ट्र न्यूज चॅनलचे धनंजय शिंदे आणि सौ. लता शिंदे यांचाही सत्कार पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.

### महिलांसाठी दैनिक तरुण भारतचे व्यासपीठ उपलब्ध : मुख्य संपादक प्रशांत माने

दैनिक तरुण भारतने नेहमीच महिलांच्या विविध उपक्रम आणि अभिव्यक्तीला वाव दिला आहे. यापुढेही दैनिक तरुण भारतचे व्यासपीठ सर्व महिलांसाठी उपलब्ध राहील. महिलांनी लिहावे. त्यांना प्रसिद्धी मिळेल. त्यांनी व्यक्त झाले पाहिजे, असे आवाहन दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी यावेळी केले.

# कर्मशीलता हा आपल्या देशाचा स्वभाव, चैत्रामजी त्याचं ज्वलंत उदाहरण

### रा.स्व. संघाचे अखिल भारतीय सदस्य भैय्याजी जोशी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, ८ मार्च-**

आंतरिक तळमळ, समाजाप्रती आत्मीय भाव व दृढसंकल्प असेल तर प्रतिकूल परिस्थितीवर कशी मात करता येते, याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे चैत्राम पवार यांना मिळालेला पद्मश्री हा पुरस्कार आहे, असे प्रतिपादन रा.स्व.संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी यांनी केले.

एमजीएमच्या रुख्मिणी सभागृहात आयोजित पद्मश्री चैत्रामजी पवार नागरी सत्कार समारंभात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर सत्कारमूर्ती पद्मश्री चैत्रामजी पवार प्रमुख अतिथी अंकुशरावजी कदम, चैत्रामजी पवार सत्कार सोहळा स्वागत समितीचे अध्यक्ष अशोक काळे, देवगिरी कल्याण आश्रमाच्या शहर अध्यक्षा स्वाती पाडळकर यांची उपस्थिती होती.

सत्कारास उत्तर देताना सत्कारमूर्ती



पद्मश्री चैत्रामजी पवार म्हणाले, रा स्व संघ व वनवासी कल्याण आश्रम यांचे या यशामागे मोठे योगदान आहे. हीच यामागील प्रेरणा आहे.हेडगेवार रुग्णालयाची मोठी टीम सहकार्यासाठी बारीपाडा येथे नियमितपणे येते. सर्वांच्या सहकार्याने हे काम उभे राहिले आहे. पुरस्कारासाठी हे काम उभे राहिलेले नाही तर काम अधिक वाढावे या हेतूने हा पुरस्कार दिला जात असावा. हा सन्मान केवळ माझ्या एकट्याचा नसून ग्रामस्थ व संघाचे व कल्याण आश्रमाचे असंख्य कार्यकर्ते यांचा हा सन्मान आहे. पद्मश्री चैत्रामजी पवार यांचा भैय्याजी जोशी व अंकुशरावजी कदम यांच्या हस्ते शाल, श्रीफळ,सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व सन्मननिधी देऊन सत्कार करण्यात आला. चैत्रामजी पवार यांच्या पत्नी विमलताई पवार यांना साडी चोळी देऊन स्वाती पाडळकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

डॉ. श्रीराम पत्की यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी अंकुशरावजी कदम यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले.डॉ. आनंद फाटक यांनी देवगिरी कल्याण आश्रमाचे जनजाती क्षेत्रातील कार्य व तेथे चालविल्या जाणाऱ्या विविध प्रकल्पांची माहिती दिली.बारीपाडा येथील शाश्वत विकास कार्याची यशोगाथा ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून दाखविण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागरी सत्कार सोहळा स्वागत समितीचे अध्यक्ष श्री अशोकजी काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन देवगिरी कल्याण आश्रमाच्या शहर अध्यक्षा स्वाती पाडळकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास आजगावकर यांनी केले.

# राज्यात सोलापूर जिल्हा बँक रोल मॉडेल ठरेल

### कृषीमंत्र्यांचे सचिव संतोष पाटील यांचा विश्वास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ मार्च-**

बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेपाठोपाठ सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक ही रोल मॉडेल ठरेल. या बँकेलाही (डीसीसी) घरघर लागली होती. मात्र, या बँकेला शैलेश कोथमिरे यांच्यासारखा प्रशासकीय अधिकारी लाभल्यामुळे ही बँक आर्थिक संकटातून बाहेर पडली असून आता महाराष्ट्रामध्ये सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक ही रोल मॉडेलठरेल, असा विश्वास राज्याच्या कृषीमंत्र्यांचे सचिव तथा सहकारी संस्थांचे अपर निबंधक संतोष पाटील यांनी व्यक्त केला.

शनिवारी, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचा १०७वा वर्धापन दिन, आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आणि जागतिक महिला दिन असा त्रिवेणी संगम साधून आयोजित





केलेल्या कार्यक्रमात अपर निबंधक पाटील बोलत होते. या कार्यक्रमास विभागीय सहनिबंधक योगीराज सुर्वे, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, वस्त्रोद्योग विभागाचे प्रादेशिक उपायुक्त उज्वला पळसकर, शहर उपनिबंधक डॉ. प्रगती बागल, जिल्हा विशेष लेखापरीक्षक विष्णू डोके, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक नितीन शेळके, सोलापूर जिल्हा नागरी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश वाले, सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे उपस्थित होते. प्रारंभी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र शिंदे यांनी स्वागत केल्यानंतर प्रशासक कुंदन भोळे यांनी प्रास्ताविकातून बँकेच्या प्रगतीचा आढावा मांडला.

पाटील म्हणाले, नाशिक, वर्धा व बीड या बँकांना ऊर्जितावस्था आणण्यासाठी आपण स्वतः प्रयत्न करत असून या बँकांचा लखलखता सूर्य आपल्याला पाहावयाचा आहे. या बँकांना ऊर्जितावस्था येण्यासाठी सरकारच्या माध्यमातून साडेपाचशे कोटी रुपयांची मदत करण्यात आली. मात्र बँकांची अवस्था सुधारली नाही. कर्मचारी, ठेवीदार, आमदार, खासदार व इतर राजकीय पदाधिकारी यांच्या माध्यमातून आपण या तीन जिल्ह्यातील बँकांना पुनर्वैभव प्राप्त करून देण्यासाठी एक वेळ कृषी सचिव विभागाचा पदभार सोडू पण एक शेतकऱ्याचा मुलगा म्हणून बँका बुडू देणार नसल्याची ग्वाही पाटील यांनी दिली. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेला ऊर्जितावस्था आणण्यासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने प्रयत्न केले म्हणून आज बँकेची आर्थिक परिस्थिती सुधारली असल्याचे मत नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक शेळके यांनी व्यक्त केले. यावेळी विभागीय सहनिबंधक सुर्वे, जिल्हा उपनिबंधक गायकवाड यांनी बँकेच्या प्रगतीसाठी आवश्यक ते सहकार्य राहील, अशी ग्वाही दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोलापूर जिल्हा सहकारी बँक कर्मचारी संघटनेचे सचिव राजेश गवळी यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या नातवाच्या शाही विवाह सोहळ्यास लाखोंची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ मार्च-**

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचे नातू व आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांचे चिरंजीव विश्वतेजसिंह व चिखली जि. वाशिम येथिल उदयसिंह रमेशराव सरनाईक यांची कन्या शिवांशिका यांच्या शुभविवाह सोहळा शाही थाटात अकलूज येथे संपन्न झाला. या शाहा विवाह सोहळ्यास लाखोंची उपस्थिती होती.



सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या चौथ्या पिढीतील हा विवाह सोहळा अत्यंत देखण्या व नियोजन पद्धतीने मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या विवाह सोहळ्यास महाराष्ट्रासह देशभरातील राजघराण्यातील मान्यवर व्यक्ती, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सहकार, नाट्य, चित्रपट, उद्योग आदी क्षेत्रातील लाखो मान्यवरांची उपस्थिती लाभली. गोरज मुहूर्तावर सुमारे दीड लाख निमंत्रित मित्र परिवारांनी वधूवरास शुभाशीर्वाद देत याची देही याची डोळा मोहिते पाटील परिवारातील चौथ्या पिढीचा शाही विवाह सोहळा पाहिला.

विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकटवर संपन्न झालेल्या सोहळ्यास अतिशय सुंदर असा शामियाना उभारलेला होता. या विवाह सोहळ्यास खा.शरदचंद्र पवार, प्रतिभा पवार, मंत्री रामदास आठवले, शिवेंद्रराजे भोसले, शंभूराज देसाई, स्मिता देसाई, खा.उदयनराजे भोसले, कल्पनाराजे भोसले सातारा, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विश्वजीतराजे नाईक निंबाळकर, विश्वजीत कदम, स्वप्नाली कदम, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आ. किरण सरनाईक, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, खा. शाहू महाराज छत्रपती, खा.निलेश लंके, खा.बजरंग सोनवणे, संजीवराजे नाईक निंबाळकर, माजी खासदार संजय काका पाटील, माजी मंत्री बाळासाहेब, महादेव जानकर, शिवांजलीराजे नाईक निंबाळकर, श्रीनिवास पवार, शर्मिला पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, आ. दिलीप सोपल, आ. नारायण पाटील, आ उत्तमराव जानकर, आ. समाधान आवताडे, आ. अभिजीत पाटील, आ राजू खरे, माजी आ. दिलीप माने, दीपक साळुंखे, धनाजी साठे, सिध्दाराम म्हेत्रे, प्रशांत परिचारक, प्रकाश पाटील पानीवकर, कल्याणराव काळे, रश्मी बागल, महेश गादेकर, मनोहर डोंगरे, बळीराम काका साठे यांच्यासह विविध राजकीय पक्षाचे नेते, सहकार, शिक्षण, उद्योग, सामाजिक, नाट्य, चित्रपट क्षेत्रातील असंख्य मान्यवर या विवाह सोहळ्यास उपस्थित होते.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, जयसिंह मोहिते पाटील मदनसिंह मोहिते पाटील, आ. रणजितसिंह मोहिते पाटील, खा. धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासह परिवारातील सदस्यांनी उपस्थितांचे स्वागत केले.



# लोकमंगल बँकेच्या वतीने पोलीस प्रशासनातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**लोकमंगल-९**
**सोलापूर, दि. ८ मार्च -**

आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या लोकमंगल बँकेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त पोलीस प्रशासनातील क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांचा सन्मान करून महिला दिन साजरा करण्यात आला.

फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे हा सन्मान सोलापूर शहर सहाय्यक पोलीस आयुक्त प्रताप पोमण , फौजदार चावडी पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक अरविंद माने, सहाय्यक पोलिस निरीक्षक सविता मोरे पाटील लोकमंगल बँकेच्या संचालिका शितल कोकाटे, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी पोलीस प्रशासनात काम काज करणाऱ्या महिलांचा बँकेच्या वतीने सन्मानचिन्ह, भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, याप्रसंगी महिलांना बँकेच्या विविध कर्ज योजनेची माहिती, ठेवीची,रिकरिंग खात्यांची तसेच पर्यटन विभागाच्या ''आई'' कर्ज योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली.

याप्रसंगी पोलीस प्रशासनातील महिला उपस्थित होत्या. प्रास्ताविकामध्ये अनिता जगदाळे यांनी बँकेच्या विविध वैशिष्ट्ये व कर्ज योजनांची माहिती व ठेवीची माहिती उपस्थित महिलांना दिली. यावेळी बँकेचे महिला कर्मचारी उपस्थित होते.

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# अस्वस्थतेकडून आश्वस्ततेकडे...!

घरातील स्थान, आर्थिक स्थैर्य, जीवनशैली आणि कुटुंबातील सदस्यांशी, विशेषत मुलांशी असलेले नाते या असंख्य विषयांभोवती स्त्रियांच्या समस्या वर्षानुवर्षे गुरफटून राहिल्या. चार-पाच दशकांपूर्वीपर्यंत, जेव्हा कौटुंबिक रूढींचा प्रभाव स्त्रीवर सर्वाधिक होता, तेव्हाची स्त्री म्हणजे पुरुषप्रधान संस्कृतीने रंगविलेले केवळ एक सुबक चित्र होते. म्हणजे, स्त्रीचे रूप, शालीनता, प्रेमळपणा, वात्सल्य आणि स्वयंपाकघरातील जबाबदारी पार पाडण्यातील समर्थपणा किंवा खंबीरपणा या गुणांच्या रंगांनीच स्त्रीचे हे चित्र रंगविले जात असे. पत्नी, आई, सासू, सून, जाऊ-नणंद अशा वेगवेगळ्या कौटुंबिक भूमिकांमध्ये वावरतानाची तिची वागणूक हाच स्त्रीच्या गुणवत्तेचा आणि क्षमतेचा कस ठरविण्याचा निकष होता. काळ बदलत चालला, स्त्रियांनादेखील शिक्षणाच्या आणि करीयरच्या संधींची क्षितिजे खुणावू लागली, तेव्हा स्त्रियांचे उंबरठ्याआड अडकलेले विश्व मोकळे झाले. कुटुंबातील प्रथांच्या पलीकडे जाऊन 'ब्र'देखील काढण्याची हिंमत नसलेल्या स्त्रिया 'बोलत्या' झाल्या, आणि समाजात वर्षानुवर्षे दबून राहिलेल्या महिलावर्गाला आवाज आहे, याची जाणीव समाजाला होऊ लागली. स्त्रिया केवळ बोलू लागल्या एवढेच नव्हे, तर न पटणाऱ्या बाबींवर ठाम मतप्रदर्शन करून प्रसंगी एकजुटीने संघर्षासही सिद्ध झाल्या. कुटुंबाचा गाडा हाकणे ही सामूहिक जबाबदारी आहे आणि पतीइतकाच पत्नीचादेखील या जबाबदारीतील प्रत्येक पावलावर समान वाटा आहे, हे प्रसंगी पुकारलेल्या लढ्यातून किंवा सिद्ध केलेल्या कर्तबगारीतून स्त्रियांनी दाखवून दिले. या परिवर्तनासाठी स्त्रियांनी बजावलेली भूमिका महत्त्वाची आहे.

व्यापक समाजव्यवस्थेत हा बदल प्रकर्षाने जाणवत असला तरी सामान्य मराठी कुटुंबांमधील 'आई' ही या परिवर्तनाच्या प्रवासात स्वतःला सामावून घेण्याचा अडखळता प्रयत्न करत असते. अजूनही कुटुंबव्यवस्थेच्या जुन्या रूढींविषयीची आत्मीयता तिच्या वागण्याबोलण्यात, व्यवहारांत डोकावते. संध्याकाळी कामावरून घरी परततानाचा प्रवास सुरू करण्याआधी भाजी खरेदी करून, रेल्वेत किंवा बसमध्ये बसायला जागा मिळाली तर प्रवासात शेंगा, पालेभाज्या निवडणारी मराठमोळी स्त्री महानगरांतदेखील अजूनही दिसते. कारण, कुटुंबात परतताना आपली घरातली भूमिका निभावण्याची तिची मानसिकता पूर्वीइतकीच जिवंत आहे. घराबाहेर पडल्यानंतर ही स्त्री हक्कांसाठी कणखरपणे लढू शकते, संघटितपणाने संघर्ष करण्याची तयारीही दाखविते आणि न पटणाऱ्या बाबींवर परखडपणे मतप्रदर्शनही करते. पण संध्याकाळी घरी परतते, तेव्हा मात्र, ती आई, पत्नी आणि गृहिणी असते. संध्याकाळी घरी पोहोचल्यानंतर, दिवसभराच्या कामाचा शीण घालविणाऱ्या विरंगुळ्याचे क्षण तिचे तिनेच शोधलेले असतात. त्या क्षणांमध्ये रमल्यानंतर ती आपल्या घरातल्या भूमिकेत शिरते, हे चित्र अजूनही कित्येक घरांमध्ये दिसते. पुरुषांच्या बरोबरीने नोकरी-व्यवसायाच्या विश्वात वावरणारी प्रत्येक नोकरदार स्त्री घरात किंवा कुटुंबात वावरताना केवळ बदलत्या समाजव्यवस्थेतून आलेल्या आत्मविश्वासाचा किंवा मिळालेल्या हक्कांचा वाटा उचलण्याच्या मानसिकतेतच असते असे दिसत नाही. वाढती महागाई, बदलती जीवनशैली, आणि त्यामुळे कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेचा डोलारा सांभाळण्यासाठी करावा लागणारा संघर्ष ही आजही मध्यमवर्गीय कुटुंबाची अपरिहार्यताच आहे.

केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयातर्फे कुटुंबातील व्यक्तींच्या वेळेच्या वापरासंबंधीचे एक सर्वेक्षण अलीकडेच पार पडले. त्याचा अहवालही आता प्रसिद्ध झाला असून, रोजगार संबंधित कामांमध्ये महिलांचा सहभाग वाढत असल्याचा निष्कर्ष या अहवालातून समोर आला आहे. विविध दैनंदिन कामांसाठी लोक आपल्या वेळेचा कसा उपयोग करतात, याचे विश्लेषण करणाऱ्या मोजक्या देशांत भारताचाही समावेश आहे. महिला म्हणजे सरकारी योजनांच्या लाभार्थी अशाच नजरेने पाहिले जात असताना, कामाच्या आणि विकासाच्या वाटचालीतील महिलांच्या सहभागाची आता नोंद होऊ लागली आहे. केवळ लाडकी बहीण योजनेसारख्या सरकारी योजनांचे लाभ मिळविण्यातच महिलांना रस नाही. लखपती दीदीसारख्या केंद्र सरकारच्या योजनांच्या माध्यमातून आर्थिक स्वयंपूर्णता साधण्याचा आत्मविश्वासही त्यांनी सिद्ध केला आहे. उद्योगजगतात महिलांनी व्यक्तिगत स्तरावर आणि बचत गटांसारख्या उद्योगांतून संघटितपणे त्यांनी आपल्या कर्तबगारीची क्षितिजे विस्तारली आहेत. संरक्षण दलासारख्या आव्हानात्मक क्षेत्रांतही त्यांच्या कर्तबगारीला वाव मिळू लागला आहे. वर्तमानातील या स्थितीच्या पृष्ठभूमीवरच, ज्या कामाचा मोबदला मिळतो असे काम आणि ज्या कामासाठी मोबदला आकारला जात नाही अशा कामातील महिला व पुरुषांचा सहभाग जाणून घेण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारतर्फे हे सर्वेक्षण करण्यात आले. असे पहिले सर्वेक्षण २०१९ मध्ये झाल्याने, गेल्या पाच वर्षांत महिला आणि पुरुषांमधील कुटुंबाशी संबंधित वेळेच्या व्यवस्थापन आणि उपयोगाबाबतचे मापदंड कसे बदलत गेले, त्याचा एक स्पष्ट आराखडाही या सर्वेक्षणातून समोर आला आहे. त्यानुसार, रोजगार व संबंधित कामातील पुरुषांचा सहभाग गेल्या पाच वर्षांत सुमारे चार टक्क्यांनी वाढला, तर महिलांचा सहभाग ३.२० टक्क्यांनी वाढला आहे. पाच वर्षांपूर्वी, कुटुंबासाठी घरकाम करणाऱ्या महिला दिवसाकाठी ३१५ मिनिटांचा वेळ व्यतीत करत होत्या, गेल्या पाच वर्षांत या श्रमाचा कालावधी कमी झाला असून आता याच कामकरिता अशा महिला दिवसाकाठी ३०५ मिनिटांचा वेळ देतात, असा निष्कर्ष या पाहणीतून पुढे आला आहे. याचा अर्थ, कुटुंबासाठी करावयाच्या कामाची महिलांची दहा मिनिटे आता वाचली आहेत आणि या दहा मिनिटांचा वापर आराम करणे, करमणुकीसाठी वापरणे, समाजमाध्यमांवर वावरणे किंवा खेळासारख्या विरंगुळ्यात घालविण्यासाठी होऊ लागला आहे. घरातील सदस्यांची, कुटुंबाची काळजी घेण्याची जबाबदारी मुख्यतः महिलांवरच असते. या पाहणीतही त्याला पुष्टी मिळाली आहे. सुमारे ४१ टक्के महिला कुटुंबाची काळजी घेण्याच्या कामात व्यग्र होत्या, तर याच कामातील पुरुषांचा सहभाग केवळ २१ टक्के होता. या कामासाठी महिलांनी दिवसाकाठी १४० मिनिटे दिली, तर पुरुषांनी केवळ ७४ मिनिटे दिली. महिलांवरील या जबाबदारीची परंपरा या सर्वेक्षणातून पुन्हा अधोरेखित झाल्याने, महिलांच्या या कामाची प्रतिष्ठा वाढली पाहिजे. कारण कुटुंबासाठी महिलांनी दिलेल्या वेळामुळे कुटुंबाचा मानसिक विकास होतो, भावी पिढ्यांचे मानसिक संगोपन होते. विकासाच्या या वाटचालीतील हा सहभाग लक्षात घ्यायलाच हवा. महिलांच्या विकासाचा टप्पा आता पार पडला असून विकासाच्या वाटचालीचे नेतृत्व महिलांनी सक्षमपणे उचलले आहे. हे चित्र आश्वासक आहेच, पण एका अस्वस्थ भूतकाळाकडून आश्वस्त भविष्यकाळाकडे महिलांची वाटचाल सुरू झाल्याचे निदर्शकही आहे.



यापूर्वीच्या, गेल्या सुमारे दोन दशकांपासून केल्या गेलेल्या अनेक पाहण्यांतून निष्पन्न झालेल्या निष्कर्षांनुसार, शहरी भागांतील सुमारे २७ टक्के महिला नोकरीसाठी सकाळी घराबाहेर पडत असतात. म्हणजे, साधारणपणे, शहरांत राहणाऱ्या प्रत्येक चार कुटुंबांपैकी एका कुटुंबातील स्त्री नोकरदार असते. अशा वेळी, कुटुंबाचे दररोजचे व्यवस्थान आणि मुलाबाळांची देखभाल हे मोठे आव्हान त्या स्त्रीच्या कुटुंबासमोर असते. या नोकरदार महिलांपैकी सर्वच महिला उच्चपदस्थ नोकरी किंवा उज्ज्वल भविष्यातील संधींची आव्हाने पेलण्यासाठी सरसावलेल्या, उच्चशिक्षित आणि गलेलठ्ठ पगार मिळवणाऱ्या नवश्रीमंत वर्गातीलच आहेत, असे नाही. मुंबईसारख्या महानगरांमधील उपनगरीय रेल्वे स्थानकांकडे जाणाऱ्या शहरी बसगाड्यांच्या थांब्यावर सकाळच्या वेळी लागणाऱ्या रांगा पाहिल्या, की नोकरदार महिलांचे वेगवेगळ्या आर्थिक स्तरांचे चित्र न सांगतादेखील स्पष्ट होऊ शकते. काखोटीला एक साधी पर्स असतानादेखील, हातात एखादी कापडी पिशवी सांभाळत रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यातील गर्दीत स्वतःला झोकून देताना जिवावरची कसरत पार पाडत कामाच्या ठिकाणी पोहोचणाऱ्या महिलांचा वर्गदेखील नोकरदार महिलांमध्येच मोडतो. नोकरी ही या महिलांची कौटुंबिक अपरिहार्यता असते. आर्थिक डोलारा सांभाळण्यासाठी घरातील पुरुषाच्या कमाईला जमेल तसा हातभार लावून कुटुंब चालविणे हाच या महिलांच्या 'नोकरदारी'चा अर्थ असतो. अशा महिलांना आपल्या घराची घडी विसकटू न देण्याचेही आव्हान पेलायचेच असते. नोकरी करणाऱ्या या वर्गातील महिलांची आपली कौटुंबिक जबाबदारी झटकण्याची इच्छा नसते किंवा नवऱ्याच्या बरोबरीने काम करत असल्याने घरातील जबाबदारीचा वाटा नाकारण्याची तिची मानसिकता नसते. सामान्यपणे प्रत्येकालाच, आपण जगतो ते जीवन सामान्य वाटत असते. भोवतालच्या श्रीमंतीच्या प्रदर्शनामुळे, दूरचित्रवाणीवर दिसणाऱ्या मालिकांनी रंगविलेल्या कुटुंबजीवनाच्या भपकेबाज चित्रांमुळे आदर्श जीवनाच्या वेगळ्याच कल्पना अनेकांच्या मनात घोळत असतात. स्त्रिया त्याला अपवाद नसतात. त्यातच सकाळी घराबाहेर पडून, सामान्य कमाईसाठी दिवसभर राबणाऱ्या नोकरदार महिला आणि त्यांच्याच आसपास वावरणाऱ्या उच्चभ्रू, उच्चशिक्षित आणि अधिकारामुळे प्राप्त झालेला आत्मविश्वास मिरविणाऱ्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या महिला असे तट नोकरदार महिलांमध्ये आपोआप तयार झालेले असतात. रेल्वेच्या पहिल्या वर्गातून प्रवास करणारी नोकरदार महिला, सेकंड क्लासच्या गर्दीतून लोंबकळत कार्यालय आणि परत घर गाठणारी महिला, भपकेबाज, शोफर ड्रिव्हन कारमधून प्रवास करणारी नोकरदार महिला असे अनेक वर्ग नोकरदार महिलांच्या दुनियेत असल्यामुळे यातील प्रत्येक वर्गाच्या समस्या आणि कुटुंबातील जबाबदाऱ्या हाताळण्याचा दृष्टिकोनही वेगवेगळाच असतो. तरीदेखील, सामान्य कुटुंबातील महिलेसाठी नोकरी हा जगण्याच्या संघर्षांचा अपरिहार्य भाग असल्यामुळे कुटुंबातील जबाबदाऱ्यांचे स्थान इच्छा नसतानासुद्धा दुय्यम ठेवावे लागते. ही खंत अनेक नोकरदार महिलांना सतावतानादेखील दिसते. कामाच्या ठिकाणी होणारा मानसिक ताण आणि नोकरीनिमित्त घराबाहेर राहावे लागल्यामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य कौटुंबिक समस्यांची चिंता यामुळे अनेक नोकरदार महिलांना रक्तदाब, हृदयदौर्बल्यासारखे विकार जडत असल्याचेही काही पाहणी अहवालांचे निष्कर्ष आहेत. नोकरी ही ज्या स्त्रियांच्या कुटुंबांची गरज असते, त्यांच्या कौटुंबिक आणि आरोग्यविषयक समस्याही वाढत जातात. अशा समस्यांना एकटी नोकरदार स्त्रीच जबाबदार असते का, नोकरी-व्यवसायानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या पतीचीही समान जबाबदारी असते किंवा नाही, हा अलिकडे एक वादविषय होऊ पाहात आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या कुटुंबांतील मुलांचे पोषण नीट होत नाही, त्यांच्या आहाराच्या सवयी बदलतात आणि घरातील एकटेपणा घालविण्यासाठी मुलांनी शोधलेल्या बैठ्या पर्यायांमुळे स्थूलपणासारखे विकारही बळावतात, असे एका पाहणीत आढळून आले होते. आर्थिक गरजा भागविण्यासाठी नोकरी करणाऱ्या आणि शैक्षणिक दर्जा उंचावल्यामुळे करीअर म्हणून नोकरी-व्यवसाय करणाऱ्या, अशा दोन्ही गटांतील स्त्रियांच्या मुलांमध्ये असे विकार वाढत असल्याचा निष्कर्ष या पाहणीतून समोर आला होता. नोकरदार महिलांचे घराकडे पुरेसे लक्ष नसल्यामुळे मुलांमधील हे विकार वाढतात, असे या पाहणी अहवालाचे मत आहे. पूर्णवेळ काम करणाऱ्या महिलांच्या तुलनेत, अर्धवेळ काम करणाऱ्या महिलांच्या मुलांमध्ये या विकारांचे प्रमाण कमी असते, तर पूर्णवेळ घरात असलेल्या महिलांच्या मुलांमध्ये ते आणखीनच कमी असते, असे आढळल्यानंतर, नोकरदार महिलांच्या मुलांमध्ये आरोग्याच्या तक्रारी अधिक असल्याचा निष्कर्ष या पाहणीतून काढण्यात आला. या अहवालावर तेव्हा संमिश्र प्रतिक्रियाही उमटल्या. मुलांच्या आरोग्याची जबाबदारी एकट्या स्त्रीची, म्हणजे आईचीच का असावी, वडिलांचीही तितकीच जबाबदारी असायला हवी, असा सूरही उमटू लागला. परंतु, मुलांच्या आरोग्याची जबाबदारी कुणाची असावी हा त्या पाहणीमागील महत्त्वाचा मुद्दाच नव्हता. महिलांनी नोकरीचे क्षेत्र निवडल्यानंतर त्या कुटुंबाच्या आरोग्याची घडी कुठेतरी विसकटते आहे, हे त्या पाहणीतून सामोरे आलेले जुने वास्तव विचारात घेणे आजही आवश्यक ठरले आहे. मुलांच्या आरोग्याची जबाबदारी केवळ आईचीच का, असा सवाल पुढे येऊ लागल्यानंतर, अशा जबाबदारीतील वडिलांचा वाटा हा चर्चेचा स्वतंत्र मुद्दा होऊ शकतो. मुलांचे आरोग्य, शाळा, खाण्यापिण्याच्या सवयी, दैनंदिन जीवनशैली याबाबतच्या सवयींवर पारंपरिक कुटुंबव्यवस्थेच्या संकल्पनेत आईचा प्रभाव असल्यामुळे या पाहणीची दिशा अशी ठरली असावी आणि त्यामुळे कदाचित असा निष्कर्ष काढला गेला असावा. तरीदेखील, या जबाबदाऱ्या केवळ आईच्या किंवा केवळ वडिलांच्या या वादाला तात्पुरते बाजूला ठेवून या समस्येवर विचार करणे अधिक गरजेचे आहे, हे या पाहणीमुळे अधोरेखित झाले आहे. कारण, आरोग्याच्या समस्यांनी ग्रासलेली पुढची पिढी मोठेपणी त्यासाठी नेमके कुणाला जबाबदार धरणार आहे, हे अजून स्पष्ट व्हायचे आहे. 'नोकरदारी' हे या समस्येचे मूळ असेल, तर त्यावरचा तोडगा काय, याचाही विचार आवश्यक आहे. आर्थिक गरजा भागविण्याची निकड आणि कौटुंबिक आरोग्य यापैकी कोणत्या बाबीला प्राधान्य हवे, हेही या निमित्ताने ठरले पाहिजे. नाही तर, जबाबदारीच्या वादात पुढच्या पिढीचे आरोग्य पणाला लागलेले असेल. अस्वस्थ भूतकाळातील या वास्तवाची जाणीव ठेवूनच सक्षमीकरणाची वाटचाल व्हायला हवी.

शनिवारी साजरा झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येस प्रसिद्ध झालेल्या केंद्र सरकारच्या पाहणी अहवालातून पुढे आलेल्या वास्तवाची एक बाजू आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे भान सांभाळत भूतकाळाचे सावट पुसून स्वतःसमोरील आव्हाने पेलण्यासाठी सक्षम होऊ पाहणाऱ्या वर्तमानाची दुसरी बाजू यातून महिलांच्या सद्यःस्थितीची दोनही रूपे समाजासमोर आली आहेत. यातील एक रूप आश्वासक आहे. सरकारनेही महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांना राज्यघटनेने बहाल केलेल्या समान संधींच्या अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी हाती घेतलेल्या अनेक उपक्रमांचा आणि योजनांचा सकारात्मक परिणाम आता देशात दिसू लागला आहे. एका बाजूला सामाजिक प्रथा, परंपरा आणि कौटुंबिक संस्कृतीचे प्रामाणिक पालन आणि दुसरीकडे विकासाच्या वाटचालीत जगासोबत चालण्याची उमेद अशा दोन्ही अनुभवांची शिदोरी महिलांना प्राप्त झाली आहे. एका अस्वस्थ भूतकाळाची सावली आता दूर होऊ पाहात आहे आणि आश्वस्त भविष्याची क्षितिजे महिलांना खुणावू लागली आहेत. या संधीचे सोने करण्यासाठी सरकारसोबत समाजानेही पठडीबाज विचारांच्या चौकटीबाहेर पडण्याची तयारी केली पाहिजे.

dineshgune @gmail.com

## रविवारची पत्रे

### देहदान प्रक्रिया , एक सुखद अनुभव

दि. ६ मार्च रोजी एम्स नागपूर येथे आईचे (वय ८९वर्षे) मरणोत्तर देहदान केले . या आधी देहदान प्रक्रियेबद्दल अनेकदा २०-२५ हजारांचा खर्च, वेळखाऊ प्रक्रिया असं उलटसुलट ऐकायला मिळाल्यामुळे आईची देहदानाची इच्छा योग्य रीतीने पूर्ण होईल का याविषयी मन साशंक होते व करायला धजत नव्हते. पण एम्स येथील ॲनाटॉमी विभागप्रमुखांना अवेळी केलेला फोन ज्या शांततेने आणि पूर्ण सहकार्याच्या आश्वासनाने उत्तरित केला गेला, त्यावरून समाधान झाले व धीर आला. आवश्यक प्रक्रिया, कागदपत्रांची माहिती व यादी व्यवस्थित देऊन ते तयार ठेवण्यास आम्हाला सांगण्यात आले व सोयीची वेळ विचारून त्यावेळेस एम्सची रुग्णवाहिका घरी येईल असे आश्वासन देण्यात आले.

दाराशी अगदी ठरलेल्या वेळी रुग्णवाहिका आली आणि त्यातील कर्मचारी, नम्रपणे आणि शांतपणे आईला नेण्याच्या कामात मदत करते झाले. आईचे पार्थिव सन्मानजनक स्थितीत ठेवतील ना, अशी शंका वारंवार मनात येत होती. पण तिथे गेल्यावर स्वतः विभागप्रमुखांनी सर्व सोपस्कार आपल्या देखत पूर्ण करवून घेतले. मृतात्म्यास श्रद्धांजली , देहदान केल्याबद्दल आभार या गोष्टी पूर्ण गांभीर्याने व नातेवाईकांच्या मनःस्थितीचा पूर्ण आदर करून पार पाडल्यानंतर कागदी प्रक्रिया,... आता इथे मात्र भरपूर वेळ जाईल असे वाटत होते, मनाची तयारीही होती. पण अक्षरशः पंधरा मिनिटांत पूर्ण कागदोपत्री प्रक्रिया संपवून आम्हाला देहदानाचे अधिकृत प्रशस्तिपत्र बसल्याजागी आणून देण्यात आले व आमच्या परतीच्या सोयीची चौकशी करण्यात आली.

हे सर्व झाले ४०-५०मिनिटांत.अगदी निःशुल्क. देहदानाविषयी आपल्याही शंका, गैरसमज दूर करण्यात कामी येईल म्हणून हा सुखद अनुभव शेअर करतोय.

**श्रीकांत दिवाकर सिरपूरकर**/ ९८२२२२५१२४

●●●

### विश्व हिंदू गर्व महाकुंभ पर्व एक अविस्मरणीय क्षण

वेद, शास्त्र, पुराणात कुंभस्नानाचे महत्त्व सांगितले आहे. भारतामध्ये ४ अतिशय पवित्र क्षेत्री हरिद्वार, प्रयाग, त्र्यंबकेश्वर, उज्जैन येथे पूर्ण किंवा अर्ध कुंभाचे आयोजन केले जाते. या वर्षीच्या तीर्थप्रयाग येथील कुंभ हा महाकुंभ म्हणून गणला जातो आहे. असे म्हणतात की कुंभामध्ये स्नान केल्याने सर्व पाप धुतले जातात व मोक्षाचे रस्ते उघडतात व पुण्य लाभते. महाकुंभाचे अनेक व्हिडीओज सोशल मीडियावर बघितले. तुफान गर्दी, कोट्यवधी भाविक अमृत स्नानाकरिता तीर्थप्रयाग येथे येत आहेत. सर्व ट्रेन्स फुल्ल, बसेस फुल्ल, विमानांची तिकिटे दुप्पट, तिप्पट, कार प्रवासाने अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी, तरी पण आम्ही सकारात्मक राहून ट्रेनने जाण्याच्या तारखा ठरवून जाण्या-येण्याचे रिझर्व्हेशन केले. अपेक्षेनुसार वेटिंग तिकीट मिळाले. पण निश्चय पक्का होता की कुठल्याही परिस्थितीत तीर्थप्रयाग येथे जायचेच. जसे जमेल तिथे रात्री काढायच्या व अमृत स्नान करूनच नागपूरला परतायचे. अनेक वर्षांपासून कुंभमध्ये जाण्याची जबरदस्त इच्छा होती. आमचे परिचित नागपूर येथील डॉ. मनोज तत्त्ववादी, विहिंप, नागपूर यांच्यासोबत बोलणे झाले व त्यांनी एका क्षणातच प्रयागराज येथे निवासाची सोय होईल असे सांगितले. आम्ही विचार केला की महाराजांच्या कृपेने निवासाची सोय झाली, आता नागपूरहून प्रयागराज येथे पण जाण्याची सोय महाराज नक्कीच करतील. जाण्याचा दिवस उजाडला. आम्ही नागपूर स्टेशनवर वेटिंग तिकीट घेऊन पोहोचलो... गाडी प्लॅटफॉर्मवर आलीच होती व खचाखच गर्दी, तिकीट परीक्षकाला आम्ही विचारपूस केली. ते म्हणाले, कुंभाला जात आहात का? पण कुठेच जागा मिळणार नाही. जनरलमध्ये अथवा कुठल्याही स्लीपर कोचमध्ये जिथे जागा मिळेल त्या बोगीत चढा. आम्ही जय श्रीराम म्हणत ट्रेनमध्ये चढलो. विचार करायला क्षणभर सुद्धा वेळ नव्हता.



लगेचच गाडी सुटली. आम्ही पण सुखावलो, कुठे तरी उभे राहायला जागा मिळाली. दोन समजूतदार व्यक्तींनी आम्हाला थोडी बसायला जागा दिली. ती महाराजांचीच कृपा होती. दिवसभराचा प्रवास करून गाडी रात्री ११.३० वाजता प्रयाग येथे पोहोचली. प्लॅटफॉर्मवर उतरल्यावर तिथल्या वातावरणात एक वेगळे चैतन्य जाणवले. रात्री १२ वाजता सुद्धा चांगलीच वर्दळ व तुफान गर्दी होती. ऑटो करून आम्ही सांगितलेल्या स्थळी जाण्यास निघालो. एका ठिकाणी शुद्ध शाकाहारी व बिना लसूण-कांद्याच्या भोजनाचा आनंद घेतला व पुढे जाण्यास निघालो.

प्रयागराज येथील स्वच्छ रस्ते, लखलखणारे दिवे, रोषणाई, पुलावरून जाताना कुंभचा संपूर्ण परिसर दिव्यांनी उजळून निघाला होता. अशी प्रचंड सोय एक आध्यात्मिक ओढ व दैवी शक्ती असणारी व्यक्तीच करू शकते, ती व्यक्ती म्हणजे उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ. उत्कृष्ट नियोजन असल्याचे उत्तम उदाहरण होय. आमची जेथे निवासाची सोय केली होती त्या स्थळी आम्ही येऊन पोहोचलो. रुख्मिणी मठ, मुक्तिमार्ग, सेक्टर १६ या ठिकाणी आमची राहण्याची उत्तम सोय होती. प. पू. जगद्गुरू श्री. राजेश्वरानंद माउली सरकार हे रुख्मिणी मठ, कौंडण्यपूरर, अमरावती जिल्हाचे पीठाधीश होय. तेथे अनेक तंबू उभारण्यात आले होते. स्वामीजींचे जवळचे सेवक गिरिधर यांनी आमची व्यवस्थित विचारपूस करून चांगली सोय केली. प्रचंड गर्दी असूनही आमचे त्रिवेणी संगमावर वसंत पंचमीच्या दिवशी छान स्नान झाले. ठिकठिकाणी पिण्याकरिता पाणी, पुरुष-महिलांकरिता स्वतंत्र शौचालय, जाण्या-येण्याकरिता अनेक पादचारी पूल, ठिकठिकाणी अनेक संतांनी मोठमोठे भंडाऱ्यांचे आयोजन केले होते व शासनाने पण ठिकठिकाणी भव्य महाप्रसादाचे आयोजन केले होते. ठिकठिकाणी अनेक प्रख्यात कथाकारांचे रामकथा, शिवपुराण, श्रीमद्भागवत कथा अशा अनेक पौराणिक कथांचे उत्तम आयोजन केले होते. भारतातील ६० कोटी भाविकांनी तीर्थराज प्रयाग येथे महाकुंभात येऊन अमृत स्नान केले. हा आकडा संपूर्ण विश्वात हिंदू शक्ती प्रदर्शनाचा महायोग व महाविक्रम होय. ४८ तासांतले अविस्मरणीय क्षण हृदयात साठवून आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. बघतो तर काय पू. ब्रह्मचैतन्य महाराजांच्या व पू. स्वामीजींच्या कृपेने आमचे परतीचे वेटिंग तिकीट कन्फर्म झाले होते.भारत देशने 'राम' रूप में मोदी नाम का पाया हिरा... 'श्याम' रूप में योगी नाम का मोती.

**आनंद पाठक**/ ९९७०६००१२३

●●●

### खरा महाराज, सज्जन, साधू, संत कोण ?

कोणत्याही व्यक्तीच्या पेहराव, पोशाखाकडे बघून किंवा शरीरावरील भगवे वस्त्र, दाढी, जटा, कपाळावरील गंध, तिलक गळ्यातील माळ, हातादंडावरील माळा यावरून कोणालाही खरा महाराज, सज्जन, साधू, संत समजण्याची चूक माणसाने करू नये. याबाबत वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज त्यांच्या एका भजनात प्रबोधन करताना म्हणतात... अंगी नाही ज्ञान म्हणे साधू मला मान, साधू नावानं साधू होत नाही रे, साधू हॉटेलचा चहा पाणी नाही रे ।।धृ।। ज्याला आत्मस्वरूपाचं ज्ञान झाले नाही ती व्यक्ती साधू होऊ शकत नाही. नुसतं साधू नाव ठेवल्याने, म्हटल्याने कोणी साधू होत नाही. कारण साधू काही हॉटेलचा चहापाणी नाही असं तुकडोजी महाराज म्हणतात. याच भजनाच्या पहिल्या कडव्यात तुकडोजी महाराज म्हणतात.. जंगलच्या अस्वलीला मोठमोठ्या जटा । पारधी लंगोटीने त्यागी दिसे मोठा । कुत्र्याच्या श्वानाच्या अंगावर भगव्याची छटा । गाढवाच्या अंगी नाही भस्माचा तोटा । साधू हॉटेलचा चहा पाणी नाही रे.. या पहिल्या कडव्यात तुकडोजी महाराज म्हणतात बाबारे.. जंगलातील अस्वलीच्या अंगावर भरपूर केस असतात. पारध्याच्या अंगावर लंगोटी असते. श्वानाच्या अंगावर भगव्या रंगाच्या छटा असतात. जमिनीवर लोळून लोळून गाढवाचे अंग भरपूर भस्म लागल्यासारखे दिसते. यात प्रबोधन करताना महाराज म्हणतात की एखाद्या व्यक्तीने चेहऱ्यावर दाढी मिशा वाढविल्याने डोक्यावर लांब लांब केस जटा वाढविल्याने, अंगावर कमीत कमी कपडे तसेच भगवे वस्त्र घातल्याने, अंगावर भस्म लावल्याने ती व्यक्ती काही साधू होत नाही. त्या व्यक्तीच्या बाह्य स्वरूपावरून तिला साधू समजू नये. या भजनाच्या दुसऱ्या कडव्यात तुकडोजी महाराज म्हणतात.. साधूचं साधूत्व नाही पंथात । साधूचं साधूत्व नाही तीर्थात। साधूचं साधूत्व नाही वर्णात । जाती पातीत नाही साधूची मात। यात प्रबोधन करताना महाराज म्हणतात की खऱ्या साधूचं साधुत्व हे कोणत्याही पंथात, तीर्थात, वर्णात मर्यादित नसते. साधूचं साधुत्व हे जातिपातीपुरतं मर्यादित नसते. भजनाच्या तिसऱ्या कडव्यात तुकडोजी महाराज म्हणतात.. सत्याचरणाविण साधूत्व नाही। आत्मज्ञानाविण साधूत्व नाही। प्रभु भजनाविण साधूत्व नाही। सेवाभावाविण साधूत्व नाही। तुकड्यादास म्हणे ऐका ही ग्वाही.. यात प्रबोधन करताना महाराज म्हणतात ज्याचं आचरण नेहमी चांगले आहे, जो नेहमी सत्य बोलतो, ज्याला आत्मस्वरूपाचं ज्ञान झाले आहे, जो नेहमी प्रभूचं नामस्मरण भजन करतो, जो तळमळीने समाज प्रबोधन करतो तोच खरा साधू होय अशी ग्वाही वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजनातून देतात. मग खरा महाराज, सज्जन, साधू, संत कोण? जो नेहमी ईश्वराचे नामस्मरण भजन करतो, जो सर्व प्राणिमात्रांवर दया, प्रेम करतो, जो जनतेलाच जनार्दन समजून जनतेची सेवा करतो, जो अन्नदान ज्ञानदान करतो, जो परोपकारी कार्य करतो, जो कोणालाही त्रास देत नाही, पात्र नसताना जो सरकारी योजनांचा लाभ घेत नाही, भजन कीर्तन प्रवचन सेवेचा जो मोबदला घेत नाही, घेतलेले कर्ज जो वेळेत परत करतो, देशाच्या विकासासाठी दरवर्षी आयकर लागत असल्यास जो सरकारकडे जमा करतो, रंजले गांजले आंधळे पांगळे गरजूंना जो मदत करतो, मानसिक, शारीरिक, आर्थिक आधार देतो, भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, दुःखी निराश झालेल्यांना जो हिंमत देतो, ज्याला आईवडिलांच्या आशीर्वादामुळे गुरुकृपेने ईश्वराच्या कृपेने आत्मज्ञान झाले आहे, आत्मपरमात्म तत्त्वाचा साक्षात्कार झाला आहे, जो या विश्वाला ईश्वराचे स्वरूप (ब्रह्मस्वरूप) समजतो तीच व्यक्ती खरा महाराज, सज्जन, साधू संत होय.

**अशोक पंडित**/ ९९२२२३६७७३

●●●

### महिला दिनी यांचाही सन्मान होणे गरजेचे

आपण इतिहास जर पाहिला तर त्यात आपल्याला कर्तृत्व गाजवणाऱ्या उदाहरणार्थ झाशीची राणी लक्ष्मीबाई, जिजामाता, राणी चेनम्मा या व यासारख्या अनेक कर्तृत्वशाली महिलांची मांदियाळी पाहायला मिळते. यांनी आपल्या तेजाने इतिहास गाजवलाच नव्हे तर इतिहासात मनाचे स्थानही मिळवले. इतिहासात त्यांची नोंद सुवर्ण अक्षरांनी झाली आहे. भारतीय इतिहास त्यांचे अमूल्य योगदान कधीही विसरणार नाही. झाशीची राणी लक्ष्मीबाई, जिजामाता अशा स्त्रिया केव्हा स्वतःपुरता किंवा एखाद्या विशिष्ट समाजापुरता मर्यादित नव्हत्या. तर त्या समस्त स्त्रीशक्तीच्या प्रतीक म्हणून गौरवल्या गेल्या. खरं तर ही स्त्री शक्ती केवळ या स्त्रियांकरिताच मर्यादित होती का? तर नक्कीच नाही. इतिहासात अशा काही मोजक्याच स्त्रिया आहेत त्यांच्याबद्दल आपल्याला माहीत आहे. परंतु इतिहासात नाव नोंदवल्या गेलेल्या अशाही अनेक स्त्रिया आहेत ज्यांनी इतिहासात घडवण्यात योगदान दिले परंतु इतिहासाने त्यांची नोंद कधीच घेतली नाही. हल्ली आजची स्त्री घर, संसार, मुले याबरोबरच पतीची आर्थिक बाजूही सांभाळते. नोकरी किंवा व्यवसाय व घर अशी तारेवरची कसरत ती लीलया पार पाडते. ही स्त्री सर्वसामान्य माणसाची पत्नी असो वा असामान्य काम करणाऱ्यांची पत्नी असो. कुठल्याही परिस्थितीत तिचे योगदान महत्त्वपूर्णच असते. एखादा ख्यातनाम पुरुष वेगवेगळ्या क्षेत्रांत मोठमोठाली कामे करतो. प्रसिद्धी मिळवतो, पैसा मिळवतो. तेव्हा त्या पुरुषाची स्त्री अभिमानाने त्याच्यासोबत मिरवते तेव्हा तिच्या भाग्याचा सर्वांनाच हेवा वाटतो. परंतु पती कार्यमग्न असताना त्याच्या अनुपस्थितीत तिने सांभाळलेल्या घर, संसाराच्या जबाबदाऱ्या व त्या पूर्ण करताना होणारी तिची मानसिक व शारीरिक ओढाताण मात्र कुणालाच दिसत नाही. मुलांचे शिक्षण सासू-सासरे, त्यांचे आजारपण, त्यांची दुखणी, त्यांची सेवा करणे, एखाद्या मंगल कार्यात समारंभात पतीसोबत मिरवण्याची इच्छा असताना देखील पतीच्या अनुपस्थितीमुळे एकटीने हजर राहावे लागणे. हे केवळ पतीचे कार्य अखंड चालावे, त्यात विघ्न येऊ नये म्हणून स्त्रियांना असल्या हौशी मौजीचाही त्याग करावा लागतो. या प्रकारे का होईना अप्रत्यक्षपणे पतीच्या कार्यात पती सहयोग करणाऱ्या स्त्रियांचे त्याग व कष्ट प्रकाश झोतात येत नाही. किंबहुना त्यांच्या या कार्याचा साधा संदर्भही इतिहासात कुठे आढळत नाहीत. पौराणिक काळातील उदाहरण द्यायचे झाले तर श्रीराम पत्नी सीतामाईचे वनवासातील दुःख सर्वांनाच ज्ञात आहे. परंतु लक्ष्मण पत्नी उर्मिला पती विरहात एकटीच आयोध्येत राहिली. वनवासात जाण्यापूर्वी लक्ष्मणाने उर्मिलावर आई-वडिलांची सेवा करण्याचे दायित्व सोपवले. असे म्हणतात लक्ष्मणाला भाऊ श्रीराम व माता सीतेची सेवा अहोरात्र करायची होती. पण त्याची झोप आडवी यायची. तेव्हा त्यांनी निद्रा देवीला विनंती केली की त्याच्याऐवजी त्याची झोप त्याची पत्नी उर्मिलाला यावी व आपल्या झोपेची जबाबदारी ही त्यांनी स्वतःऐवजी उर्मिलावर सोपविली. तिचा चौदा वर्षाचा कालावधी सासूची सेवा करण्यात व झोपण्यातच गेला. तिला तिचे वैयक्तिक असे आयुष्य उरले नाही. तिच्या या दुःखाची व त्यागाची ओळख जगाला कमीच आहे महाभारत काळात पांडवपत्नी द्रोपदीचे अपमान व कष्ट सर्वांनाच ठावूक आहे पण पांडवाच्या इतर पत्नी जसे युधिष्ठिराची पत्नी देविका, भीमाची पत्नी हिडिंबा व बलांधरा, सहदेवाची पत्नी विजया, पराक्रमी व सर्वश्रेष्ठ धनुर्धारी अर्जुनाची पत्नी चित्रांगदा जिने अर्जुनाशी विवाह करण्यासाठी प्रथम अपत्याचाही त्याग केला. तसेच इतर अर्जुन पत्नी जशी उलुपी, प्रमिला व सुभद्रा पांडवाच्या इतर पद्धतींचा त्याग व त्यांना झालेला पतिविरह याचा महाभारतात कुठेच उल्लेख नाही. अशा अप्रत्यक्षपणे योगदान देणाऱ्या स्त्रियांचा समाज सदैव ऋणी राहील.

**हेमांगी देशपांडे**/ ७३५०८२३७४२

●●●

### अल्पवेळ काम करून जनतेशी करीत असलेली प्रतारणा?

कर्मचाऱ्यांना जेव्हा आठवा वेतन आयोग देणे किंवा तत्सम पगारवाढ करणे अशा बाबी करत असताना ते कर्मचारी खरंच त्या पगाराचा मोबदला देत आहे ना, याची देखील खात्री करून घेणे आवश्यक आहे. आज कार्यालयात मग ते आरोग्य खातं असू दे की इतर कोणतेही, प्रत्येक कार्यालयात काही कर्मचारी खरंच आपल्या कामाशी, आपल्या पगाराशी प्रामाणिक आहेत का? कामाच्या ठिकाणी आल्यावर सकाळी चहा, दुपारी आणि संध्याकाळी चहा, डबा किंवा नाश्ता खाण्यात घालवलेला अत्याधिक वेळ, वरून गप्पागोष्टी त्यातच एखादी फाईल आली तर चिरीमिरीसाठी केलेला आग्रह, अशी दयनीय अवस्था शासकीय कार्यालयात दिसून येते. वरिष्ठ अधिकाऱ्यांची याबाबतची उदासीनता बघवत नाही. डोळ्यासमोर घडत असलेला गैरप्रकार उघड्या डोळ्यांनी पाहणे किंवा त्यात सामील होणे, अशी भूमिका ते ठेवतात. पाच किंवा सहा दिवसांपैकी दोन दिवस कामावर रुजू राहणे, तीन दिवस आपल्या घरी राहणे, वैयक्तिक कामे करणे किंवा सहा वाजेपर्यंत कार्यालयाचा वेळ असेल तर एक दीड वाजता कामे बंद करून घरी येणे, बरेच जण अशाप्रकारे वागतात. त्यामुळे कोणी कोणाला बोलू शकत नाही. ज्या कामासाठी शिपायांची नियुक्ती केली ते साहेबांपेक्षाही वरचढ झालेले दिसून येतात. काम करण्याची त्यांचीही मानसिकता कमी झाल्याचे लक्षात येते. कर्मचाऱ्यांची अशी मानसिकता होण्यामागे काय कारण असावे बरे? कुठलीही कारवाई त्यांच्याविरोधात होत नाही. कदाचित शिक्षेची भीतीसुद्धा कमी झाली असेल. 'मी सेवक' या भूमिकेत न राहता येथील 'मालक' आहे. त्यामुळे जनतेला कसेही हाताळले तरी चालते, अशी मानसिकता त्यांनी करून घेतल्याचे दिसते. माझी सर्व कर्मचाऱ्यांना विनंती आहे की, आपण आपले काम चोख आणि प्रामाणिकपणे करून देशाला पुढे न्यावे. जनतेची लूट करू नये. तळागाळात बोकाळलेला भ्रष्टाचार आपल्या एका कृतीने कमी होऊ शकतो. गरज आहे ती फक्त विचार बदलवण्याची, एक सेवक म्हणून वर्तन करण्याची.

**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/ ९४२१७७३९९९

●●●

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# रुग्णांना मोफत उत्तम दर्जाच्या वैद्यकीय सेवा देणार : आयुक्त

**▸▸ नूतनीकृत दाराशा प्रसुतीगृहाचे लोकार्पण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च,**

शहरातील रुग्णांना मोफत उत्तम दर्जाच्या वैद्यकीय सेवा सुविधा देण्यात येणार आहेत.नागरिकांनी या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त बालाजी स्पेशालिटी केमिकल्स लिमिटेड कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व ९५ लाख रुपये निधीतून नूतनीकरण केलेल्या सदर बाझार परिसरातील महापालिकेच्या दाराशा प्रसुतीगृहाचा लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी बालाजी स्पेशालिटी केमिकल्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, अनिल विपत, आरोग्याधिकारी डॉ.राखी माने आदी उपस्थित होते.

याप्रसंगी रेड्डी यांनी यापूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रसूतिगृहाचे नूतनीकरण केले होते आणि सध्या नागरिकांना मिळणाऱ्या सुविधा पाहून त्याबद्दल महानगरपालिका प्रशासनाचे कौतुक केले. ''दाराशा'' मध्येही चांगले काम होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी बालाजी अमाईन्सचे आर्किटेक्चर असीम सिंदगी, मल्लीनाथ बिराजदार, अमोल कनशेट्टी, दत्तप्रसाद सांजेकर आणि टिमचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विभागीय अधिकारी हिदयात मुजावर, नागनाथ बाबर, महेश क्षीरसागर, नंदकुमार जगधनी, अंतर्गत लेखापापरीक्षक राहुल कुलकर्णी, युवराज गाडेकर, किशोर सातपुते, डॉ. रेणुका लहांडे, डॉ. मंजुषा चाफळकर, भूलतज्ञ डॉ. चिडगुपकर, डॉ सतीश दोशी, डॉ.विजयकुमार चौगुले, शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ.अतिश बोराडे, डॉ.सुहासिनी वाळवेकर, डॉ. लता पाटील, डॉ. तन्वांगी जोग आदी आदी उपस्थित होते.

# व्यवसायांना बळकटी देणारी विश्वकर्मा योजना

**▸ ८२१ पैकी १५५ अर्जदारांना कर्ज मंजूर, ९६ लाभार्थ्यांना कर्जवाटप**

**तभा वृत्तसेवा। अमोगसिध्द मुंजे**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

पारंपारिक व्यवसाय असणाऱ्या आणि हाताने व साधनांच्या मदतीने काम करणाऱ्या हस्तकलाकार व कारागिरांचे कौशल्य जोपासणे त्यांची दर्जा सुधारणे, तसेच त्यांनी उत्पादने केलेली सेवा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवून जागतिक मूल्य साखळीशी जोडले जावे या उद्देशाने पंतप्रधान विश्वकर्मा योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्या परीषदेकडे ४४३७अर्जदारांनी नोंदणी केले असून त्यापैकी ३६६५अर्जदारांना मान्यता देण्यात आली आहे. तर ७६२ नवीन अर्जदारांनी नोंदणी केली आहे.

पंतप्रधान विश्वकर्मा योजना ही देशातील अठरा भारतीय कुटुंबावर आधारित व्यवसाय करणाऱ्या आणि १४० जाती असणाऱ्या लोकांसाठी सुरू करण्यात आलेली योजना आहे. कुटुंबात स्वयंरोजगार निर्माण करणे हा त्यामागील




हेतू आहे . यामध्ये पारंपारिक व्यवसायाला महत्त्व देण्यात आले असून शिंपी व्यवसायाला वगळण्यात आला आहे. ही प्रक्रिया ऑनलाइन करण्यात आले असून ग्रामपंचायत व जिल्हा परीषदेकडून खादी ग्रामोद्योगकडे मंजूरी देण्यात येते. त्यानंतर जिल्हा परीषदेकडून लाभार्थ्यां संदर्भात बँकांना सुचविण्यात येत त्यामुळे पंतप्रधान विश्वकर्मा योजना ही पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या तरुणांसाठी लाभदायक ठरत आहे. विशेष म्हणजे या योजनेत व्यवसायांसाठी कर्जमर्यादा निश्चित करण्यात आले नसल्याने व्यवसायानुसार कर्ज व्यवसायानुसार जास्त कर्ज मिळू शकते . त्यामुळे अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज करून ग्रामपंचायत व जिल्हा परीषदेशी संपर्क साधणे गरजेचे आहे. व्यवसाय करणाऱ्या तरुणांना पंधरा दिवस प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षणानंतर संबंधित व्यवसायाचे टूलकिट तसेच पंधरा दिवसाचे १५ हजार रूपये प्रोत्साहन अनुदानही देण्यात येते.

**तरूणांना फायदेशीर :** पंतप्रधान विश्वकर्मा योजना ग्रामीण भागातील कुटुंबावर आधारीत व्यवसाय करणाऱ्या तरूणांना फायदेशीर आहे. तरूणांनी व्यवसायाला लागणाऱ्या कर्जासाठी जिल्हा खादी ग्रामोद्योग कार्यालयाशी संपर्क साधावे. पंतप्रधान विश्वकर्मा योजनेमुळे पारंपारीक व्यवसायाना बळकटी मिळत आहे.

**- ध्रुवकुमार बनसोडे, अधिकारी, जिल्हा खादी व ग्रामोद्योग**

**कारागिरांना व्यवसाय उभारण्याची संधी :** पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी ग्रामपंचायत किंवा सीएससी केंद्रावर ऑनलाईन अर्ज करावे. त्यानंतर त्यांची निवड होऊन प्रशिक्षणानंतर टूलकिट व प्रोत्साहन अनुदान देण्यात येते. कर्जमर्यादा निश्चित नसल्याने अधिक रोजगारांसाठी व्यवसाय उभारण्याची संधी आहे.

**- महावीर काळे, समन्वयक, पंतप्रधान विश्वकर्मा योजना, जिल्हा परीषद सोलापूर**

**विश्वकर्मा योजनेसाठी नियम**

कुटुंबाचा व्यवसाय पारंपरिक व हस्त असावा . पाच वर्षात कोणतेही अनुदान योजनेतून कर्ज घेतला नसावा . शासकीय कर्मचारी असू नये . ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

**योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे**

आधार कार्ड, रेशन कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र व फोटोसह लाभार्थ्यांनी ग्रामपंचायत किंवा सीएससी सेंटरवर ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे

**योजनेतील समाविष्ट व्यवसाय**

सुतार, लोहार, कुंभार, सोनार, शिल्पकार, पाथरवट, दगडी काम करणारे कारागिर, चर्मकार, मिस्त्री, बाहुल्या व खेळणी बनवणारे कलाकार, फुलांपासून हार बनवणारे, न्हावी, परीट व मासेमारीसाठी जाळी तयार करणारे यासह व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांचा समावेश करण्यात आहे.

**जिल्हा परिषद शाळा उद्यापासून सकाळी**

# वेळेबाबत शिक्षक संघटनांचा विरोध



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च,**

सोमवार १० मार्चपासून जिल्हा परीषद शाळा सकाळच्या सत्रात सकाळी ७.३० ते १२.३० या वेळेत भरणार आहे. मात्र दुपारी १२ नंतर ऊन्हाची तीव्रता अधिक असल्याने सकाळी ११.३० वाजे पर्यंत शाळेची वेळ ठेवण्यात यावे, अशी मागणी शिक्षण अधिकारी कादर शेख यांच्याकडे शिक्षक संघटनांनी केली आहे. शिक्षण अधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

फेब्रुवारी महिन्याच्या सुरूवातीपासून ऊन्हाचा पारा ३५ अंशाच्या पुढे तर मार्च महिन्याच्या पहिल्या आठवडयात ऊन्हाचा पारा ४० अंशापर्यंत पोहोचल्याने दुपारच्या सत्रातील जिल्हा परीषद शाळांची वेळ बदलून सकाळच्या सत्रात शाळा सुरू करण्याची मागणी पालक व शिक्षकांमधून होत होती. बुधवारी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, प्राथमिक शिक्षण अधिकारी कादर शेख व शिक्षण समितीच्या बैठकीत सोमवार १० मार्चपासून जिल्हा परीषद शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याबाबत शाळांना आदेश देण्यात आले आहेत. सध्या ऊन्हाची तीव्रता अधिक असल्याने व दुपारी १२ वाजल्यानंतर ऊन्हाची चटके अधिक बसत असल्याने मुलांना त्रास होण्याची शक्यता आहे. शिवाय वाडया वस्त्यांवरील मुलांना उष्माघातासारखा त्रास होण्याची शक्यता असल्याने शाळांची वेळ बदलण्यात यावे, अशी शिक्षक संघटनांची मागणी आहे. जिल्हा परीषद शिक्षण विभागाने सोमवार पासून सकाळी ७.३० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत शाळा भरविण्याच्या सूचना दिली आहेत. मात्र शिक्षक संघटना दुपारी १२.३० ऐवजी ११.३० पर्यंत शाळा सुरू ठेवण्याची मागणी करीत आहेत.

**शाळांच्या वेळेत बदल करावा**

ऊन्हाची तीव्रता अधिक असल्याने मुलांसह शिक्षकांनाही त्रास होत आहे. चार पाच वर्षांपासून शाळा ११.३० वाजता सुटते. त्यामुळे सर्व शिक्षक संघटना व समन्वय समितीनी शाळेची वेळ सकाळी ७.३० ते ११.३० ची मागणी केली आहे. शिक्षण अधिकाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या सोबत चर्चा करणार असल्याचे तोंडी सांगितले आहे.

**- पंडीत साबा, तालुकाध्यक्ष, दक्षिण सोलापूर**



# 'शौचालय हटाव'साठी १ लाख सिद्धेश्वरभक्त आयुक्तांना धाडणार पत्र

**● बसव ब्रिगेडतर्फे सोमवारी 'पत्र मोहिमे'चा शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मार्च,**

सोलापूरचे स्वाभिमानबिंदू ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज मंदिराच्या ईशान्येकडील प्रवेशद्वार शेजारील शौचालय तातडीने हटवण्याच्या मागणीचे पत्र १ लाख सिद्धेश्वर भक्त आयुक्तांना धाडणार असल्याची माहिती बसव ब्रिगेडचे शहराध्यक्ष अमित रोडगे यांनी दिली.

ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज मंदिराच्या लक्ष्मी मार्केट समोरील प्रवेशद्वारालगत असलेले शौचालय हटवण्याबाबतची मागणी मागील अनेक वर्षांपासून शहर जिल्ह्यातील सिद्धेश्वर भक्त, सामाजिक धार्मिक संघटना व महिला मंडळांनी महापालिका प्रशासनाकडे व्यक्त केली आहे. मात्र याकडे महापालिका प्रशासन डोळेझाक करीत असल्यामुळे हे अभिनव आंदोलन छेडण्याची वेळ आली असे श्री रोडगे म्हणाले.

ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर हे प्रत्येक सोलापूरकराचे श्रद्धास्थान असून हिंदू धर्म आणि वास्तुशास्त्रानुसार ईशान्य दिशेचे महत्व लक्षात घेता ईशान्य दिशेला पवित्र स्थान मानले जाते, परंतु श्री सिद्धेश्वर महाराज मंदिराच्या ईशान्येकडील प्रवेशद्वारालगत महापालिकेने शौचालय बांधून मंदिराच्या पावित्र्यास धोका निर्माण केला आहे.त्यामुळे भक्तांच्या भावना दुखावल्या जात आहेत. तेव्हा आम्हा श्री सिद्धेश्वर महाराज भक्त मंडळींच्या भावना लक्षात घेऊन सदरचे शौचालय तातडीने हटवण्यात यावे. अशा पद्धतीच्या मागणीचे पत्र १ लाख सिद्धेश्वर भक्तांच्या नाव, मोबाईल नंबर व स्वाक्षरीसह बसव ब्रिगेडचे कार्याध्यक्ष शिवराज विभूते यांच्या संकल्पनेतून देण्यात येणार आहे. या पत्र मोहिमेचा शुभारंभ सोमवार दि. १० मार्च रोजी श्री सिद्धेश्वर मंदिरात करण्यात येणार आहे.

या पत्र मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन बसव ब्रिगेडच्या वतीने करण्यात आले आहे. या मोहिमेत सहभागी होण्यासाठी करिता शिवराज विभूते ७२४९४४४७४, अमित रोडगे ८३३०९०२११२, बसवराज चाकाई ९०९६४५२११६, जतिन निमगाव ९२२६३४१२०८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन बसव ब्रिगेड तर्फे करण्यात आले आहे.

# ज्ञानप्रबोधिनीच्या वक्तृत्व स्पर्धेत मुंडे, पिंपळनेरकर, राठोड प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च -**

येथील ज्ञान प्रबोधिनीच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतरशालेय बालविकास वक्तृत्व स्पर्धेत पाचवी ते सातवी गटात हरिभाई देवकरण प्रशालेतील शिवरत्न मुंडे, व आठवी ते दहावी गटात दमाणी प्रशालेची सई पिंपळनेरकर व ज्ञानप्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशालेतील कृष्णा राठोड (विभागून) यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

दोन गटांतून झालेल्या या स्पर्धेत शहरातील १५ शाळांमधील ७२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दोन्ही गटातून नऊ विद्यार्थ्यांनी पारितोषिक पटकावले. त्यामध्ये शिवरत्न मुंडे, सई पिंपळनेरकर, कृष्णा राठोड हे प्रथम आले. चंडक प्रशालेतील अंशुमन नडगेरी, मॉडर्न हायस्कूलची निरीषा शंकरशेट्टी यांनी द्वितीय



क्रमांक मिळवला. दमाणी प्रशालेची रिद्धी शिंदे व सिध्देश्वर प्रशालेची अनत्ती शिंदे तृतीय आली. ठोकळ प्रशालेची वेधी काळे व सेवासदन प्रशालेची श्रावणी सोनग्रा यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. बक्षिस वितरण दयानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या शारदा जांभळे यांच्या हस्ते झाले. मुख्याध्यापिका सुनीता चकोत यांनी पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कौशल्यांचे कौतुक केले.

# सोलापुरात वंदे भारत एक्स्प्रेसमध्ये महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मार्च -**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने वंदे भारत एक्सप्रेसमध्ये महिला तिकीट तपासणी पथकाच्या नेतृत्वाखाली आंतरराष्ट्रीय महिला दिन २०२५ साजरा केला.

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने आंतरराष्ट्रीय महिला दिन २०२५ (८ मार्च) निमित्त सोलापूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई - सोलापूर वंदे भारत एक्सप्रेस (ट्रेन क्रमांक २२२२६/२२२२५) मध्ये महिलांच्या नेतृत्वाखाली तिकीट तपासणी पथक तैनात केले होते. हा उपक्रम महिला सबलीकरणाला चालना देण्यासाठी आणि रेल्वे कर्मचाऱ्यांमध्ये




महिलांच्या अमूल्य योगदानाची दखल घेण्याच्या विभागाच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकतो.या विशेष प्रसंगी तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांच्या नेत्रुत्वाखाली कर्तव्य बजावण्यासाठी खालील महिलांची नियुक्ती करण्यात आली होती. यामध्ये वरिष्ठ तिकिट परिक्षक लक्ष्मी आर फुलारी, मुख्य तिकीट निरीक्षक शिल्पा सी. भालेकर, प्रिती व्ही. धवणे, प्रवासी तिकीट तपासनीसअहिल्या व्ही. राठोड, लॉर्डेस डी. कॉनलोन यांचा समावेश होता. सर्वसमावेशक आणि वैविध्यपूर्ण कामकाजाचे वातावरण निर्माण करताना महिला रेल्वे कर्मचाऱ्यांनी आजवर दिलेल्या समर्पणाप्रती आदर करणे आणि त्यातुंन महिलांचा सम्मान करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. महिला कर्मचाऱ्यांनी रेल्वे सेवेवरील तिकीट-तपासणी कर्तव्ये कुशलतेने व्यवस्थापित केली, ज्यामुळे त्यांची क्षमता आणि प्रवासी सेवा आणि रेल्वे ऑपरेशन्सची बांधिलकी दिसून येते.

मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग महिलांसाठी संधी निर्माण करण्यासाठी आणि रेल्वेच्या सर्व क्षेत्रात त्यांच्या सक्रिय सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी समर्पित आहे.

## सर्वोत्तम जीवन उपलब्धवर लक्ष

**सोलापूर :** आपले पालक आणि मुलांना सर्वोत्तम जीवन उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित केल्याने, भारतातील सँडविच पिढी स्वतःच्या भविष्यासाठी तयार नाही असे वाटते.मी कितीही बचत केली किंवा गुंतवणूक केली तरी ती भविष्यासाठी पुरेशी नाही, असे मत ६०% लोकांनी व्यक्त केले आहे.

# कला, क्रीडा व संगणक शिक्षकांची १४९७ पदांची भरती

**कंत्राटीवर काम करणाऱ्या शिक्षकांना दिलासा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च -**

राज्यात आदिवासी विकास विभागाच्या आश्रम शाळांमध्ये कंत्राटी पद भरतीमुळे येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी आणि कायम करण्याच्या धोका टाळण्यासाठी आता शासकीय आश्रम शाळेमध्येही समग्र शिक्षाच्या धर्तीवर शिक्षक भरती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या शाळेमधील संगणक क्रीडा आणि कला विषयाच्या १४९७ शिक्षकांचे पदे निविदा काढून बाह्य यंत्रणाद्वारे भरण्यात येणार आहे. यासाठी ८१ कोटी खर्च होणार आहे.

राज्यातील आश्रम शाळेतील भरती प्रक्रिया ही अनेक वर्षांपासून न्यायालयीन प्रक्रिया, आदिवासी क्षेत्राच्या परीक्षा बंदी व इतर कारणांमुळे रखडले होते. मात्र न्यायालय निकाल लागल्याने भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. आदिवासी विकास विभागाच्या आयुक्ताने आदेशानुसार राज्यातील असंख्य आश्रमशाळा मध्ये कला क्रीडा व संगणक शिक्षकांची कायमस्वरूपी नियुक्ती देण्यात येणार आहे. २०१८-१९ पासून क्रीडा, संगणक व कलाशिक्षक कंत्राटी भरतीवर नियंत्रित करण्याचा निर्णय आदिवासी विकास विभागाने घेतला होता. त्यानुसार ११ महिन्याच्या करारावर ही पदे भरण्यात आली आहेत. नोव्हेंबर २०२२च्या शासन निर्णयानुसार क्षेत्रीय कार्यालयाच्या सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे.

**अशी होणार शिक्षकांची भरती**

कला : ४९९ , क्रीडा : ४९९, संगणक ४९९, एकूण १४९७.

**सरकारकडून न्याय मिळण्याची अपेक्षा**

अनेक वर्षापासून कंत्राटी पद्धतीवर मिळेल त्या शैक्षणिक संस्थांमध्ये काम करत होतो. आश्रमशाळेत कायमस्वरूपी पद भरती केल्यास व परीक्षेच्या माध्यमातून भरती प्रक्रिया सुरू झाली तर आम्हाला नक्कीच न्याय मिळेल आणि रोजगाराचाही प्रश्न मिटेल. शासनाने लवकर निवड प्रक्रिया लवकर करावी. **-चिमराया कांबळे,** कला शिक्षक, येळेगाव, तालुका दक्षिण सोलापूर

**विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव**

राज्यात ज्या प्रमाणे पवित्र पोर्टल मार्फत शिक्षक , प्राध्यपाकांची भरती प्रक्रिया सुरू आहे.त्याप्रमाणे अनेक वर्षे करारावर काम करणारे कला क्रिडा संगणक शिक्षकांची कायमस्वरूपी नियुक्ती झाली तर नक्कीच विद्यार्थ्यांना व्यवसायिक व आधुनिक तंत्रज्ञान ज्ञान मिळेल. यामुळे विद्यार्थ्यांचा कलागुणांचा विकास होईल. **- प्रशांत शिरगूर,** राज्य उपाध्यक्ष, डी.एड.,बी.एड. असोसिएशन.

Classifieds

**भाड्याने देणे**

**युनिक हॉस्पिटलजवळ सलग २ गाळे ऑफिस, कुरिअर, डॉक्टर, वकील, थेरपीसेंटर, एजन्सी, गोडाऊन वगैरेसाठी भाड्याने देणे. विष्णू पंपटवार-९८८१२४३६९०**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढील नेमली तारीखः ८/४/२०२५
दि.कि.अ.नं. ३४/२०२५

**बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि न्यायाधिश यांचे न्यायालयात मे. एच.यु. यु. पाटील कोर्ट**

१) सिध्दांत सागर कोठारी, वय-०९ वर्षे, धंदा-शिक्षण, रा.७८३, कसबापेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर-अज्ञान
२) रेयांश सागर कोठारी, वय ०३ वर्षे, धंदा-शिक्षण, रा.सदर- अज्ञान
३) स्वानुभुती सागर कोठारी, वय ३५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर, (स्वतः करीता व अज्ञान मुले अर्जदार नं.१,२ चे अ.पा.क.आई म्हणून) **-- अर्जदार**
४) जागृती जयेश कोठारी, वय ६५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर

**विरुध्द**

**कोणी नाही** **-- सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं.१,२ हे सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार नं.३ ही त्यांची आई आहे अर्जदार नं.४ ही अर्जदार नं. ३ चे मयत पती सागर जयेश कोठारी यांची आई आहे अर्जदार नं.१,२ चे वडिल म्हणजेच अर्जदार नं.३ चे पती व अर्जदार नं.४ चा मुलगा सागर जयेश कोठारी हे दिनांक १२/१२/२०२४ रोजी बार्शी येथे मयत झालेले आहेत. मयत सागर जयेश कोठारी यांचे वडिल जयेश किशोर कोठारी हे दि. २३/०४/२०२३ रोजी मयत झालेले आहेत मयत सागर जयेश कोठारी हे त्यांचे हयातीत B.P.C.L. या कंपनीचे डिस्ट्रीब्युटर होते ते मयत झालेने अर्जदार नं.३ यांनी सदर कंपनीचे कार्यालयाकडे डिस्ट्रीब्युटरशिप तिचें नांवाने ट्रान्सफर करणेबाबत विनंती केली असता तेथील अधिकारी यांनी ता.०२/०१/२०२५. रोजी तुम्ही हेअरशिप/वारस प्रमाणपत्र आणा त्याशिवाय तुम्हास लाभ देता येणार नाही असे सांगितले तसेच अन्यहि शासकीय, कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता वारस हेअरशिप प्रमाणपत्राची गरज आहे असे कथन करून अर्जदारानी हेअरशिप/वारस प्रमाणपत्राची मागणीचा अर्ज केलेला आहे. त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनांसंबंधाने कोणाचे कांही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे कांही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिध्दी करण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली ता. ८/४/२०२५ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील योग्य ते आदेश होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व. मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केलेअसे. तारीखः ६/२/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर, बार्शी**

शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर. बार्शी**

**जाहीर समन्स**

**सोलापूर येथील मे. श्री.यु.एम. कुलकर्णी न्यायधिश सहकार न्यायालय सोलापूर यांचे कोर्टात**

लोकमंगल को-ऑप बँक लि. सोलापूर
पत्ता-१९३, गोल्डफिंड पेठ, पेठ, सावरकर मैदान समोर, सोलापूर **-- वादी**

**विरुद्ध**

०१) पद्माकर बाळासाहेब साळुंके मयत रा. ब्लॉक नं.१८, विश्राम नगर, होटगी नाका.. सोलापूर **-- प्रतिवादी**

| अ. क्र. | सहकार केस नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १. | ११०/२००८ | १) पद्माकर बाळासाहेब साळुके (मयत) वारसदार पैकी १ब) **अर्चना प्रभाकर जाधव,** रा. ब्लॉक नं.३०, प्रियंका नगर एस.आर.पी. कॅम्प पाठीमागे, विजापूर रोड, सोलापूर -४१३००८. १क) **अनिता भालचंद्र जाधव** रा. फ्लॅट नं. १००१, ग्रेस ए-बिल्डींग, सफायर पार्क, मोझे इंजिनिअरिंग कॉलेज जवळ, बालेवाडी पुणे-४११०४५ व १ड) **अपर्णा प्रविण भोगडे** द्वारा कुलमुखत्यारधारक **अर्चना प्रभाकर जाधव** रा.ब्लॉक नं.३०, प्रियंका नगर एस.आर.पी. कॅम्प पाठीमागे, विजापूर रोड, सोलापूर-४१३००८ | २४,४८,१७८/- | १६/४/२०२५ |

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्या विरुद्ध या न्यायालयामध्ये दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे या जाहीर समन्स/नोटीसीद्वारे आपणास असे सूचित करण्यात येते की, आपण व्यक्तिशः अथवा योग्यरितीने अधिकार प्रदान करण्यात आलेला अधिकृत प्रतिनिधी, जो या दाव्याच्या संदर्भातील सर्व महत्त्वाच्या प्रश्नाची उत्तर देवू शकेल, असा अधिकृत प्रतिनिधीमार्फत या न्यायालयात दिनांक १६/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सदरील दाव्यामधील आपल्या विरुद्ध करण्यात आलेल्या मागणीच्या संदर्भात आपले म्हणणे व पुरावे दाखल करण्यासाठी हजर रहावे, वर उल्लेखिलेल्या तारखेस व वेळेवर आपण हजर न राहिल्यास, सदरील दाव्याचा एकतर्फी निकाल आपले गैरहजेरीत करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक ०५/०३/२०२५ रोजीच्या मा. न्यायाधिश साहेब यांचे हुकमान्वये हे जाहीर समन्य दिले असे..

शिक्का

**सही/-**
**(एन.एस. देवराज)**
**न्यायालयीन लिपीक**
**सहकार न्यायालय, सोलापूर**

**न्यायालयाचा पत्ताः** सहकार न्यायालय, सोलापूर, जिल्हा महसुल कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्थेची इमारत, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात सोलापूर.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - ३

## रनिंगची सुरुवात... आरोग्यासाठी सकारात्मक पाऊल

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्यासाठी वेळ देणं अत्यंत महत्त्वाचं आहे. रनिंग हा एक उत्तम मार्ग आहे, जो तंदुरुस्ती आणि मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर ठरतो.

### कोणत्याही वयात सुरुवात शक्य

रनिंग सुरू करण्यासाठी कोणतंही वय अडथळा ठरत नाही. विशेषतः ३०-३५ नंतर, जबाबदाऱ्या सांभाळून स्थिरता आल्यावर अनेक जण मॅरेथॉनकडे वळतात. मात्र, योग्य पद्धतीने सुरुवात करणे आवश्यक आहे.

### सुरुवात कशी करावी ?

- हळूहळू सुरुवात करा सुरुवातीला वेगावर भर न देता चालणे आणि सौम्य जॉगिंगने सुरुवात करा.
- योग्य वॉर्मअप आणि स्ट्रेचिंग करा रनिंगपूर्वी ५-१० मिनिटांचे डायनॅमिक वॉर्मअप (जसे की हाय नीज, लेग स्विंग्स) आणि रनिंगनंतर स्टॅटिक स्ट्रेचिंग केल्याने स्नायू लवचिक राहतात आणि दुखापती टाळता येतात.
- लहान टप्पे ठरवा पहिल्या आठवड्यात आठवड्यातून २ दिवस, नंतर ३ दिवस असे हळूहळू वाढवा.
- योग्य गियर वापरा पायांना सपोर्ट देणारे चांगले रनिंग शूज वापरणे महत्त्वाचे आहे. तसेच गार्मिन सारखे वॉच, मोबाईल वरील अँप वापरा जे आपणाला, वेळ, कॅलरी, हृदय ठोके आणि अंतर कळेल.
- आहार आणि विश्रांती योग्य प्रथिनयुक्त आहार आणि पुरेशी झोप शरीराच्या रिकव्हरीसाठी महत्त्वाची आहे.
- मनाची तयारी करा रनिंग हे शारीरिक क्रियाकलाप नसून मानसिक आव्हानदेखील आहे. स्वतःला प्रोत्साहित करा.

### रनिंगचा जीवनशैलीत समावेश करा

रनिंग हा केवळ व्यायाम नसून जीवनशैलीचा भाग बनवा. नियमित रनिंगमुळे तंदुरुस्ती, सहनशक्ती, आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होते. सुरूवातीला छोटे टार्गेट ठेवा आणि नंतर मॅरेथॉनसारख्या मोठ्या स्पर्धांसाठी तयारी करा. रनिंगमुळे आरोग्य सुधारण्याबरोबरच आनंद, ऊर्जा, आणि आत्मविश्वास वाढतो. आजच पायात शूज घाला आणि तुमच्या आरोग्यासाठी एक नवा प्रवास सुरू करा!

-अतिश शहा

फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो. ९१७५८२८२०३

# भारताची भिस्त रोहित, कोहलीवर

आयसीसी चॅम्पियन्स चषक



◆ दुबई, ८ मार्च

रविवारी दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर चॅम्पियन्स चषकासाठी भारत आणि न्यूझीलंड यांच्यादरम्यान अंतिम सामना खेळला जाणार आहे. आतापर्यंत प्रतिस्पर्धी संघांना व वादग्रस्त भावनांना दूर ठेवण्यात यशस्वी झालेल्या भारताला १२ वर्षांनी चॅम्पियन्स चषक जिंकण्याची संधी आहे, तेव्हा त्यांना विराट कोहली व रोहित शर्माकडून खूप आशा आहे.

आयसीसीच्या सर्व स्पर्धांमध्ये भारताचा आशियाई प्रतिस्पधी न्यूझीलंडविरुद्ध विजयाचा रेकॉर्ड १०-६ असा आहे. आयसीसीच्या बाद फेरीच्या सामन्यांमध्ये न्यूझीलंडचा भारतावर विजयाचा रेकॉर्ड ३-१ असा आहे, हा रेकॉर्ड भारतासाठी त्रासदायक आहे.

क्रिकेट जगतातील एक वर्ग गत पंधरा दिवसांपासून चॅम्पियन्स चषकातील सर्व सामने दुबईमध्ये खेळल्यामुळे भारताला फायदा झाला, अशी टीका करत आहे. आता, या युक्तिवादाला फारसे महत्त्व राहणार नाही, कारण न्यूझीलंड संघाने येथील परिस्थिती आधीच अनुभवली आहे. विजेतेपदाच्या सामन्यापूर्वी भारताला अजूनही अधिक आरामदायी अनुभव मिळेल, कारण एका फिरकी गोलंदाजाने दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमच्या खेळपट्टीचा फायदा घेण्यासाठी पुरेशी ताकद दाखवली होती. या सर्व शक्यतांमध्ये भारत या अंतिम सामन्यासाठी चार फिरकी गोलंदाज व दोन वेगवान गोलंदाजांचे संयोजन कायम ठेवेल.

### फिरकी लढाई

उजव्या आणि डाव्या हाताचे फिरकी गोलंदाज वरूण चक्रवर्ती व कुलदीप यादवने भ्रामक गोलंदाजांसारखे प्रतिस्पर्ध्यांना गोंधळात टाकले आहे, पण रवींद्र जडेजा व अक्षर पटेल हे भारतीय गोलंदाजी विभागातील नामवंत गोलंदाज आहेत, त्यांनी फलंदाजांना अचूकतेच्या बंधनात अडकवले आहे.

जर अंतिम सामना खरोखरच भारत व पाकिस्तान दरम्यानच्या सामन्यासाठी वापरल्या गेलेल्या खेळपट्टीवर खेळला जाणार असेल, तर ते चार गोलंदाज न्यूझीलंडला शब्दशः फिरकीच्या जाळ्यात ओढू शकतात.

अशा परिस्थितीत न्यूझीलंडची आशा केन विल्यमसन व रचिन रवींद्र वर अवलंबून असेल, कारण ते सर्वात सक्षम फलंदाज आहेत.

तथापि, न्यूझीलंडलासुद्धा आपल्या फिरकी गोलंदाजांवर विश्वास आहे. फिरकी गोलंदाज - कर्णधार मिशेल सॅण्टनर, मायकेल ब्रेसवेल, रवींद्र आणि ग्लेन फिलिप्स सुद्धा येथे प्रभावी मारा करू शकतात.

योगायोगाने २५ वर्षांपूर्वी केनियामध्ये झालेल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडने भारताला चार गड्यांनी हरवले होते.

### टी-२० विश्वचषकानंतर भारताला हवे आणखी एक आयसीसी चषक

गत वर्षी टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारताला आपल्या खात्यात आणखी एक आयसीसी चषकाची भर टाकायची आहे.

विराट कोहली व रोहित शर्मा दोघांनीही भारताच्या धावसंख्येत मोठी भूमिका बजावली . आता ते कारकिर्दीच्या अंतिम टप्प्यावर येत आहे. आता त्यांच्यासाठी शेवटच्या थांब्यापर्यंतचे अंतर दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. तरीही, दीड दशकाहून अधिक काळ भारतीय क्रिकेटची सेवा केल्यानंतर कोहली व रोहित यांचे हे शेवटचे काम आहे की नाही हे आम्हाला निश्चितपणे माहित नाही.

जर खरोखरच तसे असेल, तर ते गौरवाच्या झगमगाटातून बाहेर पडण्यास उत्सुक असतील. या अंतिम टप्प्यावर हे दोघेही संस्मरणीय खेळी करतील अशी आशा आहे, मात्र त्याकरिता त्यांना खेळपट्टीवर जास्त काळ टिकून राहण्याचा प्रयत्न करावा लागेल. यामुळे मधल्या फळीतील फलंदाजांवरचा भार कमी होईल.

दुखापतग्रस्त मॅट हेनरीबद्दलची चिंता त्याला थोडीशी दिलासा देऊ शकते कारण न्यूझीलंडचा हा वेगवान गोलंदाज भूतकाळात सर्व खेळपट्ट्यांवर खूप त्रास देत होता. मॅट हेनरी खेळण्याची शक्यता नसली तरीही रोहितला अधिक योगदान देण्याचा मार्ग शोधावा लागेल. कोहली ते करत आहे. कोहलीने गत पाच डावांमध्ये शतक व दोन अर्धशतके झळकावली आहेत,.

(वृत्तसंस्था)

**भारत-न्यूझीलंड अंतिम सामना**
**स्थळ : दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियम, दुबई**
**वेळ : दुपारी २.३० वाजतापासून**
**थेट प्रसारण : स्टार स्पोर्ट्सवर**

# भारतच विजेतेपदाचा प्रबळ दावेदार : रवी शास्त्री

◆ दुबई, ८ मार्च

रविवारी होणाऱ्या चॅम्पियन्स चषकाच्या न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात भारतीय संघच विजयाचा प्रबळ दावेदार आहे, पण न्यूझीलंड एक मजबूत संघ असल्यामुळे त्यांना फायदा कमी असेल, असे मत भारतीय संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी व्यक्त केले.



भारताने दुबईत चॅम्पियन्स चषकाचे सर्व साखळी व उपांत्य सामना जिंकत अंतिम फेरीत धडक मारली. उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियावर मात केली.

गट अमधील एक सामना गमावल्यानंतर न्यूझीलंड गटात भारताच्या मागे दुसऱ्या स्थानावर राहिला. न्यूझीलंडने लाहोरमध्ये दुसऱ्या उपांत्य सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर एकतर्फी विजय मिळवून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

जर एखादा संघ भारताला हरवू शकतो तर तो न्यूझीलंड आहे, असे म्हणत त्यांनी २००० च्या चॅम्पियन्स चषकाच्या जेतेपदाच्या सामन्याची आठवण करून दिली. २००० मध्ये नैरोबी येथे न्यूझीलंडने ४ गड्यांनी विजय मिळवला होता. त्या सामन्याची ही पुनरावृत्ती असेल.

गत काही वर्षांत दोन्ही संघांममधील घडामोडी पाहणाऱ्या ६२ वर्षीय रवी शास्त्री यांनी न्यूझीलंड संघातून चार खेळाडू निवडले, जे अंतिम सामन्यात फरक करू शकतात. यात त्यांनी रचिन रवींद्रचे नाव घेतले व त्याला अत्यंत प्रतिभावान खेळाडू म्हटले. केन विल्यमसन आपल्या स्थिरतेसाठी व संतासारख्या शांततेसाठी आणि कर्णधार मिशेल सॅण्टनरचे नाव घेतले. सॅण्टर हा ग्लेन फिलिप्ससह सामन्यावर प्रभाव टाकू शकणारा प्रतिभावान खेळाडू आहे व तो संघासाठी हुकमी खेळाडू ठरू शकतो, असे त्यांनी म्हटले आहे.

सध्या फॉर्मात असलेला भारताचा विराट कोहली हा सामन्याला कलाटणी देणारा खेळाडू शकतो, असे शास्त्री यांनी म्हटले आहे.

न्यूझीलंडकडून मी केन विल्यमसन म्हणेन. काही प्रमाणात रचिन रवींद्र आहे. रचिन हा एक उत्कृष्ट तरुण खेळाडू आहे.भारताने त्यांना अंतिम सामन्यात १०-१५ धावांपर्यंत पोहोचू दिले, तर ते दुप्पट धोकादायक ठरतात,असेही ते म्हणाले.

केवळ २५ वर्षांचा रचिन रवींद्र याने आयसीसी ५० षटकांच्या स्पर्धांमध्ये आधीच पाच शतके झळकावली आहे व अशी कामगिरी करणारा सर्वात तरुण खेळाडू आहे. अशा मोठ्या स्पर्धांमध्ये तुम्हाला शतके मिळत नाहीत. तुमच्याकडे काहीतरी वरचढ असायला हवे आणि मला वाटते की तो प्रचंड प्रतिभावान आहे, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# भारत, न्यूझीलंडला विजयाची समान संधी : चार्वी भट्ट

◆ दुबई, ८मार्च

आयसीसी चॅम्पियन्स चषकात रोहित शर्माच्या संघाने आतापर्यंत विजयी कामगिरी केली असली तरी भारत व न्यूझीलंडला जेतेपदाचा अंतिम सामना जिंकण्याची समान संधी आहे, असे मत संयुक्त अरब अमिरात (युएई) संघाची माजी कर्णधार चार्वी भट्ट हिने व्यक्त केले.

२०१३ मध्ये जिंकलेले आयसीसी चॅम्पियन्स चषक परत आणण्याची आशा बाळगून रविवारी येथे होणाऱ्या आयसीसी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारत न्यूझीलंडशी भिडेल.

क्रिकेटप्रेमींमध्ये प्रचंड उत्साह संचारला आहे. क्रिकेटला पाठिंबा देण्यासाठी समुदाय एकत्र आले आहेत. शक्य तितके सर्व ठिकाणाहून चाहते येथे आले आहेत व ते सामन्याच्या दिवशी आपल्या आवडत्या खेळाडूंना पाहण्यासाठी खूप उत्साहित आहे. या क्षणांची चाहते खूप आतुरतेने वाट पाहत आहेत, असे मूळ मुंबईची व ८ वर्षे युएई महिला संघाचे नेतृत्व करणाऱ्या भट्टने वृत्तसंस्थेला सांगितले. चाहत्यांना ते क्षण पुन्हा अनुभवायचे आहेत. त्यांना खेळाडूंना प्रत्यक्ष बघायचे आहे व त्यांच्याशी संवाद साधायचा आहे. त्यामुळे क्रिकेटचा उत्साह वाढला आहे, असे भट्ट म्हणाली. भट्ट आता स्थानिक रेडिओ स्टेशनसाठी समालोचक झाली आहे व मध्य पूर्वेतील एकमेव महिला क्रिकेट आवाज आहे. रविवारी भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्ध उपांत्य सामना खेळलेला तोच अंतिम एकादश आपल्याला दिसेल. दोन्ही संघ खूप चांगले आहेत व दोन्ही संघांना चॅम्पियन्स चषक जिंकण्याची समान संधी आहे, असे भट्ट म्हणाली. (वृत्तसंस्था)

## भारतीय कर्णबधिर संघाने जिंकली टी-२० तिरंगी मालिका

◆ नवी दिल्ली, ८ मार्च

शनिवारी येथील कर्नल सिंग स्टेडियमवर झालेल्या कर्णबधिरांसाठीच्या टी-२० तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात वीरेंद्र सिंगच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाला ७ गड्यांनी पराभूत केले.

इंडियन डेफ क्रिकेट असोसिएशनने (आयडीसीए) आयोजित केलेल्या स्पर्धेत दक्षिण आफ्रिका हा दुसरा संघ होता.

अंतिम सामन्यात ५ बळी टिपणाऱ्या भारताच्या कुलदीप सिंगला अंतिम सामनावीर म्हणून निवडण्यात आले. त्याला मालिकेतील सर्वोत्तम गोलंदाज तसेच मालिकावीर म्हणूनही निवडण्यात आले. भारताच्याच अभिषेक सिंगला मालिकेतील सर्वोत्तम फलंदाज म्हणून निवडण्यात आले. या तिरंगी मालिकेतील खेळाडूंचा उत्साह खरोखरच कर्णबधिर क्रिकेटच्या उज्ज्वल भविष्याचे प्रतिनिधित्व करतो आणि इतर अनेक खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरतो, असे आयडीसीएचे अध्यक्ष सुमित जैन म्हणाले. (वृत्तसंस्था)

# राजस्थान रॉयल्सची 'पिंक प्रॉमिस' जर्सी सादर

◆ जयपूर, ८ मार्च

राजस्थान रॉयल्सने १ मे रोजी आयपीएल दरम्यान मुंबई इंडियन्सविरुद्ध होणाऱ्या आपल्या बहुप्रतिक्षित 'पिंक प्रॉमिस' सामन्यासाठी पूर्णपणे गुलाबी रंगाची जर्सी सादर करून आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला.

राजस्थान रॉयल्सची सीएसआर शाखा असलेल्या रॉयल राजस्थान फाउंडेशनने महिलांच्या नेतृत्वाखालील उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी 'औरत है तो भारत है' नावाचा एक मोहीम चित्रपट लाँच केला.

राजस्थानमधील महिलांच्या नेतृत्वाखालील ग्रामीण परिवर्तनासाठी आरआर विरुद्ध एमआय सामन्यासाठी खरेदी केलेल्या प्रत्येक तिकिटासाठी रॉयल्स १०० रुपये देखील देतील.

याशिवाय विशेष पूर्णपणे गुलाबी रंगाची रॉयल्सची जर्सी विक्रीतून मिळणारी सर्व रक्कम सामाजिक प्रभाव उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी थेट आरआरएफला जाईल.

शिवाय, सामन्यातील प्रत्येक सिक्स हिटसाठी, राजस्थान रॉयल्स आणि आरआरएफ सौरऊर्जेने सांबर प्रदेशातील सहा घरे उजळवण्यासाठी वचनबद्ध असतील.

"पिंक प्रॉमिस" द्वारे, आम्ही केवळ व्यक्तींवरच नव्हे तर त्यांच्या कुटुंबांवर आणि समुदायांवर कायमस्वरूपी प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतो. हा बदलांना प्रेरणा देतो व पलीकडेही पसरतो, असे राजस्थान रॉयल्सचे क्रिकेट संचालक कुमार संगकारा म्हणाले.

'पिंक प्रॉमिस' हे केवळ एका मोहिमेपेक्षा जास्त आहे; ही एक सांस्कृतिक बांधिलकी आहे,असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)




'पिंक प्रॉमिस' जर्सी सादर करताना कुमार संगकारा

# ट्रम्प लॉस एंजेलिस ऑलिम्पिकला पाठिंबा देतील

आयओसीचे थॉमस बाक यांना विश्वास

◆ लॉसने, ८ मार्च

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांचे प्रशासन २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांना पाठिंबा देतील, असा विश्वास आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीचे मावळते अध्यक्ष थॉमस बाक यांनी व्यक्त केला.

जागतिक महामारीच्या काळात आणि अनेक रशियन डोपिंग आणि लष्करी आक्रमणामुळे प्रभावित झालेल्या इतर संकटांमध्ये थॉमस बाक यांनी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीचे नेतृत्व केले.



आगामी २० मार्च रोजी थॉमस बाक यांचा उत्तराधिकारी निवडला जाणार आहे.भविष्यातील ऑलिंपिक यजमानांसह आर्थिकदृष्ट्या सुरक्षित आयओसीचा वारसा मिळवेल, जे आज स्थिर आणि विश्वासार्ह दिसत आहेत. तरीही, पुढील आयओसी अध्यक्षांसाठी सर्वात मोठी स्पर्धा- लॉस एंजेलिस ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा ही शांततापूर्ण स्पर्धा व परस्पर स्वीकृतीत जगाला एकत्र करण्याच्या ऑलिम्पिकच्या सामर्थ्यावरील बाक यांच्या विश्वासाला आव्हान देऊ शकते.

अमेरिकेला खेळ आवडतो. अमेरिकन लोक खेळाचे कौतुक करतात. ते जगभरातील खेळाडूंचे स्वागत करू इच्छितात, असे ते म्हणाले.

आयओसीने पॅरिस ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या महिला बॉक्सर इमाने खेळिफ आणि लिन यु-टिंग यांचे समर्थन केले आहे.

या दोन बॉक्सर महिला म्हणून जन्माला आल्या आहेत, महिला म्हणून वाढल्या आहेत,
महिला म्हणून स्पर्धा केल्या आहेत आणि कोणीही कधीही असा दावा केला नाही की त्या ट्रान्सजेंडर आहेत, असे बाक यांनी मुलाखतीत सांगितले. (वृत्तसंस्था)

# हिरकणी सायकल राईडमध्ये ३५ महिला सहभागी

● सोलापूर सायकल लवर्सकडून जागतिक महिला दिनानिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांच्या फिटनेस करिता सायकल लवर्स सोलापूर यांचेकडून ''हिरकणी राईड'' आयोजित केली होती. या राईड मधे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या ३५ महिलांनी सहभाग नोंदवला.

सोलापुरातील पार्क चौकातील चार हुतात्मा पुतळा येथून मंजुषा गाडगीळ आणि डॉ शुभांगी पोतदार यांचे हस्ते झेंडा दाखवून राईड ला सुरुवात करण्यात आली.

आसरा चौक दावत चौक येथून कंबर तलाव येथील झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या पुतळ्याला अभिवादन करून रेल्वे स्टेशन भैय्या चौक मार्गे परत पार्क चौक अशा बारा किलोमीटर अंतराची ही राईड उत्साहात पार पडली.

सायकल लव्हर्स ग्रुप तर्फे गरजूना सायकल डोनेशन देखील करण्यात आले. तसेच दीपक देशपांडे यांनी 'सा सायकलचा' या त्यांच्या स्पीच मधून सायकलिंग साठीच्या महत्त्वाच्या टिप्स दिल्या. या राईडचे नियोजन महिला सम न्वयक डॉक्टर रूपाली जोशी, सायकल लव्हर्सचे समन्वयक प्रविण जवळकर, अविनाश देवाडकर आणि महेश बिराजदार यांनी केले.

''आजच्या धावपळीच्या व धकाधकीच्या जीवनामध्ये महिलांचे आपल्या स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. महिलांनी कुटुंबाच्या जबाबदारी सोबत स्वतःच्या आरोग्याकडेही तितकेच लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी सायकलिंग करणे हा उत्तम पर्यावरणपूरक व्यायाम आहे.

सुट्टीच्या दिवशी आम्ही सायकल लवर्स च्या महिला सदस्य एकत्र येऊन ग्रुप राईड करतो. महिलादिनानिमित्त सोलापुरातील जास्तीत जास्त महिलानी सहभागी व्हावे यातून सायकलिंग चा आनंद घेत आपले आरोग्य ही उत्तम राखण्यास मदत होईल असे आवाहन डॉ रुपाली जोशी, डॉ तृप्ती राठी, डॉ राजश्री वाघचवरे यांनी केले.





# सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धेत मेहता शाळेची उत्तम कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

सोलापूर जिल्हा योग परिषद योग साधना मंडळ व इनरव्हील क्लब ऑफ सोलापूर हार्मनी यांच्यामार्फत आंतरशालेय सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धेत कै.वि.मो. मेहता माध्यमिक प्रशालेतील खेळाडूंनी कामगिरी केली.

राणी कित्तूर चन्नम्मा स्मारक भवन समिती यांच्यामार्फत वैयक्तिक सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रशालेतील इयत्ता ५ वी ते ७ वी मुले व मुली यांनी सहभाग नोंदवला. त्यामध्ये इयत्ता ८ वी ते १० वी मुलींच्या गटाने प्रथम व मुलांच्या गटाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. यामध्ये ८ वी ते १० वी गटात लक्ष्मीकांत जवळेकरने (४०० सूर्यनमस्कार, प्रथम) गुरु किरण कुरे (४०० सूर्यनमस्कार तृतीय), संहिता गद्रे (४०० सूर्यनमस्कार द्वितीय) यांनी ही कामगिरी केली. या विद्यार्थ्यांना क्रीडा प्रमुख अमित कोर्टीकर, योगशिक्षिका प्रतिमा स्वामी यांचे मार्गदर्शन लाभले. योगपटू विद्यार्थ्यांचे शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### रत्नत्रय पतसंस्थेचा वर्धापनदिन साजरा

**नातेपुते, दि. ८ मार्च-**

सदाशिवनगर (ता. माळशिरस) येथील रत्नत्रय संस्थेचा २१ वा वर्धापन दिन रत्नत्रय परिवाराचे संस्थापक अनंतलाल दोशी यांच्या हस्ते साजरा करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन व सरपंच विरकुमार दोशी, शंकर कारखान्याचे संचालक रामदास करणे, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे शाखाधिकारी श्री. लोंढे, संचालक प्रमोद दोशी, रामदास गोफणे, जगदीश राजमाने, अजय गांधी, सोमनाथ राऊत, तज्ञ संचालक सुरेश कुलकर्णी, विलास साळुंखे व सचिव ज्ञानेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. संचालक प्रमोद दोशी यांनी प्रस्ताविकातून संस्थेकडे २२ कोटींच्या ठेवी असल्याचे सांगून संस्था संपूर्ण संगणिकृत व ऑनलाईन व्यवहार करीत असल्याचे सांगितले. येथे सर्व वाहनांचे इन्शुरन्स, नवीन पासपोर्ट ,पॅन कार्ड काढणे, क्यूआर पेमेंट अशा विविध सुविधा संस्थेमार्फत सभासदांना पुरवल्या असल्यामुळे व्यवहार सुरळीत चालू आहेत असे ते म्हणाले. संस्थेचे संस्थापक अनंतलाल दोशी म्हणाले की पतसंस्था लवकरच स्वमालकीच्या जागेत नविन इमारत बांधत आहे. यापेक्षाही चांगली सेवा सभासदांना देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे ते म्हणाले. यावेळी तज्ञ संचालक सुरेश कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले.

### पँथर पावर संघटना माढा तालुका अध्यक्षपदी अण्णासाहेब गाडे

**टेंभूर्णी, दि. ८ मार्च-**



पँथर पावर सामाजिक संघटनेच्या माढा तालुकाध्यक्षपदी उपळवटे येथील आण्णासाहेब गाडे यांची निवड झाली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हि निवड करण्यात आली. पश्चिम महाराष्ट्र प्रमुख गणेश जाधव यांनी श्री. गाडे यांना निवडीचे पत्र दिले. यावेळी रवी गायकवाड, दीपक गाडे, तेजस गाडे, भीमराव गायकवाड, वैभव खंडागळे, नितीन गाडे, ओंकार गायकवाड आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.



### पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांची पिलीव येथे भेट

**पिलीव, दि. ८ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे पंढरपूर-मंगळवेढा आ. समाधान आवताडे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी पिलीव येथील हनुमान तालमीचे वस्ताद मोहन मदने-पाटील, विजय ग्रामीण पतसंस्थेचे संचालक नानासाहेब मदने यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करणयात आला. यावेळी त्यांच्या सोबत असणारे विठ्ठल साखर कारखान्याचे माजी संचालक द्रोणाचार्य हाके, बागल यांचाही सन्मान करणयात आला.यावेळी जुबेर पठाण, समशेरसिंग रजपुत उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### लक्ष्मणराव गोतसुर्वे



**वळसंग, दि. ८ मार्च-**

आचेगांव (ता. दक्षिण सोलापूर) येथील रहिवाशी माजी जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मणराव गोतसुर्वे (वय-७८) यांचे शनिवार, दि. ८ मार्च रोजी वृद्धापकाळाने राहत्या घरी आचेगांव येथे निधन झाले. २००२ ते २००७ या कालावधीत ते जिल्हा परिषद निवडणुकीत निवडून आले होते. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन विवाहित मुली, नातवंडे असा परिवार आहे. रविवार, दि. ९ मार्च रोजी सकाळी १० वाजता आचेगांव बौद्धस्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहे.


### यल्लूबाई पवार



**सोलापूर दि. ८ मार्च-**

साई पार्कमधील येथील रहिवाशी श्रीमती यल्लूबाई विठ्ठलसा पवार (वय ६८) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले आहे. तरी त्यांची अंत्ययात्रा साई पार्क येथील राहत्या घरापासून रूपाभवानी मंदिर येथील वैकुंठभूमी येथे दि. ९ मार्च रोजी सकाळी ९ वाजता निघणार आहे. त्यांच्या पश्चात दोन, मुली, एक मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शिवसेना उपविभाग प्रमुख विनायक पवार यांच्या त्या मातोश्री होत.

### बळवंत कुलकर्णी



**सोलापूर, दि. ८ मार्च-**

जुने संतोषनगर, विजापूर रोड, सोलापूर येथील रहिवासी राजाभाऊ उर्फ बळवंत नारायण कुलकर्णी (वय ८७) यांचे मंगळवार दि. ४ मार्च रोजी वार्धक्याने निधन झाले. त्यांनी शिवशाही येथे प्रदीर्घ सेवा केली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, ३ मुली, नातवंडे असा परिवार आहे. अक्कलकोट स्वामी दर्शन त्रैमासिकाचे संपादक सतीश कुलकर्णी यांचे ते सासरे होत.

### धनाजी पवार



**मोडनिंब, दि.८ मार्च -**

मोडनिंब (ता. माढा) येथील धनाजी महादेव पवार ( वय ४४) रा.आदर्श नगर यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, वडील, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

# दूषित पाणीपुरवठ्याचा अक्कलकोटकरांच्या आरोग्यावर परिणाम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.०८ मार्च-**

श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे शहरात विविध विकासकामे सुरू आहेत. त्याचे कौतुक होत असले तरी अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे सार्वजनिक नळपाणी पुरवठयाची पाईपलाईन फुटून त्यामध्ये गटारीचे पाणी मिसळल्याने दूषित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे शहरवासीयांच्या आरोग्यांवर परिणाम होत आहे.

शहरात भुयारी गटार, भूमिगत विजेचे तार, केबल, पाणी पुरवठा पाईपलाईन अशी अनेक कोट्यावधी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. याचे सर्वत्र कौतुक होत आहे. तर दुसरीकडे रस्त्यावर ठिकठिकाणी लोखंडी स्टील, टोकाचे बार उभा राहिलेले आहते. त्यामुळे वाहन पंक्चर होण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रमिला पार्क येथील माजी आमदार कै. महादेवराव पाटील यांच्या घरासमोर पाईपलाईन फुटली आहे. त्यात गटारीचे पाणी मिसळले जात आहे. एकंदरीत नागरिकांना दूषित पाणी पुरवठा होत आहे. याबाबत नगरपालिकेकडे तक्रार केली असता, लक्ष दिले जात नसल्याचे जिल्हा परिषदेचे माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांनी सांगितले.

> दोन दिवस या परिसरात हजारो लोकांना दूषित पाणी पुरवठा झाला आहे. याबाबत मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्याशी संपर्क साधला असता उडवाउडवीची उत्तरे मिळाली. नागरिकांच्या हिताच्या कामाला वेळ नसेल तर यांचा काय उपयोग असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.

> दोन दिवसांपूर्वी मल्लिकार्जुन पाटील यांनी दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याची तक्रार करून माजी उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे यांच्या समक्ष संपूर्ण रस्ता उखडून टाकण्याचा इशारा दिल्यानंतर झोपचे सोंग घेतलेले कर्मचाऱ्यांनी तात्काळ दुरुस्ती करण्याचे आश्वासन दिले. यावेळी भाजपाचे यशवंत धोंगडे, सुधीर माळशेट्टी, इंजिनयर ईश्वरकट्टी, आदी उपस्थित होते.



**प्रमिला पार्क येथे गटारीचे पाणी पाईपलाईन मध्ये जाऊन नागरिकांना दूषित पाणी पुरवठा होतानाची पाहणी करताना यशवंत धोंगडे, मल्लिकार्जुन पाटील, इंजि. ईश्वरकट्टी आदीसह अन्य.**

## महिला दिनानिमित्त दौलतराव विद्यालयातील विद्यार्थ्यांना ५० सायकलींचे वाटप



**तथा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ मार्च-**

तालुक्यातील कासेगांव येथील दौलतराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना ग्रामपंचायती मार्फत ५० गरजू व होतकरू विद्यार्थिनींना जागतिक महिला दिनानिमित्त सायकल वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेतील शिक्षक आणि ग्रामपंचायतचे पदाधिकारी यांनी मनोगत व्यक्त करताना जागतिक महिला दिनाचे महत्त्व विशद केले. याप्रसंगी संस्थेचे संचालक, जिल्ह्या परिषद सदस्य वसंतराव देशमुख, कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रगतिशील द्राक्ष बागायतदार चंद्रकाका देशमुख, सरपंच शिवाजी भोसले, उपसरपंच संग्रामसिंह देशमुख उपस्थित होते.

## मंद्रूप ते श्रीशैलम् पदयात्रेला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. ८ मार्च-**

मल्लिकार्जुन सेवा संघाच्या वतीने दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या मंद्रूप ते श्रीशैलम् पदयात्रेला यंदा ३९ वर्षे पूर्ण झाली आहेत. भक्तिभावाने आणि श्रद्धेने भरलेल्या या पदयात्रेची सुरुवात ७ मार्च रोजी मंद्रूप येथून उत्साहात झाली.

माजी सभापती आणि पदयात्रेचे प्रमुख संयोजक गुरूसिद्ध म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली ही यात्रा मार्गस्थ झाली. पदयात्रेचा प्रवास महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा या चार राज्यांतून होणार आहे. दररोज सुमारे ३० ते ३५ किलोमीटरचा प्रवास करत १८ दिवसांच्या श्रमसाधनेनंतर २६ मार्च रोजी पदयात्रा श्रीशैलम् येथे पोहोचणार आहे. त्यानंतर ३० मार्चपर्यंत चार दिवस भक्तांसाठी



पुरणपोळी खीर व तुपासह दासोह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या ३९ वर्षांप्रमाणे यंदाही मल्लिकार्जुन पालखी भक्तांच्या खांद्यावरून नेण्यात येणार असून यावर्षी या पालखीसाठी खास लाकडी रथाची व्यवस्था करण्यात आली आहे. पालखीच्या मार्गावर विविध ठिकाणी भक्तांचे स्वागत, महाप्रसाद आणि मिरवणुकीचे आयोजन करण्यात येणार आहे.

७ मार्च रोजी मल्लिकार्जुन मंदिरात पूजा आणि आरतीनंतर पदयात्रेला प्रारंभ झाला. मळसिद्धप्पा मंदिरात पालखी पूजनानंतर ग्राम स्थांनी भाविकांना महाप्रसादाचे वितरण केले. मल्लिकार्जुन पदयात्रा ही श्रद्धा आणि भक्तीचे प्रतीक बनली असून, यंदाही भाविकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे या यात्रेचे वातावरण भक्तिमय झाले आहे.

> **रथातून निघणार पालखी**
>
> पालखीचे वजन जास्त असल्यामुळे यंदा पालखीसाठी विशेष रथ तयार करण्यात आला आहे. मार्गावरील गावाच्या हद्दीत भक्तांना पालखीचे दर्शन व्हावे म्हणून ती भक्तांच्या खांद्यावरून नेली जाणार आहे. गाव ओलांडल्यानंतर पालखी रथात ठेवली जाणार आहे.

## गोपाळपूर ग्रामपंचायतीच्या वतीने कचरा बकेटचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील पहिली आदर्श महिला स्नेही व बालस्नेही पुरस्कार प्राप्त ग्राम पंचायत गोपाळपूर तालुका पंढरपूर यांच्यावतीने महिला दिनाची औचित्य साधून महिला सभा व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून ग्रामपंचायतीच्या वतीने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी आशा वर्कर, अंगणवाडीताई, बचत गटातील महिला, क्लार्क यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच स्वच्छतेचे महत्व अदोरेखित करण्यासाठी ओला व सुका कचरा गोळा करण्यासाठी सर्व महिलांना डस्टबिनचे वाटप करण्यात आले. यावेळी यशदाच्या मास्टर ट्रेनर सुनंदा राजेगावकर, शिल्पा विभूते, राखी याचबरोबर आरोग्य, कायदा, सामाजिक, सरकारी क्षेत्रात असलेल्या मान्यवर महिलांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

यावेळी गोपाळपूर ग्राम पंचायतच्या सरपंच उज्वला बनसोडे, उपसरपंच सौ. सविता आसबे, ग्रामपंचायत सदस्य मनीषा आसबे, यशदाच्या मास्टर ट्रेनर शिल्पा विभूते, समाजसेविका साखी, ग्रामपंचायत अधिकारी



ज्योती पाटील, कृषी सहाय्यक अभंगराव, डॉ. भोसले, आशा मस्के, कमलाक्षी गुरव, सीमा म्हेत्रे, पुष्पा बनसोडे, गोदाबाई सूर्यवंशी, डॉ.ज्योती शेटे, कमल तोंडे, इंजिनीयर सुजाता जाधव, ॲड. शितल आसबे, सामाजिक कार्यकर्त्या दुर्गादेवी माने, पोलीस मित्र रजनी बडवे, होमगार्ड सुरेखा ढेरे उपस्थित होते.



## अक्कलकोटमधे आयसीआयसी बँकेची नवीन शाखा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ८ मार्च -**

येथील शहरात जुना तहसिल कार्यालय जवळ आयसीआयसी बँकेच्या नवीन शाखेचे उदघाटन पंचायतराज व ग्रामविकास विभाग सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष ॲड. दयानंद उंबरजे यांच्या हस्ते झाले.

यावेळी आयसीआयसी बँकेचे रिजनल हेड राजीव दुबे, बँक मॅनेजर राहुल वाघ, चंद्रकांत दसले, माजी नगरसेवक लाला राठोड, ठेकेदार किरण पाटील उपस्थित होते.

## ब्रम्हानंद महाराजांच्या यात्रेनिमित्त कुस्ती

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ८ मार्च-**

करकंब येथे श्री.ब्रह्मानंद महाराज यांच्या यात्रेनिमित्त कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते.कुस्त्यांच्या फडाचे उद्घाटन ब्रह्मानंद महाराज मठाचे श्री.राम नारायणदास महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.प्रथमतः छोट्या पहिलवानांच्या कुस्त्या आयोजित करण्यात आल्या होत्या.लहान मुलांच्या कुस्त्यानंतर मोठ्या पहिलवानांच्या कुस्त्या सुरू करण्यात आल्या.शंभर रुपयांसून ते शेवटची २१हजार रुपयांची कुस्ती मल्ल महेश बिचकुले,गारअकोले विरुद्ध आप्पा वळकुंडे,शिवनेरी तालीम अकलूज यांच्यामध्ये झाली.मात्र ही कुस्ती बरोबरीत सोडविण्यात आल्याचे यात्रा कमिटीचे सदस्य बिरुदेव पारेकर यांनी सांगितले.या कुस्त्यांमध्ये कलूज,मोडनिंब,पंढरपूर,टेंभुर्णी,माळशिरस,ाढा,सोलापूर,सांगोला,मोहोळ,बार्शी इत्यादी ठिकाणच्या पहिलवानांनी सहभाग घेतला. कुस्त्यांच्या आयोजनासाठी बिरुदेव पारेकर,अनिल चव्हाण,लक्ष्मण वंजारी,राजकुमार धायगुडे,संतोष धोत्रे,सुनीलमोहिते,शशिकांत धोत्रे, पांडुरंगशेटे,नवनाथ नलवडे,संजय मोहिते,मनोज पवार,विजय धोत्रे, इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.धनंजय मदने



यांनी उत्कृष्ट निवेदनाचे काम पार पाडले.

> सुभाष गुळमे, लक्ष्मण पारेकर,सतीश माळी,रामभाऊ सलगर,देशमुख पैलवान,बाबर वस्ताद यांनी निपक्षपातीपणे कुस्तीपंच म्हणून काम पाहिले.

## श्री स्वामी समर्थ विश्रांती धाम बॅगेहळ्ळीत अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ मार्च-**

श्री स्वामीं समर्थ विश्रांती धाम बॅगेहळ्ळी येथे सालाबादाप्रमाणे यंदाही ५ ते ११ मार्च ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह ह.भ.प. मोहन महाराज जायफळकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रारंभ झाला आहे.

अखंड हरिनाम सप्ताहात पहाटे ४ वाजता काकडारती, ६ वा 'विष्णू सहस्त्रनाम जप' ७ वा. ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १ गाथा भजन, दुपारी ४ वाजता प्रवचन, दुपारी ५ ते ६. ३० हरिपाठ ' रात्री ७ ते ९ मान्यवरांचे हरिकीर्तन असे अखंड



हरिनाम सप्ताहाचे कार्यक्रम होत आहेत. या अखंड हरिनाम सप्ताह सेवेत हभप सुधाकर महाराज इंगळे सोलापुर यांची किर्तन सेवा संपन्न झाली. कीर्तन सेवेत गायन सेवेत रावसाहेब चव्हाण, मृदुंग सोमनाथ दत्तू रोडगे यांनी साथ संगत केली. याप्रसंगी श्रीमुख जगदाळे शिरसट माणिक माशाळे गजानन बाबासाहेब सलगरा मड्डीचे राजू जगदाळे भालेराव श्री स्वामी समर्थ महाराज विश्रांती धाम बॅगहळ्ळी येथे उपस्थित होते.

# शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या आ. पाटील यांना मतदारसंघात फिरू देणार नाही

### शिवसेना तालुका प्रमुख मुन्ना साठे यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा । शेखर म्हेत्रे**
**माढा, दिनांक ८ मार्च -**

माढा तालुक्यातील शेतकऱ्यांचे उसाचे बिल आठ दिवसाच्या आत आमदार अभिजीत पाटील यांनी दिले नाही तर त्यांना माढा मतदार संघात फिरू देणार नसल्याचा इशारा शिवसेना शिंदे गटाचे माढा तालुकाप्रमुख मुन्ना साठे यांनी पत्रकार परिषदेत दिला.

आमदार अभिजीत पाटील यांनी निवडणुकीपूर्वी माढा तालुक्यातील शेतकऱ्यांना कापसेवाडी येथील द्राक्ष उत्पादन शेतकऱ्यांच्या मेळाव्यात शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत ऊसाला साडेतीन हजार रुपये प्रति टन भाव देणार असल्याचे जाहीर केले होते. तसेच तालुक्यातील प्रस्थापित कारखानदारांना मी धक्का देतो असे सांगितले होते. परंतु कारखाना बंद होऊन जवळपास वीस दिवस होत आले तरी अद्याप एकही शेतकऱ्याला बिल अदा करण्यात आलेले नाही. एफआरपी प्रमाणे बिल देखील मिळालेले नाही. काही भागात शेतकऱ्यांना दोन हजार ते दोन हजार ८०० रुपये ऍडव्हान्सच्या रूपात पैसे जमा झालेले आहेत. माढा तालुक्यातील शेतकऱ्यांची आमदार पाटील यांनी ऊसाला तीन हजार ५०० रूपयांचा भाव देतो म्हणून दिशाभूल करून आपल्या पदरात मतदान पाडून घेतले आहे. आता वेळेत सांगितल्याप्रमाणे उसाचे बिल न दिल्याने त्यांनी शेतकऱ्यांची एक प्रकारे फसवणूक केली असल्याचे ही मुन्ना साठे यांनी या पत्रकार परिषदेत सांगितले.



आमदारांनी सध्या तालुक्यात वेगवेगळ्या स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन नागरिकांची करमणूक करून जनतेचे उसाच्या बिलापासून लक्ष विचलित करण्याचा हा त्यांचा प्रयत्न असल्याचेही यावेळी ते म्हणाले.

असे सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन शेतकऱ्यांची समस्या मिटणार आहे का असा संतप्त सवाल श्री. साठे यांनी यावेळी केला. येत्या आठ दिवसात शेतकऱ्यांच्या उसाचे बिल त्यांच्या बँक खात्यात जमा न झाल्यास पुढील काळात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक घेऊन शेतकऱ्यांची दिशाभूल झालेले सविस्तर विषय त्यांच्या कानावर घालणार असल्याचेही सांगितले.

मुन्ना साठे यांनी दिलेला इशारा आमदार अभिजीत पाटील कितपत मनावर घेतात व शेतकऱ्यांचा किती फायदा होतोय की एका नव्या आंदोलनाला सुरुवात होते हे पाहावे लागणार आहे.

> **आमसभेवर देखील आक्षेप**
>
> आमदारांनी आमसभा घेतली परंतु या आमसभेत जनतेचे प्रश्न त्यांना सोडवायचे नव्हते त्यांना फक्त प्रशासनातील अधिकाऱ्यांना आपली वचक दाखवून द्यायची होती असा आरोप मुन्ना साठे यांनी यावेळी केला.

## संक्षिप्त वृत्त



### वंचित घटकांना न्याय देण्यासाठी कटिबद्ध : सुलोचना सोनवणे

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

समाज कल्याण विभागाच्या माध्यमातून जिल्ह्यातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त तसेच प्रभारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे यांनी सांगितले. महिन्याभरापूर्वी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाचा पदभार घेतल्यानंतर पहिल्याच दिवशी कोणताही गाजावाजा न करता एखाद्या अभ्यगताप्रमाणे साध्या पद्धतीने त्या कार्यालयात आल्या.कर्मचारी आणि कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना आपुलकीने बोलून सृजनशीलता आणि माणुसकीचे दर्शन त्यांनी घडविले. प्रभारी पदभार असताना देखील गुरुवारी त्यांच्या सत्कारासाठी दोन्ही कार्यालयात गर्दी होती.जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ नेते बळीरामकाका साठे यांनी त्यांचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

### महिला दिनानिमित्त मंगळवारी स्वयंरोजगार मेळावा

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर आणि राणी कित्तूर चेन्नम्मा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (महिला) सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हयातील नोकरी आणि स्वंयरोजगार इच्छूक महिला उमेदवारांसाठी मंगळवार, दि.११ मार्च रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन




करण्यात आले असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी दिली.जिल्ह्यातील नोकरी इच्छुक महिला उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टिने मेळावा आयोजित करण्यात आला असून, नोकरी इच्छुक महिला उमेदवारांनी बायोडेटांच्या तीन प्रती आणि कागदपत्रासह मंगळवार, दि. ११ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत राणी कित्तूर चेन्नम्मा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (महिला), डफरीन चौक येथे उपस्थित रहावे.



### महिला बचत गट उत्पादित वस्तू, खाद्यपदार्थांचे प्रदर्शन सुरु

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळावी, त्याचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने १० मार्च पर्यंत महिला आर्थिक विकास महामंडळ, (माविम) च्या ५० वा वर्धापन दिन व ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हास्तरावर महिला बचत गट उत्पादित वस्तु व खाद्यपदार्थ विक्री आणि प्रदर्शन, नॉर्थ कोट महानगर पालिकेसमोर पार्क चौक, सोलापूर येथे आयोजन केले आहे. नागिरकांनी याचा लाभा घ्यावा, असे आवाहन मविमचे जिल्हा समन्वय अधिकारी. सोमनाथ लामगुंडे यांनी केले आहे.





# पेठे फूडस्‌मध्ये रंगले महिलांचे खेळ अन्‌ स्पर्धा

**महिला दिनानिमित्त अनोखा कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

जागतिक महिला दिनानिमित्त पेठे फूडस्च्या वतीने महिलांचे विविध स्पर्धा व खेळ घेण्यात आले. यामध्ये कामगार महिलांसह दैनिक तरुण भारत व प्रिसीजन प्रिटंस्मधील महिलांचा उत्स्फूर्त सहभाग होता. यावेळी वन मिनिट शो, बॉल बादलीत टाकणे, उखाणे, दागिण्यांची नावे सांगणे आदी स्पर्धा घेण्यात आले. यामधील विजेत्यांना पेठे फूडस्च्या अनुजा पेठे यांच्या हस्ते बक्षीसांचे वाटप व सर्व उपस्थित महिलांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी उपसंपादिका आरती कुसेकर, अकाऊटंट रंजना घोडके, सरिता सालीमठ, वर्षा कांबळे, धानेश्वरी वाणी, सुकन्या दिंडोरे, मनिषा विभुते, शगुफ्ता पटेल, अंजना सोलंनकर, करुणा सुरवसे, रबिया मुल्ला, लक्ष्मी म्हेत्रे, सरस्वती करनूर, शोभा बासुतकर, इरा गादगी, मल्लमा उमदी, गाडगे, इंगळे, भामाबाई आंधळे उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता सहभोजनाने व बालपणीच्या बर्फगोळा सेवनाने झाली.

# ओबीसी प्रवर्गाच्या हिताचे निर्णय तळागळातील समाजापर्यंत पोहोचवा

**▸ प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांच्या पदाधिकाऱ्याना सूचना**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ मार्च-**

राज्य शासनाने घेतलेले ओबीसी प्रवर्गाच्या हिताचे घेत असलेले निर्णय व भूमिका ओबीसी समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम ओबीसी विभागाच्या पदाधिकाऱ्यांनी करावे, अशा सूचना राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी प्रवर्गाचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली ओ.बी सी. विभागाच्या वतीने राज्यात संपर्क अभियानाचे आयोजनप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले. ओबीसीतील संख्येने अतिशय अल्प असलेल्या जात घटकांपर्यंत पोहोचून त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी प्रयत्न करावेत. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका व जिल्हा परिषद निवडणूकांच्या दृष्टिकोनातून संघटन वाढीसाठी प्रत्येकाने पूर्ण ताकदीने आपले योगदान द्यावे.

उपाध्यक्ष किसन जाधव व शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना अजित पवार यांचे हात बळकट करण्यासाठी व पक्ष संघटन वाढीसाठी प्रत्येकाने विश्वासाने सोपावलेल्या जबाबदारीचे भान राखून व जबाबदारी समजून सर्वो तोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. सेल विभागाचे अध्यक्ष अनिल छत्रबंद यांनी प्रास्ताविक केले. जिल्हाध्यक्ष मोतीराम चव्हाण यांनी स्वागत केले. यावेळी कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, जेष्ठ नेते हेमंत चौधरी, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, प्रदेश सरचिटणीस शशिकांत बापू कांबळे, महिला आघाडी अध्यक्ष संगीता जोगधनकर, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# एकाच क्षेत्राऐवजी इतर संलग्न क्षेत्रात नैपुण्य मिळविणे आवश्यक : बडदाले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

विद्यार्थांनी फक्त प्रोग्रामिंग वर लक्ष देण्यापेक्षा आताच्या युगातील नवीन संकल्पना आणि इतर पॉवर टूल्स यामध्येही नैपुण्य मिळविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सी.बी.ए. बंगलोरचे पॉवर बीआय तज्ञ योगिनाथ बडदाले यांनी केले




हिराचंद नेमचंद म हाविद्यालयातील बॅचलर ऑफ कॉम्प्युटर (बी.सी.ए.) विभागाच्या वतीने आयोजित आंतर महाविद्यालयीन सी प्रोग्रामिंग स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी डायरेक्टर डीएमएस डॉ. ओमप्रकाश अष्टनकर, प्रा. ए. एम.सद्दलगी, एम. एस. मणुरे, एच. वि. कोणदे, बी. ए. गोरे, ए.एल.साखरे उपस्थित होते. या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेसाठी जिल्ह्यातील १६ कॉलेजचे २७५ विद्यार्थांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत एप्टिट्यूड टेस्ट, रिदम ऑफ कोडिंग, सी वर्ल्ड, सी-प्रो वर्ल्ड, रनटाइम एरर अशा विविध फेऱ्यांमध्ये त्यांचे प्राविण्य दाखविले. १३४ संघामध्ये कठीण चाचण्या घेऊन प्रथम तिन पारितोषिके देण्यात आली. यांनी पटकावले. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकास २०००, १५०० व १००० रुपये अशी ट्रॉफी आणि सर्टिफिकेट सर्व भाग घेतलेल्या महाविद्यालयांना ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी बामणी आणि संजना माशाळकर यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्राध्यापक मंजुनाथ मणुरे यांनी केली. प्राध्यापक भाग्यश्री गोरे यांनी आभार मानले.

**सी प्रोग्रामिंग स्पर्धेत कांबळे, गणपा प्रथम**

या स्पर्धेतील विजेते : प्रथमः अभिषेक कांबळे, अंबादास गणपा, (एमआयएम कॉलेज,सोलापूर , द्वितीय : प्रणिता खेड,अपूर्वा काळे (सिद्धेश्वर वुमेंस कॉलेज,सोलापूर), तृतीय : शरयू शेळके, पियुष गोगी (गवर्नमेंट पॉलिटेक्निक, सोलापूर).

# संभाजी आरमारच्या विवाह सोहळ्यात ७ जोडपे विवाहबद्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**





छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त संभाजी आरमारच्या वतीने सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता. गवळी वस्ती आकाशवाणी केंद्र येथे हजारो जन समुदायाच्या साक्षीने हिंदू धर्म पद्धतीने विधिवत सात जोडपी विवाहबद्ध झाली. छत्रपती शिवरायांच्या आरतीने विवाह सोहळ्याचा शुभारंभ झाला. ७ मार्च रोजी सायंकाळी ६.२७ वा.च्या गोरज मुहूर्तावर नयनरम्य वातावरणात हा आनंद सोहळा आयोजित करण्यात आला होता. संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे व कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरप्रमुख सागर ढगे यांनी या दिमाखदार सोहळ्याचे आयोजन केले होते. विवाहबद्ध झालेल्या जोडप्याना लग्नाचा पेहराव, संसारोपयोगी भांडी, मणी-मंगळसूत्र इ. भेट स्वरूपात देण्यात आले. उपस्थित सर्वांसाठी भोजनाची देखील व्यवस्था करण्यात आली होती.

या विवाह सोहळ्याला माजी उपमहापौर नानासाहेब काळे, काँग्रेसचे शहरप्रमुख चेतन नरोटे, माजी परिवहन सभापती राजन जाधव, माजी नगरसेवक अनंत जाधव, विनोद भोसले, बापू ढगे, शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, शिवसेना जिल्हाप्रमुख अजय दासरी, उपशहरप्रमुख संतोष केंगनाळकर, पोलीस निरीक्षक प्रम ोद वाघमारे, छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे हाजी मतीन बागवान, शिवसेनेचे लहू गायकवाड, नागेश खरात, पेंटप्पा गड्डम, यशवंत पातरूड,राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी जिल्हा कार्याध्यक्ष उज्वला पाटील, शहर कार्याध्यक्ष चित्र कदम आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोहळा यशस्वी करण्यासाठी सरचिटणीस गजानन जमदाडे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, दक्षिण तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर डोंबाळे, जिल्हा संघटक अमित कदम, प्रा. मल्लिकार्जुन पोतदार, महेश घोडके, किरण ताकतोडे, पिंटू औरंगे, सचिन गायकवाड, अविनाश विटकर, गणेश निंबाळकर, महिला अगदी पदाधिकारी उमा रजपूत, रेखा व्हनकडे, संध्या हेब्बाळकर, वर्ष ढगे, अश्विनी गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

# सोलापुरात आजपासून २ दिवस 'ग्रंथोत्सव'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**




जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्या मार्फत सोलापूर ग्रंथोत्सव २०२४ चे आयोजन शिवछत्रपती रंगभवन, रंगभवन चौक, सोलापूर येथे रविवार दिनांक ९ व १० मार्च रोजी करण्यात आले आहे. असे होणार कार्यक्रम : रविवार ९ मार्च : स.९.३० वा. : ग्रंथ दिंडी, स. ११ वा. : ग्रथोत्सव उद्‌घाटन सोहळा, दु. १ वा. मराठी भाषाः सवंर्धन व जबाबदारी या विषयावर परिसंवाद. सोमवार १० मार्च : सकाळी. ११ वा. भारतीय संविधानः नागरिकांचा स्वाभिमान या विषयावर परिसंवाद, दु. २ वा. कथाकथन ३.३० वा. समारोपाचा कार्यक्रम होणार आहे.

# जलजीवन मिशनसाठी ९ कोटी २६ लाख निधी

## बिल मिळविण्यासाठी ठेकेदारांची धावपळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ८ मार्च-**

जलजीवन मिशन योजनेच्या ठेकेदारांनी कामांचे बिल न मिळाल्याने कामबंद आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर कार्यकारी अभियंत्यांनी शासनाकडे थकित निधीची मागणी केली. सहा महिन्यानंतर ६२ कोटी ५३ लाख रूपयांपैकी ९ कोटी २६ लाख रूपयाचा निधी मंजूर झाला . जलजीवनच्या कामाची बिले मिळविण्यासाठी ठेकेदारांची धावपळ सुरू आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने शासनाकडे ६२ कोटी ५३ लाख रूपयाची मागणी केली असताना केवळ ९ कोटी २६ लाख रूपयाचा निधी आल्याने निधी वाटपाबाबत पेच निर्माण झाला आहे. बिले अदा करताना ज्या ठिकाणी जलजीवन मिशनचे काम पूर्ण झाले आहे. त्या ठिकाणी मागील वर्षी टंचाई काळात पाणीपुरवठ्यासाठी टँकर लावावे लागले होते व विहीर अधिग्रहण करावी लागली होती, त्या ठिकाणी यंदाच्या उन्हाळ्यात झालेल्या कामातून टँकरने पाणीपुरवठा करण्याची व विहीर अधिग्रहण

करण्याची गरज भासणार नाही. अशाच ठिकाणच्या कामाची देयके प्राधान्य क्रमाने काढण्यात येणार आहेत. त्याबरोबरच ज्या ठिकाणची शंभर टक्के भौतिक कामे पूर्ण झाली आहेत. अशा ठिकाणच्या कामाची देयके काढण्यास संदर्भात द्वितीया प्राधान्यक्रम देण्यात यावा. त्याबरोबरच ३१ मार्चपर्यंत जलजीवन मिशनच्या ज्या कामातून प्रत्यक्षात पाणीपुरवठा कर शक्य आहे. अशा कामांची देय तिसऱ्या प्राधान्य क्रमाने काढण्यात यावीत असे निर्देशित देण्यात आले आहेत. त्यामुळे कामे पूर्ण झालेल्या अनेक ठेकेदारांना थकीत बिलांसाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे. मात्र आलेल्या निधी वाटपाबाबत ठेकेदारांमध्ये संभ्रम ावस्था आहे. त्यामुळे अनेक ठेकेदारांनी बिल मिळण्यासाठी वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. मात्र प्रशासन काय भूमिका घेणार? याकडे ठेकेदारांचे लक्ष लागले आहे.

**शासनाच्या निर्देशाचे पालन करण्यात येणार**

शासनाने ठरवून दिलेल्या निर्देशानुसारच जल जीवन मिशनची देयके संबंधित ठेकेदारांना मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या निर्देशानुसार देण्यात येणार आहेत. या संदर्भात तालुका स्तरावरून उप अभियंता यांच्याकडून सविस्तर माहिती मागवण्यात आली आहे.

**- संजय धनशेट्टी,** कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा

**थकित बिलांमुळे ठेकेदार आर्थिक अडचणीत**

जलजीवन मिशनच्या थकित बिलांमुळे ठेकेदार आर्थिक अडचणीत आहेत.शासनाकडून आलेल्या ९.२६ कोटी बिल वाटप करताना अनेक जाचक अटी घालण्यात आले आहेत . त्यामुळे बिल काढताना कामे पूर्ण केलेल्या ठेकेदारांवर अन्याय होणार आहे . देयके अदा करण्यासाठी तयार केलेली प्राधान्यक्रमाची यादी ठेकेदारांना उपलब्ध करून देण्यात यावी.

**- मोतीलाल राठोड,** जिल्हाध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा कॉन्ट्रक्टर्स असोसिएशन



# राज्य सहकारी बँकेस ५०० कोटींचे बॉण्ड वितरीत करण्यास रिझर्व्ह बँकेची परवानगी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

आर्थिकदृष्टया सुदृढ व उत्कृष्ठ बँकांच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेने निश्चित केलेल्या सर्व आर्थिक निकषांची पूर्तता राज्य बँकेने केल्याने इतिहासात प्रथमच रिझर्व्ह बँकेने राज्य सहकारी बँकेस रु.५०० कोटीचे १० वर्षाच्या दीर्घ मुदतीचे बॉण्ड वितरीत करण्यास नुकतीच परवानगी दिलेली आहे.

राज्य बँकेस गेल्या ५ वर्षापासून सतत उच्चांकी नफा होत आहे. गेल्या तीन वर्षात म्हणजे सन २०२२ मध्ये रु.६०३ कोटी, सन २०२३ मध्ये रु.६०९ कोटी व सन २०२४ मध्ये रु.६१५ कोटी नफा झाला आहे. राज्य बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण रिझर्व्ह बँकेच्या आदर्श प्रमाणाच्या आणि राष्ट्रीय मानांकनापेक्षा कितीतरी जास्त म्हणजे १६.३४ टक्के आहे. प्रोव्हीजन कव्हरेज रेशोचे सरासरी राष्ट्रीय मानांकन ६७.५८ टक्के असताना राज्य बँकेचे हे प्रमाण ८३.२८ टक्के इतके सक्षम आहे. राज्य बँकेचा व्यवस्थापन खर्च सरासरी राष्ट्रीय मानांकनापेक्षा खूप कमी म्हणजे ०.५५ टक्के आहे (राष्ट्रीय मानांकन ०.९८ टक्के). राज्य बँकेचा प्रति कर्मचारी व्यवसाय सरासरी राष्ट्रीय मानांकनापेक्षा दुप्पट म्हणजे रु.७६.१५ कोटी इतका आहे (राष्ट्रीय मानांकन ३५.७४ कोटी). तर राज्य बँकेचा प्रति शाखा व्यवसाय हा सरासरी राष्ट्रीय मानांकनापेक्षा साडेचार पटीने म्हणजे रु.१,००४.६४ कोटी इतका आहे (राष्ट्रीय सरासरी मानांकन रु.२७१.१५ कोटी). देशात सर्वात जास्त म्हणजे रु.५,००० कोटीपेक्षा जास्त नेटवर्थ असलेली राज्य बँक ही एकमेव सहकारी बँक आहे.



आर्थिक परिस्थितीचा विचार करुन रिझर्व्ह बँकेने नुकतेच राज्य सहकारी बँकेस रु.५०० कोटीचे १० वर्षाच्या दिर्घ मुदतीचे बॉण्ड वितरीत करण्यास परवानगी दिली आहे. या संदर्भात लवकरच राज्य बँकेतर्फे ऑफर प्रक्रिया सुरु होत असून, या मधील गुंतवणूकीसाठी कमीत कमी वैयक्तिक रु.१० हजार व संस्थात्मक रु.५० हजार इतकी मर्यादा ठेवण्यात येईल. ही गुंतवणूक ही राज्य बँकेच्या भांडवलात जमा होणार असल्याने राज्य बँकेचा स्वनिधी आणखी मजबूत होण्यास मदत होणार आहे. यामुळे राज्य बँक सहकारातील त्रिस्तरीय पतरचना आणखी मजबूत करणार असून, त्याचा फायदा समाजातील सर्व घटकाला होईल असा विश्वास वाटतो.

**-विद्याधर अनास्कर, प्रशासक**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोलापूरचा महागायक कोण? जिल्हास्तरीय गायन स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

स्वरनाद संगीत विद्यालय आणि स्व. हार्दिक पटेल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय हार्दिक पटेल यांच्या स्मृती प्रित्यर्थ जिल्हास्तरीय गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती नागेश पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्राथमिक फेरी ही ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी दोन ते तीन मिनिटांचा व्हिडिओ दिलेल्या मोबाईल नंबर वर पाठवायचा आहे. त्यांच्यातून सेमी फायनल मध्ये ज्यांची निवड होईल त्यांना सेकंड राउंड मध्ये घेण्यात येणार आहे. त्यानंतर अंतिम स्पर्धा घेण्यात येणार आहे. ही स्पर्धा दोन गटांमध्ये घेण्यात येणार आहे. रोख रक्कम, प्रमाणपत्र, ट्रॉफी असे बक्षिसाचे स्वरूप आहे. विद्यार्थ्यांनी आपला गाण्याचा व्हिडिओ ९८ ५०० ८९ ९८० या नंबर वर दि. १० एप्रिल पर्यंत पाठवायचा आहे. अधिक माहितीसाठी ९६ ६५ ४६ १२ ९३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन नागेश पवार यांनी केले आहे.



या पत्रकार परिषदेत हरेश पटेल, हेमाबेन पटेल, दिपाली शहा आदी उपस्थित होते.



## क्राईम वृत्त...




### जागेत अतिक्रमण करणाऱ्या विरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ८ मार्च -**

शांती नगर येथील जागेत अतिक्रमण करणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आरिफ ईस्माईल शेख (वय ५७, रा. रेल्वे लाईन, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इरफान रफिक मुजावर (वय ४३, रा. शिवगंगा नगर भाग २, नई जिंदगी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शांती नगर येथे आरिफ शेख यांची मजरेवाडी जुना सर्व्हे नं. २३३ नविन सर्व्हे नं. ४४/१अ/१ब ही बिनशेती प्लॉट नं. १६६ एकूण क्षेत्र ५४४५ चौफुट जागा आहे. या जागेवरील पूर्व उत्तर व पश्चिम जागेवर २० बाय २८ फुट व १० बाय २० असे एकूण १९०० स्केअर फूट जागेवर इरफान मुजावर याने अस्तित्वात नसलेला प्लॉट नं. २४४ असल्याचे दाखवून त्या जागेवर बेकायदेशीररीत्या अतिक्रमण केले आहे. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक गाढवे पुढील तपास करीत आहेत.



### भांडण सोडविणाऱ्यास दगडाने मारहाण

**सोलापूर, दि. ८ मार्च -**

भांडण सोडविण्यासाठी मध्ये आलेल्या तरूणास दगडाने मारहाण करून जखमी करण्यात आले. याबाबत भास्कर नागराज इराबत्ती (वय ३५, रा. भवानी पेठ, घोंगडे वस्ती, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन श्रीकांत कोळी (रा. भवानी पेठ, घोंगडे वस्ती, सोलापूर) याच्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ६ मार्च रोजी रात्री भवानी पेठ येथे भास्कर इराबत्ती यांच्या घरासमोर बोअरवेल वर इराबत्ती यांचा भाऊ पाणी भरत होता. त्यावेळी श्रीकांत कोळी याने तु या ठिकाणी पाणी भरायचे नाही असे म्हणून शिवीगाळ करीत हाताने मारहाण केली. त्यावेळी भास्कर इराबत्ती हा भांडण सोडविण्यासाठी मध्ये आला असता श्रीकांत कोळी याने दगडाने इराबत्ती यास डोक्यात मारून जखमी केले. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार दुधाळे पुढील तपास करीत आहेत.

# हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्यासाठी जादा पैसे घेतल्यास कारवाई : आरटीओ

- नंबरप्लेटच्या नोंदणीस अत्यल्प प्रतिसाद
- केवळ १८३३ वाहनांना एचएसआरपी बसविण्याचे काम पूर्ण

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. ८ मार्च -**

परिवहन विभागाने राज्यातील २०१९ पूर्वी खरेदी केलेल्या वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट (एचएसआरपी) ३० एप्रिलपूर्वी बसवणे अनिवार्य केले होते. त्याला सोलापुरात वाहनाधारकांचा अत्यल्प प्रतिसाद मिळत असून, केवळ १८३३ वाहनधारकांनी एचएसआरपी लावण्यासाठी अर्ज केले असून त्या वाहनांना नवीन नंबरप्लेट बसविण्यात आली आहे. नविन नंबर प्लेट बसविताना ऑनलाईन पेमेंट केल्यानंतर प्लेट बसविण्यासाठी वेगळे पैसे देण्याची गरज नसल्याचे परिवहन अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

देशातील सर्व वाहन उत्पादक कंपन्यांना एक एप्रिल २०१९ पासून सर्व वाहनांना हाय रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बंधनकारक केले आहे. नवीन वाहन खरेदी नंबरप्लेट लावल्या केल्यानंतर या जातात. मात्र, २०१९ पूर्वीच्या जुन्या



वाहनांनाही परिवहन विभागाने बसविणे बंधनकारक एचएसआरपी केले आहे. त्यामुळे वाहनधारकांकडून प्रमाणात अर्ज करण्यात येत आहे. हाय सिक्युरिटी नंबरप्लेट वाहनाच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी तयार करण्यात आली आहे. ती न बसविल्यास दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.सन २०१९ पूर्वीच्या जुन्या वाहनांना एसएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी परिवहन विभागाकडून देण्यात आलेल्या लिंकवर वाहनधारकांनी योग्य ती माहिती भरून ऑनलाईन पध्दतीने पैसे भरायचे आहेत. यामध्ये नंबर प्लेट, बारकोड, नंबर प्लेट बसविण्याचे पैसे आणि जीएसटी कराचा समावेश आहे. परंतु, सोलापूरातील काही केंद्रामध्ये नंबर प्लेट बसविण्यासाठी १०० रुपये जादा आकारणी केली जात असल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे वाहनधारकांच्या खिशाला कात्री बसत आहे.

**वाहनधारकांकडून अत्यल्प प्रतिसाद...**
सोलापूर प्रादेशिक परिवहन विभागांतर्गत शहरात एचएसआरपी नंबर प्लेट लावण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. ऑनलाइनची सुविधा असल्याने अनेक वाहनधारकांना अर्ज करण्याचे सोयीचे ठरत आहे. सोलापूर शहरात एचएसआरपी बसवून देण्यासाठी केंद्रे सुरू करण्यात आली आहे. वाहन विक्रेत्यांनाही एचएसआरपी बसविण्याचा परवाना देण्यात आला आहे.

**अत्यल्प प्रतिसादामुळे वेटिंग नाही...**
एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याचे प्रमाण हळूहळू वाढत आहे. त्यासाठी नागरिकाकडून ऑनलाइन नोंदणी केली जात आहे. नोंदणी करणाऱ्यांचे प्रमाण सध्या तरी अत्यल्प असल्यामुळे नागरिकांना आता नंबरप्लेट बसविण्यासाठी १ ते २ दिवसांमधील तारीख मिळत आहे. येत्या काळात नंबरप्लेट बसविण्यासाठीची केंद्रे वाढण्याचीही शक्यता आहे.

जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसवण्याचे काम सुरु आहे. त्याला सोलापुरात अत्यल्प प्रतिसाद मिळत आले. सोलापूर कार्यालयाकडील सुमारे ६ लाखांपेक्षा जास्त वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे येत्या काळात हा आकडा आणखी वाढणार आहे. ऑनलाईन पैसे भरल्यानंतर नंबर प्लेट बसविण्यासाठी वेगळे पैसे देण्याची गरज नाही. नंबर प्लेट बसविणाऱ्या केंद्रावर जादा पैसे घेण्यात येत असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.

- **गजानन नेरपगार,** प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर

# वीज बिल थकल्याने वीज कनेक्शन कट केले

- जिल्हा न्यायालयासमोरील विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयात गोंधळ घालणाऱ्याविरुध्द गुन्हा



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मार्च -**

वीज बिल थकल्याने वीज कनेक्शन कट केल्यानंतर चिडलेल्या ग्राहकाने जिल्हा न्यायालयासमोरील विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयात गोंधळ घालून सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विद्युत तंत्रज्ञ पृथ्वीराज दशरथसिंग राजपूत (वय ३२, रा. उत्तर कसबा, अवस्थी पॅलेस, चौपाड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन किरण बन्सीलाल परदेशी (रा. दक्षिण सदर बझार, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

किरण परदेशी याच्या घराचे वीज बिल थकीत राहिल्याने विद्युत वितरण कंपनीकडून परदेशी याच्या घराचे वीज कनेक्शन कट करण्यात आले आहे. याचा राग मनात धरून परदेशी हा ७ मार्च रोजी दुपारी जिल्हा न्यायालया समोरील विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयात गेला.

तिथे मोठ्याने आरडा ओरड करून ऑफीसमधील ॲल्युमिनियमची शिडी ऑफीसबाहेर फेकून देऊन विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी आवारे यांच्याशी हुज्जत घातली. तसेच कार्यालरयातील इतर स्टाफ हा कार्यालयात काम करीत असताना कार्यालयाचे शटर बंद करून त्यांना बाहेर येण्या-जाण्यास मज्जाव करून दमदाटी करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार मनोहर पुढील तपास करीत आहेत.

# बांगलादेशी घुसखोरांची सखोल चौकशी करून कारवाई करा

**भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांची पोलीस आयुक्तांकडे मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मार्च -**

सोलापुरात आणखी बांगलादेशी घुसखोर असण्याची शक्यता आहे. त्यांना शोधून काढावे आणि अवैधरित्या सोलापुरात राहण्यासाठी त्यांना मदत केलेल्यांची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे यांनी शुक्रवारी पोलीस आयुक्त राजकुमार यांच्याकडे केली. याबाबतचे मागणीचे निवेदन भाजप शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी भारतीय जनता पार्टीतर्फे दिले.

यावेळी शहर अध्यक्ष नरेंद्र काळे म्हणाले, सोलापूर शहर पोलीस आणि दहशतवाद विरोधी पथकाकडून बुधवारी रात्री उशिरा एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील १२ बांगलादेशी घुसखोरांना पकडण्यात आले. त्यांच्याकडे बनावट आधार कार्ड, पॅन कार्ड आढळून आले आहेत. ही बनावट कागदपत्रे ताबडतोब रद्द करावीत आणि ही बनावट कागदपत्रे या बांगलादेशी घुसखोरांना कोणी तयार करून दिली याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे, असे शहराध्यक्ष नरेंद्र काळे म्हणाले. लोकसभा निवडणुकीप्रसंगी अशा अनेकांची नावे मतदारयादीत देखील असल्याचे आढळून आले होते. बांगलादेशी घुसखोर शहर आणि जिल्ह्यात आणखी कोणत्या ठिकाणी वास्तव्यास आहेत, याची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. तसेच त्यांना आश्रय देणाऱ्या टोळ्या शोधून काढून त्यांच्यावरही कारवाई व्हावी, अशी मागणी शहर अध्यक्ष नरेंद्र काळे यांनी पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांच्याकडे केली. यावेळी मागणीचे निवेदन पोलीस आयुक्तांना देण्यात आले. हे निवेदन देताना भाजपा सोलापूर शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, सरचिटणीस पांडुरंग दिड्डी, विशाल गायकवाड, उपाध्यक्ष श्रीनिवास करली, अनंत जाधव, सोमनाथ केंगनाळकर, ओबीसी मोर्चा अध्यक्ष राम वाकसे, अनिल कंदलगी, माजी नगरसेवक रवी कैयावाले, चिटणीस बजरंग कुलकर्णी, श्रीनिवास पुरुड, श्रीकांत घाडगे आदी उपस्थित होते.



# दोन दिवसांच्या कारवाईत ४५ गुन्हे दाखल; १९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मार्च -**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने ६ आणि ७ मार्च रोजी करण्यात आलेल्या कारवाईत ४५ गुन्हे दाखल करण्यात येऊन १९ लाख २४ हजार ७२१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने ६ आणि ७ मार्च रोजी सोलापूर शहर व जिल्ह्यात अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रावर तसेच अवैध देशी-विदेशी मद्य विक्रि व वाहतूकीवर कारवाई करण्याची मोहिम उघण्यात आली होती. या मोहिमेत एकूण ४५ गुन्हे दाखल करण्यात येऊन ३८ जणांना अटक करण्यात आली. २७ हजार



१०० लिटर गुळमिश्रीत रसायन नष्ट करून ४७५ लिटर हातभट्टी दारू जप्त करण्यात आली. ६७.८ बल्क लिटर देशी मद्य, ६.३ बल्क लिटर विदेशी मद्य, २२५ लिटर ताडी व ३ वाहने असा १९ लाख २४ हजार ७२१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच दारूबंदी कायद्यातील कलम ९३ नुसार १६ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करून ७ लाख २५ हजार रुपयांचे बंधपत्रे (बॉन्ड) घेण्यात आले. ही कारवाई विभागीय उपायुक्त सागर धोमकर, अधिक्षक श्रीमती भाग्यश्री जाधव, उपअधिक्षक एस आर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक आर.एम. चवरे, जे एन पाटील, अे व्हि घाटगे, राकेश पवार, दुय्यम निरीक्षक एस डी कांबळे, आर एम कोलते, धनाजी पोवार, समाधान शेळके, सुखदेव सिद, नांगरे, पडवळ, अंजली सरवदे, श्रीमती बहुधने, सहायक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, मोहन जाधव, संजय चव्हाण, विजय पवर, जवान आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, शोएब बेगमपूरे, वसंत राठोड, चेतन व्हनगुंटी, ईस्माईल गोडीकट, कपील स्वामी, प्रशांत इंगोले, अनिल पांढरे, विनायक काळे, आर पी कांबळे, योगीराज तोग्गी, रशीद शेख, दिपक वाघमारे यांनी केली.

# बाजार समिती निवडणूक प्रक्रियेस १७ मार्चपासून सुरुवात

- अर्ज स्वीकृती आणि मागे घेण्याची प्रक्रिया होणार पूर्ण
- बाजार समितीच्या काम काजात सुसूत्रता येण्यासाठी राष्ट्रीय बाजार समिती गठित

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.८ मार्च-**

उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी कार्यक्रमाची तयारी सुरू असतानाच राष्ट्रीय बाजारच्या दृष्टीने राज्य सरकारची पावले उचललेली जात आहेत. याबाबतचा अध्यादेश काढत राज्य सरकारने मंत्रिगटाची उपसमिती गठित केली आहे.

दरम्यान, राष्ट्रीय बाजारच्या रचनेसंदर्भातील सुधारणेच्या अनुषंगाने शिफारस करण्यासाठी स्थापन केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीमध्ये राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल (अध्यक्ष), जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील (सदस्य), शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे (सदस्य), कृषिमंत्री माणिकरावः कोकाटे (सदस्य), कृषी विभागाचे प्रधान सचिव (सदस्य) आणि पणन विभागाचे प्रधान सचिव (सदस्य सचिव) यांचा समावेश असणार आहे.

दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया चार आठवड्यांच्या आत सुरू करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने नुकतेच दिले होते. त्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड निवडणूक कार्यक्रम करण्याच्या तयारीत होते. अचानक राज्य शासनाचा नवा आदेश आल्याने या निवडणूक प्रक्रियेला ब्रेक लागणार का? असे प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. मात्र बाजार समितीची निवडणूक होणार आहे. आणि त्यासाठीची प्रक्रिया ही निवडणूक प्राधिकरण कार्यालयामार्फत ठरवण्यात येणार आहे. असेही यावेळी सांगण्यात येत आहे.

| मतदारांची संख्या | |
|---|---|
| सोसायटी मतदार | १८८५ |
| ग्रामपंचायत मतदार | ११७६ |
| हमाल तोलार मतदार | १०८४ |
| व्यापारी मतदार | १२७६ |
| एकूण मतदार | ५४३१ |



**राज्य शासनाची समिती कशासाठी ?**

राज्यातील विविध बाजार समित्या ज्या वर्गात मोडतात. त्यावर्गातील बाजार समितीचा इनाम अर्थात राष्ट्रीयकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी विशिष्ट समिती गठित करण्यात येणार आहे. ज्या बाजार समितीमध्ये इतर राज्यातून विविध शेतमालाची आवक-जावक ज्या प्रमाणात होते. त्याचे प्रमाण लक्षात घेऊन बाजार समितीचे "अ, ब, क, ड" असे वर्ग करण्यात आले आहेत. त्या वर्गानुसार केंद्र सरकार याबाजार समितीच्या व्यवहारांमध्ये लक्ष घालणार आहे. बाजार समितीमधील विविध गोष्टींसाठी ही समिती काम करणार आहे. प्रत्येक कामकाजासाठी वरिष्ठ स्तरावर त्याबाबतचा निर्णय घेतला जाणार आहे. त्यानंतर स्थानिक पातळीवर बाजार समितीमध्ये चर्चा होऊन, त्याला मान्यता द्यायची किंवा नाही याबाबतचा निर्णय यामध्ये घेण्यात येणार आहे. केंद्र सरकारची समिती आणि राज्य शासनाची उपसमित्या मिळून हे काम करणार आहेत. त्याचा आणि बाजार समिती निवडणुकीचा कोणताही संबंध नाही. बाजार समितीचे संचालक मंडळ या समितीमध्ये सदस्य म्हणून असणार आहेत. कामकाजाचे निरीक्षण आणि परीक्षण संचालक मंडळ करणार आहेत.

**१७ मार्चपासून निवडणूक प्रक्रिया?**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिल्यानंतर बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया कधी आणि कुठून सुरू होईल, याकडेच सर्वांचे लक्ष लागले आहेत. अशातच बाजार समितीसाठी राज्य शासनाने समिती गठित केली आहे. त्यामुळे निवडणुकीचे बिगुल वाजणार की नाही? याबाबत बाजार समितीच्या वर्तुळात पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. मात्र या समितीचा आणि निवडणुकीचा काहीही संबंध नसल्याचे सांगण्यात येत आहे. बाजार समितीतीच्या कामकाजासाठी कामकाजातील सुसूत्रता टिकून राहण्यासाठी ही सदरची समिती कामकाज करणार आहे. संचालक मंडळ देखील या समितीमध्ये असणार आहेत. त्यामुळे संचालक मंडळासाठी निवडणूक घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया सोमवार दिनांक १७ मार्च पासून सुरळीतपणे सुरू होईल असा अंदाज आहे. अर्ज स्वीकृती या टप्प्यापर्यंत बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया येऊन थांबली होती. त्याच टप्प्यावरून बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया सुरू होणार आहे. अर्ज घेण्यासाठी आणखीन काही दिवसांचा कालावधी उमेदवारांना मिळणार आहे. त्यानुसार पुढील सोमवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू होईल. १३ किंवा २३ एप्रिल रोजी मतदान होण्याची शक्यता आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. मतदान झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी लगेच मतमोजणी देखील घेण्याची तयारी केली जात आहे. गुरुवारी दिवसभर जिल्हा निवडणूक कार्यालयात यावर खलबते सुरू होती. निवडणूक कार्यक्रम तयार करून मंजुरीसाठी तो राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाकडे पाठवण्यात येणार आहे. तदनंतर प्रत्यक्षात निवडणुकीच्या कामकाजाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे राज्य शासनाने स्थापित केलेली समितीमुळे बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया स्थगित होणार नसल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

**अशी आहे संचालक मंडळाची रचना...**

सोसायटी मतदारसंघातील ११ जागांपैकी ७ सर्वसाधारण, २ महिला १ इतर मागास प्रवर्ग आणि एक भटक्या जाती जमाती. ग्रामपंचायती मतदार संघातील ४ जागांसाठी २ सर्वसाधारण १ आर्थिक दुर्बल घटक आणि एक भटक्या जाती जमाती. व्यापारी मतदारसंघातून २ तर हमाल आणि तोलार मतदारसंघातून १ याप्रमाणे एकूण १८ जणांचे हे संचालक मंडळ कार्यरत असणार आहे. त्यासाठी निवडणूक होणार आहे.

# जामिनावर मुक्तता होताच कारागृहाबाहेर फटाके उडविले

- व्हिडोओ व्हायरल, एकावर गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मार्च -**

सोलापुरात कधी कोण काय करेल याचा नेम नाही. कारण सोलापूरकर हे शेवटी सोलापूरकरच. असं म्हणण्याच कारणही तसच आहे. भावाची जामिनावर मुक्तता होताच एकाने थेट कारागृह बाहेरच फटाके फोडल्याचा प्रकार सोलापुरात घडला आहे. जिल्हा कारागृहाच्या समोर रात्री उशिरा फटाके फोडल्याचे व्हिडिओ शेअर करत सोशल मीडियावर हिरोगिरी करणाऱ्या तरुणाची हिरोगिरी सोलापूर पोलिसांनी चांगलीच उतरवली आहे.



प्रवीण चौगुले असे या फटाके उडविल्यानंतर पोलिसांकडून करण्यात आलेल्या कारवाईनंतर माफी मागणाऱ्या तरुणाचे आहे. काही दिवसापूर्वी प्रवीण चौगुले याचा भावाला एका प्रकरणात अटक करण्यात आली होती. त्याच्या भावाची जामीनावर सुटका होताच प्रवीण याने रात्रीच्यावेळी सोलापूर जिल्हा कारागृहाच्या समोर चक्क फटाके फोडले. फटाके फोडतानाचा हाच व्हिडिओ 'इनके दिल में ना पुलिस का डर है, और ना ही कानून का खौफ, ये अपने इलाखे के बेताज बादशाह है' असे म्हणत फटाके उडवितानाचा व्हिडीओ सोशल मिडीयावरील इस्टाग्रामवर शेअर केला होता. सोशल मीडियावर हा व्हिडीओ मोठ्या प्रमाणात वायरल झाला. तो व्हिडीओ तसाच शहर पोलिसांपर्यंत पोहोचताच पोलिसांनी प्रवीण चौगुले यास पोलिसांनी चांगलीच अद्दल घडवली.


त्यानंतर प्रवीण याने स्वतःचा माफी मागत असलेला व्हिडीओ काढून पुन्हा एकदा अशी चूक होणार नाही अशी कबुली देत तो व्हिडीओ व्हायरल केला. दरम्यान प्रवीण चौगुले विरोधात रात्री उशिरा फटाके फोडल्याप्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच सोशल मीडियावर कोणीही दहशत पसरवणारे व्हिडिओ शेअर करू नये. असे आवाहन देखील पोलिसांनी केलंय.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ज्ञानामृत आनंदलहरी - १०५१

**संतीं सांगितले ।**
**ते म्यां ह्रदयीं धरिले ।।**

आईवडिलांनी आपले सर्व पाहावे असे लेकराला वाटते. असे वाटणे साहजिकही आहे. विशेष म्हणजे लेकराला असे वाटले नाही तरी आईबाप त्याचे सर्व पाहतच असतात. कारण त्यांनी त्या लेकराचा अंगिकार केलेला असतो. आपणही वृध्दापकाळात आईवडिलांचे सर्व पाहायला पाहीजे. असो, आपला इतर कोणी अंगिकार केला तर त्याने आपले सुख दु:ख चांगले वाईट सर्व कांही स्विकारावे आणि आपला सांभाळ करावा असे आपणाला वाटते. खरे म्हणजे असे वाटणे गैरही नाही. पण जेव्हा आपण दुसऱ्याचा अंगिकार करतो तेव्हा आपण त्याचा पूर्णत: स्विकार करतो का? हा प्रश्न आपणच आपणाला विचारला तर बहुतांशी याचे उत्तर नाही असे येईल. बहुतांशाच्या बाबतीत नाही हेच उत्तर खरे असणार आहे. हे खरे नसते तर जीवनसाथी म्हणून स्विकार केला तरी कालांतराने दिसायला चांगली नाही, तिला कामच येत नाही, तिला समजतच नाही, असे मनात आलेच नसते आणि छळ, हुंडाबळी,



परस्त्रीगमन, घटस्फोटासारख्या घटना घडल्याच नसत्या. त्याचबरोबर दिसायला सुंदर नाही, भोळसट आहे, आळशी आहे वगैरे म्हणून एखादया पत्नीने पतीला सोडले नसते किंवा परपुरुषाकडे दृष्टी वळवळी नसती. खरे म्हणजे जो कांही विचार करायला हवा तो स्विकार करतेवेळीच करायला हवा. एकदा स्विकार केल्यानंतर दोष पाहणे संयुक्तिक नसते. पांडूरंगाने आपला अंगिकार केल्याने तो आपला भार सांभाळेलच, त्याला भार सांभाळावाच लागेल, अंगिकार केला । भार चालवी विठ्ठला ।।, असा सेनाजींना विश्वास आहे. चोखोबारायांनीही, केला अंगीकार । उतरिला भार ।।, असे म्हटले आहे. सेना महाराजांना भगवंताबाबत जसा विश्वास वाटतो, तसा आपणालाही विश्वास वाटेल अशी आपली भक्ती असावी. भक्तीत धरसोडपणा नसावा. भपकेबाजीपणा किंवा चमत्कारिकपणा करून मार्गदर्शनाच्या नावाखाली भोळ्याभाबड्यांना लुटणाऱ्यांची संख्या समाजात खूप आहे. नि:स्वार्थ भावनेने स्वानुभवातून इतरांना मार्गदर्शन करणाऱ्यांची समाजाला अत्यंत गरज असली तरी अशा महात्म्यांची संख्या कमी दिसते, हे आपणाला मान्य करावे लागेल. बहुतांश लोक भपकेपणा आणि चमत्कारिकता याला बळी पडतात. पण आपल्या सद्गुरु कृपेने आपणाला खऱ्या आणि फसव्या संतातील फरक कळला. खऱ्या संतांची प्रचितीही आली. अशा संतांनी सांगीतलेले विचार आपण केवळ डोक्यात न घेता ह्रदयात घेतले, संतीं सांगितले । ते म्यां ह्रदयीं धरिले ।।, असे सेनाजी म्हणतात. डोक्यात व्यवहार असतो आणि ह्रदयात नि:स्वार्थ प्रेम असते. ज्ञानोबा तुकोबासह सर्व संत महात्म्यांनी डोक्यापेक्षा ह्रदयावरच जास्त भर दिल्याचे आपणाला पहायला मिळते. प्रत्येक जीव जर खरोखरच डोक्याला (बुध्दीला) ह्रदयाची जोड देवून वागू लागला तर प्रत्येकजण म्हणजेच एका अर्थाने संपूर्ण समाज समस्यामुक्त होईल. म्हणून समस्यामुक्त समाजाच्या निर्मितीचा विडा उचलेल्या संतांचे विचार आपण ह्रदयात धारण करायला हवेत. अशाने आपल्याबरोबर इतरांचाही आनंद वाढेल.

**जय जय राम कृष्ण हरी ।।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - |
| दि. ९ मार्च २०२५ | चांगला दिवस |
| विक्रम संवत् २०८०-८१ | स्वामी युक्तेश्वर पुण्यतिथी |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. दशमी (०७.४५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पुनर्वसू (२३.५४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सौभाग्य (१४.५७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (१९.४०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**वृषभ :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील. विद्यार्थ्यांना लाभदायक राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल. शक्यतो जिवनातील निर्णय योग्य व विचार करून घ्या.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल.

# दोन दिवसात १०७ ठिकाणांची स्वच्छता

## शहरातील ५९३ कचऱ्याची ठिकाणे स्वच्छ करण्याच्या मोहिमेस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

शहरात विविध ठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसून येत असल्याची ओरड होत होती. अशी एकूण ५९३ कचऱ्याची ठिकाणे आढळून आली. महापालिकेच्या वतीने कचरा उघड्यावर टाकण्यात येणारी अशी ठिकाणे स्वच्छ करण्याच्या विशेष मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. गेल्या तीन दिवसात १०७ ठिकाणे स्वच्छ अन् सुंदर करण्यात आली. त्या ठिकाणी रांगोळी घालण्यात आली. इथे कचरा टाकू नका असे सूचना फलक लावण्यात आले. यामुळे त्या ठिकाणाचे चित्र बदलल्याचे पाहायला मिळाले.

शहरात नागरिक मोठ्या प्रमाणावर कचरा टाकतात अशी आणखी सुमारे ५९३ ठिकाणे आढळून आली आहेत. अशा ठिकाणच्या भागात घंटागाड्या या घरोघरी नियमित जात नाहीत अथवा घंटागाडीमध्ये कचरा न टाकता नागरिक बेजबाबदारपणे कचरा उघड्यावर टाकतात. याबाबत संबंधित मुख्य आरोग्य निरीक्षक अथवा आरोग्य निरीक्षक यांचे योग्य नियंत्रण नाही असे दिसून येते. त्यामुळे पुनश्चः कचऱ्याचे ढीग हटविण्यासंदर्भात विशेष स्वच्छता मोहीम ३.० राबविणेत येत आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली

या मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला आहे. साधारणता: महिनाभर ही मोहीम चालणार आहे. यामध्ये प्रथम प्राधान्य देऊन सर्व ५९३ ठिकाणचा कचरा हटवून तो परिसर कचरा मुक्त करण्यात येणार आहे. ही कार्यवाही झाल्या नंतर मात्र पुनश्चः अशा ठिकाणी कचऱ्याचे ठिकाण निर्माण होणार नाही याची खबरदारी मुख्य आरोग्य निरीक्षक तसेच आरोग्य निरीक्षक हे घेणार आहेत.

कचऱ्याची ठिकाणाच्या आजूबाजूचे भागामध्ये असलेल्या नागरी/व्यापारी क्षेत्रामधील दुकानातील कचरा रोजचेरोज उचलण्यासाठी घंटागाडी प्रत्येक घरोघरी व दुकानी कचरा संकलनासाठी पोहोचणार आहे.



### कचरा काढल्यानंतर तेथे सेवक पंधरा दिवस राहणार तैनात

कचरा काढलेल्या ठिकाणी रांगोळी काढण्यात आली. नियमितपणे त्या ठिकाणी रांगोळी काढण्यात येणार आहे. कचऱ्याचे ढीग मुक्त ठिकाण केल्यानंतर त्या ठिकाणी पुरुष सेवक पंधरा दिवस पूर्ण वेळ दोन पाळ्यामध्ये प्रन, मास्क व शिट्टीसह तैनात राहणार आहेत. कचरा टाकू नये म्हणून तो वेळोवेळी नागरिकांना सूचना करणार आहे. परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी स्थानिक नागरिक, दुकानदार व स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात येत आहे, असे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी स्पष्ट केले.

### कचऱ्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उपाय

कचरा काढल्यानंतर त्या ठिकाणी इथे कचरा टाकू नये अशा सूचना लावण्यात येत आहेत. जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. कोणी पुन्हा त्या ठिकाणी कचरा टाकल तर संबंधित व्यक्तीवर दंड आकारण्यात येणार आहे.स्वच्छ केलेल्या ठिकाणी पुन्हा कचरा टाकल्याचे सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसून आल्यास संबंधितांची ओळख पटवून त्याविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. कचरा हटविलेल्या ठिकाणी झाडे लावण्यात येत येणार आहेत तसेच कुंडी ठेवण्यात येणार आहे. मोठ्या प्रमाणात ठिकाण असल्यास उद्यानाची निर्मिती करण्यात येणार आहे. त्याचबरोबर कचरा पुन्हा टाकला जात असेल तर अधिक कठोर उपाय योजना करण्यात येणार असून त्यामध्ये सीसीटीव्ही तपासून मोठा दंड आकारणे, सामाजिक सेवा शिक्षा देण्यात यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# रक्त चाचण्या करणाऱ्या 'त्या' लॅबच्या चौकशीसाठी आझाद मैदानावर उपोषण

## संत रोहिदास सामाजिक संघटनेच्या वतीने इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर अंतर्गत महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेमध्ये बोगस रक्त चाचण्या केल्याप्रकरणी लॅबची चौकशी न झाल्याने आठ दिवसानंतर आझाद मैदानावर उपोषण करण्यात येणार आहे, असा इशारा संत रोहिदास सामाजिक संघटनेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष विठ्ठल वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर अंतर्गत महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेमध्ये डॉक्टरांच्या आदेशान्वये विविध रक्त चाचण्या प्रक्रियेमध्ये रक्त चाचण्याचे बोगस बिले काढल्याने दि १ एप्रिल २०२२ ते १६ सप्टेंबर २०२४ या काळातील जे रक्त चाचण्या लॅबची चौकशी करण्यात यावी अशी मागणी संत रोहिदास सामाजिक संघटनेच्यावतीने दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी अधिष्ठाता संजीव ठाकूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती.

यावेळी अधिष्ठाता संजीव ठाकूर यांनी १५ दिवसात चौकशी अहवाल देण्यात येईल असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले होते. आज ६ महिने झाले अद्याप कोणताही चौकशी अहवाल अथवा साधे पत्रव्यवहार देखील सिव्हील हॉस्पिटल यांचेकडून झाला नाही.तात्काळ कारवाई करावी व संघटनेस अहवाल प्राप्त व्हावा यासाठी स्मरणपत्र देवून देखील काही हालचाल न झाल्याने दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी वैद्यकीय शिक्षण आयुष्य द्रव्य विभाग मुंबई आयुक्त, वैद्यकीय शिक्षण संचालनालय मुंबईचे संचालक आणि महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदन दिले.

बेमुदत धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा दिलेला होता. आश्वासन दिल्यानंतर तुर्तास आंदोलन स्थगित करण्यात आले. धरण येथे आठ दिवसात चौकशांती संबंधितांवर कारवाई न झाल्यास आझाद मैदानावर उपोषण करण्यात येईल असा इशारा संस्थापक अध्यक्ष विठ्ठल व्हनमारे यांनी दिला.

या पत्रकार परिषदेस हरि वाघमारे, श्रीनिवास धुळगुंडे, सोपान थोरात, प्रभाकर शिंदे आदी उपस्थित होते.



# हिंदूराष्ट्र सेनेच्या वतीने पोलीस आयुक्तांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च,**

सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या पोलीस पथकांने सोलापूर शहरातील बांग्लादेशी घुसखोरांना शोधून काढल्याबद्दल व देशाची सुरक्षितता अबाधित राखल्याबद्दल हिंदूराष्ट्र सेना सोलापूरच्या पदाधिकार्यांकडून पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांचे सत्कार करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष रवि गोणे, शहर संघटक आनंद मुसळे, विजय महिंद्रकर, अभिजीत अरळीकर. अविनाश सज्जन महाराज , अक्षय पाटील, सागर कोळी, , जयंत ताटी आदींची उपस्थिती होती.

# वर्षानुवर्षे सोलापूरच्या समस्या सुटत नसल्याने लाक्षणिक उपोषण

## सोलापूर विकास मंच करणार मंगळवारी उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

वर्षानुवर्षे सोलापूरच्या समस्या का सुटत नाहीत असा सवाल उपस्थित करत सोलापूर विकास मंचच्या वतीने मंगळवार ११ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत सोलापूर जिल्हा परिषदेच्या पुनम गेटसमोर लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे.

सोलापूरच्या दीर्घकाळ प्रलंबित आणि तातडीने मार्गी लावाव्या लागणाऱ्या विकासकामांवर चर्चा करण्यासाठी सोलापूर विकास मंचच्या वतीने शासकीय विश्रामगृहात विशेष बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत शहराच्या विस्कळीत, दुषित आणि अनियमित पाणीपुरवठा, दुहेरी जलवाहिनी, स्मार्ट सिटी प्रकल्प,शहर पाणीपुरवठा सुधारणा साठी नगरोथ्थान योजनेतुन ८० कोटी रूपये मिळाले, त्या पैशातुन नेमक्या काय काय सुधारणा झाल्या?, आय.टी. पार्क, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आदी विषयांवर व्यापक चर्चा झाली. बैठकीत पुढील महत्त्वाच्या मुद्द्यांवर सरकारच्या निष्क्रियतेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

दोवोसमधून सोलापूरला एकही रुपयांची गुंतवणूक मिळाली नाही. सोलापूर विमानसेवा अद्यापही सुरू नाही. दुहेरी जलवाहिनी प्रकल्प रखडला. शहरातील दोन उड्डाणपूल अद्याप अपूर्ण आहे. एम.आय.डी.सी.तील विविध समस्या प्रलंबित आहेत. छत्रपती संभाजी महाराज चौक ते सीएनएस हॉस्पिटल ५४ मीटर रस्ता रखडलेला आहे. नवीन डी.पी. प्लॅनविषयी नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. जुळे सोलापूर प्राधिकरण अस्तित्वात येणे अत्यावश्यक आहे. शहर परिवहन विभागासाठी नवीन बसेस आणि सुधारणा गरजेची आहे. सोलापुरातील तरुणांमध्ये वाढत चाललेला मावा, मटका, मिरवणूक, डी. जे. डॉल्बी आणि लेझरचा विळखा गंभीर आहे.

सोलापूरातील आय.टी. उद्योजकांसाठी विशेष तरतुदी आणि आय.टी. पार्कची स्थापना करावी यावर कुठलीही ठोस कार्यवाही होत नसल्याने आता तीव्र आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे.

या बैठकीस सोलापूर विकास मंचचे केतन शहा, मिलिंद भोसले, योगिन गुर्जर, विजय कुंदन जाधव, ॲड.दत्तात्रय अंबुरे, मनोज क्षिरसागर, सुहास भोसले, आनंद पाटील, अर्जुन रामगिर, भारत पाटील, निरज मेहता, माऊली झांबरे, डॉ.सुरेश खमितकर, बाळासाहेब मोरे, रेवण आयगोळे, सुर्यकांत पारेकर, योगेश सलगर आदी मान्यवर सदस्य उपस्थित होते.

# हरित रसायनशास्त्राच्या दृष्टीने संशोधन वाढवा!

## सोलापूर विद्यापीठात आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र परिषदेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

समाजाची खरी गरज ओळखून त्यावर शाश्वत उपायासाठी संशोधकांनी संशोधन केले पाहिजे. तसेच विषारी रसायनाचा वापर कमी करून हरित रसायनशास्त्राच्या दृष्टीने संशोधन वाढवावे, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. बाबासाहेब बंडगर यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलाच्यावतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधूनकुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली भविष्यासाठी रसायनशास्त्र: शाश्वत उपायांसाठी पुढाकार या विषयावर आयोजित दोन दिवशीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन माजी कुलगुरू डॉ. बाबासाहेब बंडगर यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा हे होते. यावेळी प्रा. अना रीटा सी. डुआर्ते, नोव्हा विद्यापीठ, पोर्तुगाल,



डॉ. रीटा क्रावेरो, नोव्हा विद्यापीठ, पोर्तुगाल आणि प्रा. पेट्रीशिया थॉर्नली क्रावेरो, युनायटेड किंगडम तसेच रसांच्या संकुलाच्या संचालिका अंजना लावंड, डॉ. प्रकाश वडगावकर, डॉ. समीर चिक्कळी, डॉ. विकास कडू , डॉ. सदानंद शृंगारे आदींची पमुख उपस्थिती होती. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत आंतरराष्ट्रीय परिषदेचे समन्वयक डॉ. अनिल घनवट यांनी केले.

माजी कुलगुरू डॉ. बंडगर म्हणाले की, विषारी रसायनाच्या अतिवापरामुळे आज पर्यावरणावर परिणाम होत आहे. पर्यावरणास व मानवाला धोका न होता रसायनांचा वापर कशा रीतीने करता येईल, या दृष्टीने संशोधन वाढणे आवश्यक आहे. त्याचबरोबर दुर्धर व गंभीर आजारांवर देखील गरिबांना परवडणाऱ्या औषधांची निर्मिती व्हावी, या दृष्टिकोनातून देखील औषधी रसायनशास्त्रातील तज्ञांनी संशोधन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

अना रीटा सी. डुआर्ते म्हणाल्या, नैसर्गिक द्रव पदार्थांचा वापर वाढणे आवश्यक आहे. पेट्रीशिया थॉर्नली क्रावेरो म्हणाल्या की, हरित व शाश्वत उपयोगासाठी लागणाऱ्या रासायनिक पदार्थांची निर्मिती वाढावी. आज जगभरात त्या दृष्टिकोनातून संशोधन सुरू झाले आहे, ही चांगली गोष्ट आहे.

# आर्यनंदी पतसंस्थेचे महिला पुरस्कार जाहीर; शिवस्मारक सभागृहात मंगळवारी वितरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्थेच्या रौप्यमहोत्सव पूर्ती व महिला दिनानिमित्त मंगळवार ११ मार्च रोजी, सायं ५.३० वाजता नवी पेठेतील ''शिवस्मारक सभागृह येथे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या कर्तुत्ववान महिलांना आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने ''आर्यनंदी आदर्श महिला पुरस्कार २०२५'' पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा समाज कल्याणचे सहा. आयुक्त, सुलोचना सोनवणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप व जिल्हा सरकारी वकील, ॲड. शितल डोके सुर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. तरी नागरीकांनी उपस्थित रहावे, असे आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष बाहुबली श. दुरूगकर यांनी कळविलेआहे.



डॉ. श्वेता शहा | ॲड. मंजुश्री देशमुख | दिपाली श्रीगारी | नयना भोसले | अश्विनी कंदले



शुभदा देशपांडे | माधुरी माढेकर | नर्मदा कनकी-मिठ्ठा | युक्ता व्यवहारे | स्वरदा मोहोळकर

### विविध क्षेत्रातील दहा महिलांचा होणार सन्मान

डॉ. श्वेता शहा (वैद्यकीय सेवा), दिपाली श्रीगारी (अर्थ सेवा), अश्विनी कंदले (स्थापत्य अभियांत्रिकी सेवा), माधुरी माढेकर (सौंदर्यशास्त्र क्षेत्र), युक्ता सुरेश व्यवहारे (ज्यु. मिस इंडीया), ॲड. मंजुश्री देशमुख (विधी सेवा), नयना भोसले (बँकींग सेवा), शुभदा देशपांडे (सामाजिक सेवा), नर्मदा कनकी मिठ्ठा (सांस्कृतिकक्षेत्र), स्वरदा उमेश मोहोळकर (स्वर साधना)

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्या समोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे



स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:(७३) स्वयंसेवकत्व

डॉक्टर हेडगेवार यांनी १९४० साली एका ३५ वर्षाच्या माधव नावाच्या युवकाच्या हातात संघ सोपवला. आणि अध्यात्म मार्ग स्वीकारू इच्छिणाऱ्या माधवने आपला मार्ग बदलून समाज साक्षात्काराचा मार्ग संघाच्या रूपात स्वीकारला. आणि त्यांनी भगव्या ध्वजाला गुरु केले. तेव्हाच्या तरुण भारत वृत्तपत्राचे संपादक ग.त्र्य. माडखोलकर गुरुजींना विचारते झाले की आश्रम आणि संघ यांच्या भूमिकेतच अंतर आहे; मग संघ हीच जीवन गाथा स्वरूपात स्वीकारताना आपण कोणती मोजपट्टी मोजली. गुरुजी तडक आत्मविश्वासाने उत्तरले की मी संघ कार्यामुळेच स्वामी विवेकानंदजींच्या कार्याला उर्जिता वस्था मिळणार आहे, याबाबत निश्चिंत आहे. आणि मग एका निश्चितीने अखंड स्वयंसेवकत्व त्यांनी स्वीकारले होते. एक घटना सांगते-एकदा मध्यप्रांतात संघ शिबिरात, पंक्तीत बरेच गणमान्य नेते पण बसले होते, ते सर्व अतिथी होते. त्यामुळे जेवणानंतर आधी अतिथी उठले, पण गुरुजी उठले नाहीत. कारण ते सरसंघचालक असले तरी आधी स्वयंसेवक होते. म्हणून त्यांनी अतिथींचा सन्मान केला. स्वयंसेवक व सरसंघचालक यामध्ये कोणतीही भेदरेखा नव्हती. अहं ब्रम्हासि तत्त्वमसि चे ते साकार रूप होते. संघाचे अनेक उतार चढाव त्यांनी अनुभवले, पण त्यांचे मानसिक संतुलन कधीही हरवले नाही. त्यांनी कधी धीर सोडला नाही. संघ स्वयंसेवकाच्या रूपात ते जगले याचा त्यांना आनंद मिळत होता.

क्रमशः

## संक्षिप्त वृत्त



### स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातर्फे समाजसेवक हळगोदे यांचा सत्कार

**अक्कलकोट दि. ८ मार्च-**

श्री स्वामी समर्थांचे आशिर्वाद व येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांची साथ माझ्या जीवनासाठी खूप मोलाची असल्याचे मनोगत येथील महाराष्ट्र वीरशैव सभा तालुकाध्यक्ष व मा.नगरसेवक समाजसेवक शिवपुत्र हळगोदे यांनी व्यक्त केले. शिवपुत्र हळगोदे यांनी आपल्या वाढदिवसानिमीत्त वटवृक्ष मंदीरात येऊन श्री स्वामी समर्थाचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी शिवपुत्र हळगोदे यांच्या वाढदिवसाप्रित्यर्थ श्री. स्वामी स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, देऊन हळगोदे यांचा यथोचित आशिर्वाद पुरक सन्मान केला व वाढदिवसाच्या शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी शिवपुत्र हळगोदे बोलत होते. यावेळी मंदीर समितीचे सेक्रेटरी आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रा. नागनाथ जेऊरे, बसवराज माशाळे, श्रीपाद सरदेशमुख, प्रा. शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, संजय पवार, श्रीकांत मलवे उपस्थित होते.

### शिंदे विद्यालयाचे महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेत यश

**टेंभूर्णी, दि. ८ मार्च-**




अकोले खुर्द (ता. माढा) येथील बबनरावजी शिंदे माध्य व उच्च माध्य विद्यालय अकोले (खुर्द) येथील खालील विद्यार्थ्यानी परीक्षेत गुणवत्ता यादीत नाव झळकवत यश संपादन केले. महाराष्ट्र टॅलेट सर्च परीक्षा (M² TS ) जळगाव यांच्यामार्फत १९ जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत उज्ज्वल यश खालील विद्यार्थिनींनी संपादन केले. साईप्रसाद आनंदराव ढवळे राज्यात पाचवा व सोलापूर केंद्रात १ ला क्रमांक (इयत्ता ६वी) (१७४ गुण) प्रतिक नानासाहेब चोपडे राज्यात दहावा क्रमांक व सोलापूर केंद्रात दुसरा क्रमांक (इयत्ता ६ वी ) (२०० पैकी १६४ गुण) वरील सर्व विद्यार्थ्यांना प्रज्ञाशोध परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केल्याबद्दल गुणवंत सर्व विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक धनुसिंग रजपूत यांचे अभिनंदन करमाळा तालुक्याचे आमदार तथा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजयमामा शिंदे, प्राचार्य राजेंद्र ठोंबरे, प्रशालेतील जेष्ठ शिक्षक संभाजी अनपट, मुख्याध्यापिका मधुरा सुरवसे यांनी अभिनंदन केले.



### वाणीचिंचाळे येथे माझी वसुंधरा अभियान आढावा बैठक

**सांगोला, दि. ८ मार्च-**

वाणीचिंचाळे (ता. सांगोला) येथे सरपंच प्रियंका गडहिरे, गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, विस्तार अधिकारी तोडकरी यांच्या उपस्थितीत माझी वसुंधरा अभियान आढावा बैठक घेण्यात आली. याविषयी माहिती तोडकरी यांनी दिली. माझी वसुंधरा अभियान ५.० या स्पर्धेत वाणीचिंचाळे गावाने सहभाग नोंदवून चांगल्या पद्धतीने राबवली तर भविष्यात गावामध्ये चांगले काम होऊन लोकांच्या जीवनमनात फरक पडेल, असे उमेशचंद्र कुलकर्णी यांनी सांगितले. यावेळी विस्तार अधिकारी पुकळे, सावंत, चिदानंद स्वामी, लक्ष्मण निळे, रामलिंग पाटील, विकास गडहिरे, जितेंद्र गडहिरे, बाळासाहेब गडहिरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ग्रामसेवक करचे, गोरख येजगर, शेखलाल शेख, बंडु सोपे, बाबुराव सोपे, सुकदेव गंगाधरे, नितीन स्वामी, आण्णा गवळी, संजय खडतरे, सचिन गायकवाड उपस्थित होते. प्रास्ताविक ग्रामसेवक सुनील साळुंखे यांनी केले.



### शिवसेना राज्य ग्रंथालय सेलच्या जिल्हाध्यक्षपदी देविदास राठोड

**अक्कलकोट, दि. ८ मार्च-**

शिवसेना राज्य ग्रंथालय सेलच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी अक्कलकोट तालुक्यातील जेऊरवाडी येथील देविदास राठोड यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र शिर्डी येथे झालेल्या शिवसेना राज्य ग्रंथालय सेलच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत राज्य अध्यक्ष बीजी देशमुख शिवसेना सचिव संजय मोरे यांच्या हस्ते निवडीचे पत्र देण्यात आले. याप्रसंगी ग्रंथालय संघटनेचे तालुकाध्यक्ष शंकर माळी, ग्रंथालय सेलचे तालुकाध्यक्ष बिराप्पा पुजारी, पत्रकार स्वामीराव गायकवाड, पुंडलिक पांढरे, शिवराया प्रचंडे उपस्थित होते. शिवसेना राज्य ग्रंथालय सेलच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी देविदास राठोड यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले.

### पहिलीची विद्यार्थीनी शौर्या सोनटक्केचे महिला दिनानिमित्त भाषण



**बार्शी, दि. ८ मार्च-**

जिजामाता विद्यामंदिर मधील इयत्ता पहिली अ मधील विद्यार्थिनी शौर्या वैशाली दत्तप्रसाद सोनटक्के हिने ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य असल्यामुळे सर्व पहिली ते ४ ती पर्यंतच्या चिमुकल्या मुलींसमोर भाषण करुन दाखवले. बी.पी सुलाखे कॉमर्स कॉलेजमधील शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दत्तप्रसाद प्रेमलता मनोहर सोनटक्के यांची कनिष्ठ कन्या आहे. मार्गदर्शक सौ.वैशाली दत्तप्रसाद सोनटक्के व वर्गशिक्षिका पाखरे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमप्रसंगी सर्व महिला शिक्षक व मुख्याध्यापिका गवळी उपस्थित होत्या.

# विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

## जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालय, पतसंस्थांमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात; विविध स्पर्धांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

**जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालय, नगरपंचायत, पतसंस्थामध्ये विविध उपक्रमांनी जागतिक महिला दिन उत्साहात पार पडला. यावेळी अहिल्यादेवी होळकर, राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीजोती सावित्राबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या कर्तृत्ववान महिलांना सन्मानित करण्यात आले. महिला दिनानिमित्त ठिकठिकाणी विविध कार्यक्रम घेण्यात आले.**



### माळशिरस नगरपंचायत

महिला आपल्या कुटुंबाच्या प्रगतीसाठी अतोनात कष्ट घेतात परंतु ते करीत असताना महिलांनी आपली स्वताची काळजी घेणे तेवढेच महत्वाचे आहे असे प्रतिपादन प्रांताधिकारी विजया पांगारकर यांनी माळशिरस नगरपंचायतीच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या कर्तृत्वाच्या सन्मानासाठी येथील श्री संतसावता माळी मंदिरात आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले. या कार्यक्रमाची सुरुवात प्रांताधिकारी विजया पांगारकर, नगराध्यक्ष विजय देशमुख, उपनगराध्यक्ष मंगल केमकर, महिला बालकल्याण सभापती शोभा धाईंजे, मुख्याधिकारी डॉ. कल्याण हुलगे, माजी नगराध्यक्ष आप्पासाहेब देशमुख, माजी नगराध्यक्ष शिवाजीराव देशमुख, माजी नगराध्यक्ष ताई वावरे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आली. पुढे बोलताना पांगारकर म्हणाल्या महिलांनी आपल्याल्या जमेल, झेपेल तेवढेच काम केले. पाहिजे कामाबरोबर स्वताची, शरीराची काळजी घेणे आवशक आहे. यावेळी नगराध्यक्ष विजय देशमुख, माजी नगराध्यक्ष आप्पासाहेब देशमुख, नगरसेविका रेश्मा टेळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांचे हस्ते सन्मान करण्यात आला. महिला सफाई कर्मचारी व स्टाफ यांना साडी वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास मान्यवरासह माजी नगराध्यक्षा द्रौपदी देशमुख, स्वाती देशमुख, नगरसेविका पुष्पा कोळेकर, पुनम वळकुंदे, मंगल गेजगे, राणी शिंदे, विजयकुमार कन्हेरे ,गरड , विशाल सावंत, रत्नमाला सिदवाडकर, अस्मिता जाधव, आशाबाई सिद, सुनील मदने, विजय साठे, नितीन सावंत, सुनील पवार, रोहिदास थोरात, ध्रुव सोनवणे, अमोल खंडागळे, तुषार काळे, राहूल लष्करे, अर्चना लांडगे, निता वाघमारे, आकाश लष्करे, स्वाती कोळी, सोनाली मदने उपस्थित होते.



### श्री शंकरलिंग प्रशाला, वळसंग

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य वीरेश थळंगे तर प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक शिवानंद घोडके, सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार, संजयकुमार धनशेट्टी, सिद्धाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, निलकंठ कवटगी, प्रा. संतोष शिंदे हे उपस्थित होते.

जागतिक महिला दिनानिमित्त प्रशालेतील विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, रूपाली कलशेट्टी, प्राध्यापिका प्रतिभा तांडुरे, वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी तसेच शालेय पोषण आहार शिजवून देणारे मनिषा मणुरे, अनिता धनशेट्टी,काळम्मा थळंगे व सुनिता कुर्ले या सर्वांचे प्रशालेतर्फे पिण्याच्या पाण्याची बाटली, जेवणाचा डबा व गुलाब पुष्प देऊन यथोचित सन्मान करण्यात आले. तदनंतर पर्यवेक्षक शिवानंद घोडके, प्राचार्य वीरेश थळंगे यांनी आपल्या मनोगतातून जागतिक महिला दिनाचे महत्त्व सांगून प्रशालेतील सर्व विद्यार्थिनींना व महिला भगिनींना हार्दिक शुभेच्छा दिले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बसवराज दुधगी, वीरेश थळंगे, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, विजय प्याटी, मल्लिनाथ गौडगाव, अजय माणकोजी, शिवराज अष्टगी, प्रा. शरणय्या मसुती, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, सेवक कट्टेप्पा कोळी व विनोद दुधगी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीमंत भोसले यांनी केले.



### सिल्व्हर ज्युबिली हायस्कूल, बार्शी

सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलमध्ये जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, झाशीची राणी लक्ष्मीबाई, मदर तेरेसा, माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, राष्ट्रमाता जिजाबाई, कल्पना चावला, सिंधुताई सपकाळ.इ. महान स्त्रियांच्या प्रतिमा पुजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. प्रास्तविक उपमुख्याध्यापक चाटी यांनी केले.

प्रशालेतील ७ वी ड चे वर्गशिक्षक शिवराज भडुळे व सांस्कृतिक प्रमुख शुभांगी म्हमाणे यांनी विदयार्थ्यांकडुन कार्यक्रमाची देखणी अंमलबजावणी केली. प्रशालेतील सर्व स्त्री शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गुलाबपुष्प देऊन उपमुख्याध्यापकांनी सत्कार केला व शुभेच्छा दिल्या. ७ वी ड च्या विद्यार्थिनी विविध वेशभूषेतून मंचावर आल्या व विदयाध्यांना त्यांनी भारतात आजवर होऊन गेलेल्या महान स्त्रियांची आठवण करुन दिली. रोजच्या जीवनात त्यांनी वापरलेला मार्ग जर प्रत्येक मुलीने अंगिकारला तर देशाची प्रगती अधिक झपाटयाने निश्चितच होईल याची जणू खात्री पटली. याप्रसंगी पर्यवेक्षिका अनुराधा विश्वेकर उपस्थित होते.

सूत्रसंचालन कृष्णा सुर्वे व आदित्य लाटे यांनी केले. याप्रसंगी सई विधाते, मानसी राऊत व अर्णव चौगुले यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर आभार दिव्या जमदाडे हिने मानले.

### जवाहर विद्यालय, अकलूज

जवाहर विद्यालय, अणदूर येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी परिपाठात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, प्रमुख पाहुणे, कृषी सहाय्यक दिपाली गवळी, सुरेखा कबाडे, गुलाब सय्यद, किरण गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक वैशाली कर्पे यांनी केले. विद्यार्थी मनोगतात कुमारी संस्कृती दुपारगुडे, शुभांगी गिराम, आर्या घुगे, आर्या आलुरे, कांदबरी महाबोले, वैदही राजमाने, श्रावणी जाधव यांची भाषणे झाले. शिक्षक मनोगतात श्रीमती जयश्री रेडेकर यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व सांगितले. लता करे यांनी बारामती मॅरेथॉन कशी जिंकली ही गोष्ट सांगितली. अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी यांनी केला. सूत्रसंचालन विद्यार्थीनी साक्षी हेगडे, वैष्णवी कुलकर्णी, रूद्राली सारणे यांनी केले तर आभार प्रदर्शन ज्योती चौधरी यांनी केले. जागतिक महिला दिन यशस्वीतेसाठी पल्लवी मैत्री, प्रमिला सलगरे, संध्या जाधव, पूजा कुळमेथे, श्रीमती सुजाता लिंबोळे, सूलक्षणा वसावे, सारिका नरसुडे, आवटे, पद्मिनी घुगे यांनी प्रयत्न केले.

### मोडनिंब ग्रामपंचायत



मोडनिंब (ता.माढा) येथे ग्रामपंचायत कार्यालयात विशेष ग्रामसभा घेऊन महिला दिन साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रारंभी अहिल्यादेवी होळकर, राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीजोती सावित्राबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. ग्रामविकास अधिकारी शिवाजी रकटे यांनी महिला दिनानिमित्त विशेष ग्राम सभेच्या विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थित महिला, सफाई महिला कर्मचारी यांचा महिला दिनानिमित्त सन्मान करण्यात आला. ग्रा पं सदस्या योगिता शिंदे व शर्मिला कोळी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला सरपंच लक्ष्मी पाटील, ग्रा.पं. सदस्या सिता सावंत, शर्मिला कोळी, सुवर्णा सुर्वे, भाग्यश्री पुरवत, सोनाली जाडकर, सारंग, शशिकला गिड्डे, गिता आखाडे, शोभा माने, कविता जगताप,मुमताज चव्हाण, मंगल गोरे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी माढा तालुका अध्यक्ष कैलास तोडकरी, ग्रा.पं.सदस्य सदाशिव पाटोळे, राहुल पाटील, बिभिषण गायकवाड उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार लिपिक अरुण सुर्वे यांनी केले.





### न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज व आर्या पब्लिक स्कूल, टेंभूर्णी

जागतिक महिला दिनानिमित्त आर्या पब्लिक स्कूल, न्यू इंग्लिश स्कूल माध्यमिक विभाग व ज्युनियर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशालेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी डॉ. देवकते, डॉ. पाटील, उपसरपंच स्वाती गायकवाड, ग्राम पंचायत सदस्या माधुरी माने, सोनाली घाडगे उपस्थित होत्या.

सर्व मान्यवर महिलांच्या हस्ते सावित्रीबाई फुले, जिजाऊ, अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमास सुरवात झाली. प्रशालेच्या विद्यार्थीनींनी भाषणे, कविता, नृत्य, गायन या माध्यमातून स्त्री शक्तीचे महत्व स्पष्ट केले.

प्रशालेची माजी विद्यार्थीनी पूजा जाधव हिची मुंबई शहर पोलीसमध्ये निवड झाल्याबद्दल तिचा सन्मान प्रशालेतर्फे कुबेर यांनी केला. तसेच आर्या पब्लिक स्कूलच्या गेळे यांची आलेगांव (बु) येथे अंगणवाडी शिक्षिका म्हणून निवड झाल्याबद्दल देवकते यांच्या हस्ते त्यांचाही सन्मान करण्यात आला. इयत्ता सातवी ते अकरावीच्या विद्यार्थीनींना डॉ. देवकते व डॉ. पाटील यांनी आरोग्यविषयी व्याखान दिले. संवादरूपी कार्यक्रमातून मुलींना योग्य मार्गदर्शन केले. इयत्ता आठवीच्या मुलींनी सूत्रसंचलन, प्रास्ताविक, आभार असे सर्व कार्यक्रमाचे नियोजन पार पाडले.



### श्रीनाथ विद्यालय, सदाशिवनगर

श्रीनाथ विद्यालय ज्युनियर कॉलेज व महात्मा फुले विद्यालय माळशिरस याठिकाणी महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेच्या संचालिका हर्षदाताई शिंगाडे यांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींनी विचार व्यक्त केले.तदनंतर महिला शिक्षिका कविता पोरे, ऋचा पवार, रेश्मा गोरड, पल्लवी सपकाळ, सुनिता पवार व प्राचार्य योगेश गुजरे यांनी मनोगत व्यक्त केले. महिला दिनानिमित्त आंतरशालेय स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांना बक्षिस देण्यात आले.तसेच संस्थेचे संचालक यांच्याहस्ते विद्यालयातील सर्व महिला शिक्षिका व कर्मचारी यांना प्रेरणा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी संचालक हर्षदा शिंगाडे, अनिरुद्ध शिंगाडे, महादेव माने, बाबासाहेब माने, महेश बोत्रे, हसन मुलाणी, निलेश घाडगे, मुख्याध्यापक मधूकर गुंड, प्राचार्य योगेश गुजरे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व बहुसंख्य पालकवर्ग उपस्थित होते.



### तडवळे ग्रामपंचायत, वैराग

तडवळे ग्रामपंचायत, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवोन्नोती अभियान आणि प्राथमिक शाळेच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच सुमन आवारे यांच्या हस्ते करण्यात आले. रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, लिंबू चमचा तसेच फॅशन शो या स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी महिला व मुलीना महिला दिनाचे महत्त्व सांगून मार्गदर्श करण्यात आले. महिलांची आरोग्य विषयक तपासण्या करण्यात आल्या. यावेळी ग्रामसेविका सिताबाई नागरगोजे , सारीका आवारे, सीआरपी उज्वला पवार, दिपाली माने, सुनिता माने, भोसले, हेमलता आवारे, उपस्थीत होत्या.



### रत्नत्रय संस्था, नातेपुते

सदाशिवनगर येथील रत्नत्रय पतसंस्थेत जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचा सन्मान करून रांगोळी स्पर्धा घेण्यात आले. यामध्ये त्यामध्ये खुलागट रांगोळी स्पर्धा प्रथम, द्वितीय, तृतीय : प्रीती कुलकर्णी, अमृता मोहिते, प्राजक्ता दांगट. खुला गट चित्रकला स्पर्धा : मेघा चव्हाण, स्वाती शेंडगे, निकिता मगर. लहान गट चित्रकला स्पर्धा : मयुरी सालगुडे, आदिती करणे, श्रुती शिंदे, उत्तेजनार्थ अक्षता निलेश गांधी, लहान गट रांगोळी स्पर्धा : समीक्षा कोकरे, समीक्षा कापसे, श्रीलेखा जाधव. या सर्वांना बक्षीस वितरण करण्यात आले. आभार प्रदर्शन संस्थेचे चेअरमन वीरकुमार दोशी यांनी मानले. कार्यक्रम पार पाडण्यासाठी संस्थेचे हेमंत कुलकर्णी, वैभव मोडासे, मंगेश जगताप, टी.डी. देशमुख, नीता रणवरे, विक्रम पालवे, युवराज वळकुंदे, रणजीत गोरडे यांनी काम पाहिले.



### लोकमंगल पतसंस्था, नातेपुते

नातेपुते येथील लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था शाखेत महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नातेपुते नगरपंचायत च्या नगरसेविका माया उराडे. डॉ. काजल कवितके उपस्थित होत्या महिलांना वृक्ष देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी महसूल अधिकारी माधुरी गायकवाड, सिव्हल इंजिनिअर व टाऊन प्लॅनिंग असिस्टंट सायली सोनवणे, महिला ड्रायव्हिंग स्कूल टीचर अर्चना गटकळ, सिविल हॉस्पिटलच्या सिस्टर भाग्यश्री पद्मन, अंगणवाडी सेविका मंगल सोरटे, तसेच आशा वर्कर उपस्थित होत्या. यावेळी महिला

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर जतन व संवर्धनासाठी मंगळवारी बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ मार्च -**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन, संवर्धन व जिर्णोद्वाराचे काम शासन निधीतून पुरातत्व विभागामार्फत सुरू आहे.

सदर कामाचा आढावा घेण्यासाठी तसेच टोकन दर्शन प्रणाली सुरू करण्याबाबत टिसीएस कंपनीच्या प्रतिनिधी बरोबर चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली



दिनांक ११ मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता भक्तनिवास येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीमध्ये गाभा-यातील दगडी कामास कोटींग करणे व इतर अनुषंगीक कामासाठी श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या दर्शन वेळेत बदल करण्याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

बैठकीस स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीस अधिक्षक, मंदिर समिती, सल्लागार परिषद, महाराज मंडळी व स्थानिक प्रशासकीय अधिकारी यांची उपस्थिती राहणार आहे. सदर बैठकीत चर्चा होवून निर्णय घेण्यात येणार आहे.

सद्यस्थितीत सुरू असलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या दर्शन वेळेत कोणत्याही बदल करण्यात आलेला नाही, याची वारकरी भाविकांनी नोंद घ्यावी असे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले आहे.



## जिल्ह्यात महिला दिनाचा उत्साह



### कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यायात महीला दिनानिमित्त सर्व महीला शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. प्रथम सावित्रीबाई फुले, जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन मन्यवरांच्या हस्ते करणयात आले. यावेळी पर्यवेक्षीका मोरे, लिंगे, पाटील तसेच आठवणी ९५ ग्रुपचे सल्लागार सचिन गाटे यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी महिला दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अधक्षस्थानी मुख्याध्यापक शिवाजी कापसे होते. तर यावेळी मोरे, पाटोळे, आठरे, पाटील, लिंगे यांचा विद्यालयाच्या वतीने सन्मान करणयात आला. कार्यक्रमास संजय पाटील, वाघमारे,पाटील, मेटकरी, ठाकर उपस्थित होते. आभार लिंगे यांनी मानले.



### पौर्णिमा सामाजिक संस्था, अणदूर

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अणदूर येथील पौर्णिमा सामाजिक संस्थेच्या वतीने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा शहापूर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खुदावाडी (ता.तुळजापूर) येथील ३०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शैक्षणिक साहित्याचे वाटप संस्थेचे सचिव बाबई चव्हाण, विशाखा मुकरे, नागेश चव्हाण यांच्या हस्ते शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा श्रीमती स्मिता चव्हाण, ग्रामपंचायत सदस्या पूजा मोरे, सीआरपी शहापूर श्रीमती लक्ष्मी सुरवसे, यांच्या उपस्थितीत इयत्ता पहिली ते सातवी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी शिक्षिका इनामदार, अंगणवाडी ताई सागरिका कांबळे, शोभा व्हंताळे, सारीका बंडगर, जनाबाई खरात यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिरगूरे गुरुजी, मगतराव गुरुजी, गुम्मे गुरुजी व सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. प्रास्ताविक कोळी गुरुजी यांनी केले तर आभार भोसले गुरुजी यांनी मानले.



### शिवाजी महाविद्यालय, बार्शी

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. सुरुवातीला विद्यार्थ्यांना आजची महिला सुरक्षित आहे का? या संदर्भात प्रश्नावली देण्यात आली व त्यावर वादविवाद स्पर्धाही आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांना कला व विज्ञान या क्षेत्रातील महिलांचे कर्तृत्व या संबंधात माहिती सांगण्यात व विचारण्यात आली. महिलेचे स्थान कसे उंचावता येईल? यावर प्रकाश टाकण्यात आला.राजकारणातील महिलांचा सहभाग कसा वाढविता येईल यावर मंथन करण्यात आले.बी.ए. भाग-१ व बी.एस्सी भाग-३ या वर्गातील विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर, कल्पना चावला, लता मंगेशकर, सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी, पी.टी. उषा यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण यावर आपले मत मांडले. डॉ. राहुल पालके यांनी प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील स्त्रीचे स्थानव बदलती भूमिका यावर विषयावर व्याख्यान दिले. क्रांतिज्योती या कवितेतून त्यांनी 'नव्या दमाची, नव्या युगाची' स्त्री व तिचे विश्व मांडले. याप्रसंगी 'भारतातील महिला' या विषयावर प्रश्नमंजूषा ठेवण्यात आली.



### श्री रामलिंगेश्वर प्रशाला, दक्षिण सोलापूर

श्रीक्षेत्र तीर्थ (ता.द.सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात महिला दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त प्रतिमेस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी कर्नाटक राज्यातील गदग येथील प्रा. श्रीशैल शिंपी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अश्विनी बाळीकाई, मीनाक्षी शेळगे, सुनंदा पाटील यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय समारोप प्राचार्य सुधीर सोनकवडे यांनी केला. कार्यक्रमास नागराज पाटील, सचिन गुजा, अमर पाटील, सिद्धाराम पाटील, रेवणय्या मठपती, राजकुमार देडे, गुरुशांत बिराजदार, बाबूलाल धोडमिसे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन महेश पट्टणशेट्टी तर आभार प्रा. शांतप्पा बगले यांनी मानले.

## तलावात बुडालेल्या तरुणाच्या मृत्यूप्रकरणी ठेकेदारावर गुन्हा

### पंढरपुरातील दुर्घटना प्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि. ८ मार्च -**

येथील पद्मावती जलतरण तलावात यशराज विजय माने (वय २१, रा. ईसबावी, पंढरपूर) या तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. जलतरण तलावाच्या ठेकेदाराने लाइफ गार्ड, लाइफ जॅकेट, प्रशिक्षक स्वीमर, तरंगवत ठेवण्याची साधने, सीपीआर, आवश्यक वैद्यकीय सेवा साधने ठेवले नाहीत. यामुळे यशराज माने यांच्या मृत्यूला ठेकेदार कारणीभूत असल्याची तक्रार पंढरपूर नगर परिषदेचे नगर अभियंता नेताजी पवार यांनी दिली. याप्रकरणी ठेकेदार सत्यजित गणेश परदेशी (रा. साऊथ, सदर बझार, लष्कर सोलापूर) याच्या विरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक १ मार्च राजी दुपारी ३ च्या सुमारास येथील मालकीच्या पद्मावती जलरण तलावात यशराज माने याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता.

#### पालिकेचे अधिकारी करतात काय?

दरम्यान ही घटना घडल्यानंतर पालिकेचे नगर अभियंता नेताजी पवार यांनी पद्मावती जलतरण तलावाची पाहणी केली. त्यावेळी त्यांना हार्डडिस्क खराब असल्याने सीसीटीव्ही कॅमेरा असून देखील त्याचे रेकॉर्डिंग होत नसल्याचे दिसून आले. मात्र घटना घडण्याच्या अगोदर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी किती वेळा जलतरण तलावाला भेट देवून तेथील सोयीसुविधांची पाहणी केली हा प्रश्न देखील ऐरणीवर आला आहे. जर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी जलतरण तलावाला मधून अधून अचानक भेटी दिल्या असत्या तर ठेकेदाराकडून होत असलेले दुर्लक्ष त्यांच्या निदर्शनास आले असते आणि ठेकेदाराला संबंधित गोष्टींची पूर्तता करण्यास त्यांनी भाग पाडले असते त्यामुळे कदाचित घटलेली घटना देखील टळू शकली असती. त्यामुळे घडलेल्या घटनेला केवळ ठेकेदारच कारणीभूत नसून पालिकेचे अधिकारी देखील तेवढेच कारणीभूत आहेत. जलतरण तलावाबाबत मागील घडलेल्या घटना डोळ्यासमोर ठेवून तरी पालिकेच्या अधिकाऱ्यांनी याबाबत हलगर्जीपण करावयास नको होता असे मत शहरातील सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत असल्याचे ऐकावयास मिळत आहे.

त्यानंतर मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांनी तेथे जाऊन पाहणी करण्याचे आदेश पालिकेचे नगरअभियंता नेताजी पवार यांना दिले. नगरअभियंता नेताजी पवार यांनी जलतरण तलावाची पाहणी केल्यानंतर तलावात ४ सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. त्याचे फुटेज लाइव्ह दिसत असून, त्यात हार्ड डिस्क खराब झाल्याने रेकॉर्डिंग होत नसल्याचे दिसून आले. यामुळे मानेच्या मृत्यूस जलतरण तलावाचा ठेकेदार कारणीभूत आहे, अशी तक्रार नगरअभियंता पवार यांनी शहर पोलिसांत दिली.त्या नुसार पोलिसांनी संबंधित ठेकेदारावर गुन्हा दाखल केला आहे.

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात गोयेगाव आगोती पुलाचा विषय मार्गी लागणार?

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.८ मार्च -**

गेल्या ५० वर्षापासून होडीद्वारे जीवघेणा प्रवास करणाऱ्या गोयेगाव, आगोती परिसरातील उजनी धरण प्रकल्पग्रस्तांच्या पुलाच्या मागणीचा विषय यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मार्गी लागण्याची चिन्हे आहेत.

याबाबत शिवसेना नेते दिग्विजय बागल यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कडे गोयेगाव पूलासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्याची मागणी केली होती. त्यानुसार अधिवेशनात गोयेगाव-आगोती पुलाचा प्रश्न मार्गी लागणार का याबाबत तालुक्यातील पश्चिम भागातील नागरीकांना उत्सुकता आहे.

करमाळा-इंदापूर तालुक्यातील हाकेच्या अंतरावर असलेल्या गावात जाण्यासाठी भिगवण टेंभुर्णी मार्गे १०० किमी हून अधिक प्रवास करावा लागतो. तसेच वेळेच्या व पैशाच्या बचतीसाठी होडीतून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. मागील वर्षी उजनी जलाशयातून बोटीतून प्रवास करताना मोठी दुर्घटना होऊन प्रवाशांना जीव गमवावा लागला होता. शासनाने कुगाव-शिरसोडी, डिकसळ या दोन पुलांस निधी उपलब्ध करून या भागातील प्रवाशांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.

मात्र उजनी जलाशयाचा विस्तार पाहता हे दोन्ही पूल वेगवेगळ्या भागात असल्याने मध्यवर्ती ठिकाण असलेल्या भागांत या दोन्ही पूलांचा फायदा होत नाही. त्यामुळे गोयेगाव-आगोती येथे पूल करावा अशी मागणी करमाळा-इंदापूर तालुक्यातील नागरिकांमधून होत होती. याची दखल घेत श्री. बागल यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे अर्थसंकल्पात पूलासाठी अर्थिक तरतुद करण्याची मागणी केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबतची माहिती शासनास सादरही केली आहे.

त्यानुसार हा पूल प्रत्यक्षात झाल्यास करमाळा व इंदापूर तालुक्यांतील दळणवळण व्यवस्था मजबूत होणार आहे. सध्या सुरू असलेल्या डिकसळ पूल ते गोयेगाव हे अंतर २६ किलोमीटर असून कुंभेज फाटा ते गोयेगाव हे अंतरही तेवढेच आहे. इंदापूर-करमाळा तालुक्याच्या दृष्टीने हे अंतर मध्यवर्ती असून शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून स्थळ पाहणी करून बजेट प्लेट मध्ये याचा उल्लेख करण्यात आला आहे


## यशाच्या शिखरावर जायचे असेल तर कष्टांची शिदोरी ठेवा

### वनिता तंबाके; हंजगी आश्रम शाळेत महिलांचा ओटी भरुन केला सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ मार्च**

जागतिक महिला दिनानिमित्त आश्रम शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पालक व माताची ओटी भरुन सन्मान करण्यात आला. स्त्रियांची ओटी भरुन सन्मान करणे या विधीला हिंदू संस्कृतीत खूप महत्वाचे स्थान असून ओटी भरणे हा स्त्रीच्या सर्जनशीलतेचा आपल्या संस्कृतीने केलेला सन्मान मानला जातो. म्हणून आज हंजगी आश्रम शाळेच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील महिलांचा ओटी भरुन यथोचित गौरव करण्यात आला.

अक्कलकोट तालुक्यातील हंजगी येथील प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेत महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च हा दिवस जागतिक महिला नारी सन्मान दिन म्हणून साजरा करण्यात आला.यावेळी कार्यक्रम अध्यक्ष म्हणून सरपंच भाग्यश्री हालोळे या उपस्थित होत्या.



आजही समाजात बहुसंख्य स्त्रिया कुणाच्या तरी दबावाखाली जीवन जगताना दिसतात.अशा स्त्रियांनी कष्टाची तयारी ठेवल्यास भविष्यात लोकांची गुलामी करण्याची गरज पडणार नाही. यशाच्या शिखरावर जायचे असेल तर कष्टांची शिदोरी व निष्ठा आपल्याबरोबर ठेवा, प्रतिष्ठा आणि यश आपोआपच मिळेल. **- वनिता तंबाके**
अध्यक्षा प्रिय दर्शनी महिला बचत गट



## जळोली जि. प. शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ८ मार्च-**

जळोली जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. गटशिक्षणाधिकारी मारुती लिगडे,सरपंच ज्योतीराम मदने, उपसरपंच विमल थोरात,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब नरसाळे, उपाध्यक्ष शहाजी नरसाळे, शिक्षक नेते ज्योतीराम बोंगे व इतर मान्यवर व पालक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून गणेश वंदनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे यांनी मनोगत व्यक्त केले. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी प्रसंगानुरूप विविध वेशभूषा करून अभंग,गवळणी, शेतकरीगीते, शिवकन्या, भारुडे, लोकगीते, व्यसनमुक्तीपर नाटक, विनोद, राष्ट्रभक्तीपर गीते सादर केली. स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक गणपत मोरे, शिक्षक जयवंत कापसे, रमेश खारे, संतोष थोरात, शिक्षिका देवकी कलढोणे-दुधाणे तसेच शिवाजी गोरे, सिद्धेश्वर लोंढे, सोमनाथ पवार, कैलास नरसाळे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन जयवंत कापसे तर आभार सोमनाथ पवार यांनी मानले.

## बार्शीतील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत दरोडा

### दीड लाखांची रक्कम लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ मार्च-**

बार्शी तालुक्यातील सुर्डी येथे असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेत तीन अज्ञात दरोडेखोरांनी शस्त्राच्या धाकाने तब्बल १,५४,३०० रुपये लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

दि. ७ मार्च रोजी दुपारी ४.१५ वाजता बँकेत फक्त कर्मचारी हजर असताना तीन दरोडेखोर काळ्या-निळ्या जर्कीनमध्ये व तोंडाला माकडटोपी लावून आत घुसले. त्यांनी शाखा अधिकारी सोमनाथ कोरे यांना धमकावत रोख रक्कम मागितली. कोरे यांनी त्यांना हटकले असता एकाने कोयत्याने हल्ला करुन जखमी केले तर दुसऱ्याने पिस्तूल रोखून दोन वेळा हवेत गोळ्या झाडल्या.

**कर्मचाऱ्यांना बसण्यास भाग पाडले**

बँकेतील इतर कर्मचारी दिनेश शिंदे, राजू भडकवाड, संभाजी डोईफोडे आणि बाबासाहेब संसारे यांना जागेवरच बसण्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर मुख्य काऊंटरवरील १.५४ लाख रुपये दरोडेखोरांनी हिसकावून घेतले आणि कोणी आवाज केला तर ठार मारीन अशी धमकी देत ते पळून गेले.

**पळून जाण्यासाठी मोटरसायकलचा वापर**

दरोडेखोरांनी बँकेबाहेर थांबलेल्या लोकांनाही शस्त्राचा धाक दाखवला व काळ्या रंगाची एचएफ डिलक्स मोटारसायकल (बिगर नंबर) वापरुन रस्तापूर गावाच्या दिशेने पलायन केले.

#### पोलिसांकडून तपास सुरु

या घटनेनंतर बँकेचे वरिष्ठ अधिकारी आणि पोलिसांना त्वरित माहिती देण्यात आली. बँकेतील रोख रक्कम तपासल्यानंतर चोरीस गेलेल्या रकमेची खात्री झाली. पोलिसांनी तिघा अज्ञात दरोडेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला आहे.

## कुडल संगम येथील शिलालेखांचे राज्यभरातील जनतेने दर्शन घ्यावे

### डॉ. अरुणचंद्र पाठक; इतिहास अभ्यासकांचा हत्तरसंग कुडलचा अभ्यास दौरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ मार्च-**

मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठी केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या समितीने ज्येष्ठ इतिहास संशोधक आनंद कुंभार यांनी शोधून काढलेला हत्तरसंग कुडलसंगम येथील मराठी भाषेतील शिलालेखाचे परीक्षण केले . तो महत्वपूर्ण पुरावा मानून मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा दिला , असे प्रतिपादन केंद्रीय अभिजात भाषा दर्जा समितीचे सदस्य डॉ . अरुणचंद्र पाठक यांनी केले.

हत्तरसंग कुडल येथील श्री संगमेश्वर मंदिरातील मराठी भाषेतील पहिल्या शिलालेखाचे अवलोक केल्यानंतर आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते .यावेळी मधुकर बिराजदार ,गौरीशंकर बिराजदार, देविंद्रप्पा पाटील, बसवराज बगले, बसवराज बिराजदार ,पंडित पुजारी, चिदानंद पुजारी ,राजकुमार बगले, मल्लिकार्जुन यमदे, हणमंत बगले, श्रीशैल पाटील, संशोधक विशाल फुटाणे व नितीन अणवेकर उपस्थित होते.



पुढे बोलताना ते म्हणाले की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी, सातवाहन राजा हाल याचा गाथा सप्तशती ग्रंथ तसेच हत्तरसंग कुडलसंगम येथील मराठी भाषेतील पहिला शिलालेख यांचा संदर्भ घेऊन मराठी भाषेस अभिजात दर्जा देण्यात आला. तो शिलालेख सोलापूर जिल्ह्यातील हत्तरसंग कुडल येथील संगमेश्वराच्या मंदिरातील सभामंडपाच्या तुळईवर आहे. तो सर्वांनी पाहिला पाहिजे. याशिवाय इतर शिलालेख व शिळाखंड पाहावयास मिळतात. येथे भीमा व सीना नदीचा वैशिष्ट्यपूर्ण संगम झाला आहे. नदीच्या पाण्यामुळे हिरवागार परिसरामुळे निसर्ग सौंदर्य लाभले आहे. विद्वान लोकांनी येथे संमेलने, परिषदा आयोजित केले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. याशिवाय कुडल संगम येथे अन्नपूर्णादेवी, पंचलिंग परमेश्वर, बहुमुखी शिवलिंग, श्रीकृष्ण, स्वामी समर्थ व हरिहरेश्वराचे मंदिर आहे. हरिहरेश्वर मंदिरातील लक्ष्मी -भैरवी , काळभैरव, शिव-विष्णू, भारवाहक, किचक, सूरसुंदरी, वाद्यसुंदरी, नृत्यसुंदरी इत्यादी मूर्तींची शिल्पकला अद्वितीय आहे. संशोधक प्रा.ग.ल भिडे यांनी त्याचे संशोधन केले आहे. हे ठिकाण जणू मंदिर, मूर्ती, शिलालेख यांचे माहेरघर आहे, असे ते म्हणाले. श्री संगमेश्वर मंदिर समितीच्या वतीने डॉ. अरुणचंद्र पाठक यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. या अभ्यास दौऱ्याच्या वेळी इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर व विशाल फुटाणे उपस्थित होते. आभार मधुकर बिराजदार यांनी मानले.

#### संगमेश्वर मंदिर समिती राज्यभरातील पर्यटकांचे स्वागत करणार

संगमेश्वर मंदिर, मराठी भाषेतील पहिला शिलालेख, हरीहरेश्वर मंदिर, बहुमुखी शिवलिंग, भीमा सीना नदीचा संगम पाहण्यासाठी येणाऱ्या देशभरातील पर्यटकांचे व भाविकांचे स्वागत संगमेश्वर मंदिर समितीच्या वतीने करण्यात येईल. त्यांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था देखील केली जाईल असे, यावेळी मंदिराचे विश्वस्त तथा मार्गदर्शक मधुकर बिराजदार यांनी सांगितले.

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महिला दिनानिमित SIIT कॉम्प्युटर्सकडून महिलांचा सत्कार व सन्मान



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मार्च -**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून आज SIIT कॉम्प्युटर एज्युकेशन धाराशिव येथे प्रशिक्षण घेणाऱ्या प्रत्येक मुलीस व महिला यांना पुष्पगुच्छ देऊन सर्व उपस्थित महिलांचा सत्कार करण्यात आला.

तसेच एक तासाचे बेसिक कॉम्प्यूटरची माहिती व बेसिक प्रशिक्षण महिला दिनानिमित्त मोफत देण्यात आली. सर्व महिलांना मार्गदर्शन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अमित थोरात व नेताजी शेंडगे यांनी महिला दिन करिअर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनी व स्टाफ जमुना मोरे, पायल सूर्यवंशी, महादेवी यादव, पल्लवी मिसाळ, रेवती जाधव उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन सेंटर को ऑर्डिनेटर आकाश मोरे, शशिकांत वाघमारे, अविनाश वाघमारे यांनी केले.

# स्त्री-पुरुष भेदभावाची घरातून निर्माण होणारी भिंत दूर करा

## तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांचे प्रतिपादन...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मार्च -**

समाजात समानतेची खरी सुरुवात आपल्या घरापासून होते. स्त्री-पुरुष भेदभावाची जी भिंत घरात उभी राहते, ती दूर केल्याशिवाय समताधिष्ठित समाज घडू शकत नाही, असे प्रतिपादन तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी केले. त्या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी किशोर गोरे, बाल समिती सदस्य अश्रुबा कदम, दिपाली जागीरदार, मैना भोसले, सुचिता माळी, यशदाचे राज्यस्तरीय प्रशिक्षक शिवाजीराव पवार, मिटकॉनचे जिल्हा समन्वयक विश्वनाथ चव्हाण आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे यांनी केले.

पुढे डॉ. मृणाल जाधव म्हणाल्या, आपण मुलांना आणि मुलींना समान संधी दिल्या पाहिजेत. बऱ्याचदा मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते, त्यांच्यावर अधिक जबाबदाऱ्या टाकल्या जातात, तर मुलांना अधिक स्वातंत्र्य दिले जाते. हा भेदभाव घरीच सुरू होतो आणि समाजात पुढे जातो.

त्यामुळे समानतेचा पाया घरातच घालणे आवश्यक आहे. त्यांनी पुढे सांगितले की, घरातील प्रत्येक सदस्याने स्त्री-पुरुष समानतेच्या विचारसरणीचा अंगीकार केला पाहिजे. मुलींच्या शिक्षणासाठी घरातील सर्वांनी पाठिंबा दिला पाहिजे. महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी विविध कौशल्ये आत्मसात करावीत. घरातूनच समानतेची चळवळ सुरू झाली, तरच खऱ्या अर्थाने समाजात परिवर्तन घडू शकते, असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या महिला व बालकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ', 'महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)', स्वयंरोजगारासाठी विविध योजना याबाबत महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी काही महिलांनी आपल्या यशोगाथा सांगितल्या आणि समाजात त्यांनी कशा प्रकारे अडचणींवर मात केली, याचे अनुभव उपस्थितांसमोर मानले. यावेळी सामाजिक विज्ञान संस्थेच्या विद्यार्थ्यांनी कौटुंबिक हिंसाचार यावर पटनाट्य सादर केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी महिलांच्या सुरक्षेसाठी आणि सन्मानासाठी कशा प्रकारे प्रयत्न करता येतील, यावर आपले विचार मांडले. सामाजिक मानसिकता बदलल्याशिवाय स्त्री-पुरुष समानता शक्य नाही, यावर सर्वांनी भर दिला. स्त्रियांना केवळ कर्तव्याच्या चौकटीत न पाहता त्यांच्या स्वप्नांना, त्यांच्या इच्छांना महत्त्व देणे गरजेचे आहे. घरातील प्रत्येकाने स्त्रियांना आधार दिला, तर त्याही समाजाच्या विकासात मोलाचे योगदान देऊ शकतात.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, प्रेरणा महिला बहुउद्देशीय संस्था, प्रतिज्ञा महिला बहुउद्देशीय संस्था, तेजस्विनी महिला बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला अनेक सामाजिक कार्यकर्ते, महिला बचतगट सदस्य, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओएससीच्या केंद्र प्रशासक ॲड. प्रियंका जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन महिला व बालकल्याण विभागाच्या जिल्हा परिविक्षा अधिकारी रेहाना जमादार यांनी मानले.

## संक्षिप्त वृत्त...



### रोहकल येथे जागतिक महिला दिन साजरा

**परंडा, दि.८ मार्च -**

परंडा तालुक्यातील रोहकल येथील अंगणवाडी क्र. १२० मध्ये जागतिक महिला दिन दि. ०८ रोजी साजरा करण्यात आला. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन सरपंच प्रविणा हनुमंत कोलते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. महिला दिनानिमित्त अंगणवाडीमध्ये रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या स्पर्धेमध्ये प्रथम द्वितीय, तृतीय क्रमांक निवडण्यात आले. त्यांचा सत्कार सरपंच प्रविणा कोलते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. महिला व किशोरवयीन मुलीनी आरोग्याची काळजी कशी घ्यावी या विषयी अंगणवाडी सेविका हिराबाई पोफळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास बचतगट प्रेरिका अन्नपूर्णा ठोसर, जि.प. शाळेच्या शिक्षिका तांबे, जनाबाई पोफळे यांच्यासह किशोरवयीन मुली उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अंगणवाडी सेविका हिराबाई पोफळे, मदतनिस रुबीना शेख यांनी अथक परिश्रम घेतले.



### कायदे विषयक जनजागृती शिबिर

**लोहारा, दि.८ मार्च -**

लोहारा तालुक्यातील राजेगाव येथे तालुका विधी सेवा समिती लोहारा व हॅलो मेडिकल फाऊंडेशन अणदूर यांच्या सायुक्त विद्यमाने बेटी बचाव बेटी पढाव महिला दिनाचे औचित्य साधून कायदे विषयक जनजागृती शिबिर घेण्यात आले. यावेळी ॲड. रविकांत भोंडवे यांनी कायदे विषयक माहिती, मुलीचे शिक्षण या बाबत सविस्तर माहिती दिली. हॅलोच्या वतीने सतीश कदम यांनी महिला दिनाचे महत्त्व सांगून, शिक्षणाचे महत्व, आरोग्य, व्यवसाय, ताणतणाव, महिलांना समान हक्क, समान कामाचा मोबदला, खेळाचे महत्त्व, आदी विषयावर सविस्तर माहिती दिली. यावेळी ॲड. रविकांत भोंडवे, पिाशा शेख, सतीश कदम, ज्ञानेश्वर जाधव, स्वाती पाटील, मोरे, सरपंच सुरेश देशमुख, धनराज पाटील, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर देशमुख, बालाजी चव्हाण, नितीन मोरे, लहू पापडे, प्रेरीका कांबळे, नफिसा शेख, यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला पुरुष, युवक, युवती उपस्थित होते.



### मानमोडी शाळेत स्वयंशासन दिन उत्साहात

**जळकोट, दि.८ मार्च -**

येथून जवळच असलेल्या आयएसओ मानांकन प्राप्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मानमोडी येथे स्वयंशासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बानुबाई थोरात, प्रमुख पाहुणे प्रवीण गायकवाड, मुख्याध्यापक विक्रम पाचंगे तसेच शालुबाई कदम, जयाबाई पवार आदी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी शिक्षिका सुचिता चव्हाण, रामकृष्ण मोहिते, संजय वळवी, दिनेश राठोड यांनी सहकार्य केले.

### मारुती बनसोडे यांना भीमपुत्र पुरस्कार जाहीर

**जळकोट, दि.८ मार्च -**



भारतातील एकूण बारा मान्यवरांना बारामती येथील संविधान विचार मंच, बारामती यांच्याकडून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल भीमपुत्र आयडॉल २०२५ पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार आहे. २० एप्रिल २५ रोजी बारामती येथे होणाऱ्या सोहळ्यात या मान्यवरांना सन्मानित केले जाणार आहे.

### गंगाराम महाबोले यांचे निधन

**इटकळ, दि.८ मार्च -**



तुळजापुर तालुक्यातील केशेगाव येथील सधन शेतकरी गंगाराम नागनाथ महाबोले यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. सर्वाशी मनमिळाऊ पणे बोलणारे योग्य सल्ला देणारे गंगाराम महाबोले यांच्या निधनाने गाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. गंगाराम महाबोले हे ग्रामपंचायत सदस्य मल्लिनाथ महाबोले यांचे वडील आहेत.

## अभिनेते अजिंक्य देव यांनी सहकुटुंब घेतले तुळजाभवानीचे दर्शन



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ मार्च -**

प्रसिद्ध सिने अभिनेते अजिंक्य देव यांनी पत्नी आरती देव, त्यांचे बंधू तसेच प्रसिद्ध दिग्दर्शक अभिनय देव यांच्यासोबत सहकुटुंब श्रीभवानी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी तुळजाभवानी देवीची महापूजा आरती व कुलाचार करून सहकुटुंब भक्ती भावाने दर्शन घेतले. मंदिर संस्थानच्या वतीने मंदिर प्रशासकीय कार्यालयात देव कुटुंबीयांचा देवीजींची प्रतिमा व महावस्त्रे देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मंदिर संस्थानचे धार्मिक सहाय्यक व्यवस्थापक अमोल भोसले, पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे, जनसंपर्क अधिकारी गणेश निरवळ, सहाय्यक जनसंपर्क अधिकारी प्रशांत जाधव, भंडारपाल नागेश शितोळे, कर्मचारी तिरुपती वाघे, लहू डेरके उपस्थित होते.

## मित्र संस्थेच्या उपाध्यक्षपदी आ. पाटील यांची निवड; नळदुर्गमध्ये जल्लोष



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ मार्च -**

केंद्र सरकारच्या नीती आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्रात मित्र (महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉरमेशन) या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेच्या उपाध्यक्षपदी तुळजापुर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची निवड करण्यात आली आहे. त्यांची निवड झाल्याबद्दल नळदुर्ग शहरातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोष करून त्यांचे स्वागत केले.

मित्र संस्थेचे नियामक मंडळाचे अध्यक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत, तर सहअध्यक्ष म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार कार्यरत आहेत. मित्र संस्थेच्या माध्यमातून कृषी, आरोग्य, शिक्षण, कौशल्य विकास, नागरीकरण, आणि बांधकाम क्षेत्रामध्ये आर्थिक, धोरणात्मक, तांत्रिक व कार्यात्मक दिशा दिली जाईल.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या निवडीमुळे तुळजापुर विधानसभा मतदारसंघात विकासाच्या दृष्टीने एक नवा अध्याय सुरू होणार आहे. त्यांच्या विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे या संस्थेत त्यांना महत्त्वपूर्ण भूमिका निभावण्याची संधी मिळणार आहे. मंत्रीपद न मिळाल्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये असलेल्या नाराजीवरही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मित्र संस्थेच्या उपाध्यक्षपदी निवड करून समाधान दिले आहे.

नळदुर्ग शहरातील भाजप कार्यकर्त्यांनी आमदार पाटील यांच्या निवडीचे जोरदार स्वागत केले असून, त्यात सुशांत भुमकर, उदय जगदाळे, नय्यर जहागीरदार, संजय बताले, श्रमिक पोतदार, पद्माकर घोडके, गणेश मोरडे, बबन चौधरी, अक्षय भोई, सुधीर हजारे, सागर हजारे यांसारख्या अनेक कार्यकर्त्यांचा सहभाग होता.

## तेरखेडा येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.८ मार्च -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील सुबोध विद्यामंदिर शाळेत जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी महिला दिनानिमित्त आपापली मनोगत व्यक्त केले. इयत्ता सहावीतील विद्यार्थिनींनी 'जन्म बाईचा' या गाण्यावर नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख सुजितकुमार मुळे यांनी केले. तर शेवटी आभार मुख्याध्यापक शिंदे दत्तप्रसाद यांनी मानले. प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांचे माता-पालक सीमा गायकवाड, ज्योती खामकर, ज्योती घोलप, अश्विनी फरताडे, कोमल फरताडे, अंजली सावंत, तेजाली हराळकर, दैवशाला शिंदे, ज्योती भापकर सुनिता धुमाळ याची उपस्थिती होती.

याप्रसंगी शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक खामकर, कुर्वलकर, शिंगाडे, पांढरे, काळे, लिपिक अक्षय घोलप व सेवक योगेश भापकर उपस्थित होते.

## महिला दिनानिमित्त 'इटकळ पंचरत्न'ाचा सन्मान सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मार्च -**

इटकळ येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत जागतिक महिला दिनानिमित्त इटकळरत्न पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात विविध क्षेत्रांतील पाच महिलांचा इटकळरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

पुरस्कारप्राप्त महिलांमध्ये श्रीम. रत्नाबाई बाबुराव हंन्नूरे (आदर्श उद्योजिका), श्रीमती पार्वती गंडेराव सलगरे (आदर्श माता), रिजवाना रफिक मुजावर (महिला कंडक्टर), प्रियांका कबीर मिटकरी (उमेद प्रेरिका) आणि श्रीम. परवीन ताजोद्दीन मुजावर (आदर्श पालक) यांचा समावेश आहे. त्यांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

तुळजापूर तालुका शिक्षक सोसायटीचे संचालक स्वामी नागेश यांनी कृतज्ञता सन्मान मानपत्र देऊन इटकळ पंचरत्नांचा सत्कार केला. कार्यक्रमात पाककृती आणि संगीत खुर्ची खेळ आयोजित करण्यात आले होते.

पाककृती स्पर्धेत अंबिका माशाळकर, चेलाली गवळी आणि प्रगती माशाळकर यांना क्रमशः प्रथम, द्वितीय आणि तृतीय पुरस्कार मिळाले.

संगीत खुर्ची स्पर्धेत पूनम बर्वे, सुवर्णा वाघमोडे आणि स्वाती खटके यांना बक्षीस मिळाले.

कार्यक्रमात मुख्याध्यापक तानाजी गायकवाड यांनी महिलांच्या योगदानाचे महत्त्व मांडताना सांगितले की, महिलांनी सर्व क्षेत्रात आपले स्थान सिद्ध केले असून, मुलांच्या शिक्षणासोबतच राष्ट्रनिर्माणात त्यांचे योगदान मोठे आहे.

कार्यक्रमास सरपंच साहेबराव क्षीरसागर, प्रवीण माशाळकर, फिरोज मुजावर, रफिक मुजावर, श्रीकृष्ण मुळे, पोलीस पाटील विनोद सलगरे, दयानंद गायकवाड, दादा भोपळे, पत्रकार केशव गायकवाड, परमेश्वर हंन्नूरे, विजया कट्टे, म.अ. तानाजी गायकवाड, बालाजी कदम, सुधाकर कांबळे, सतीश ढोणेसर, रवींद्र गायकवाड, नागेश स्वामी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## राज्यस्तरीय कवी संमेलनात स्त्री शक्तीचे प्रभावी दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मार्च -**

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती, धाराशिव वतीने महिलांसाठी राज्यस्तरीय कवी संमेलन आयोजित करण्यात आले. गझलकार युवराज नळे यांच्या संकल्पनेतून आयोजित या कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. अस्मिता बुरगुटे होत्या.

कार्यक्रमात समस्त स्त्री वर्गाच्या भावभावना व समस्या ऐरणीवर आल्या. डॉ. अस्मिता बुरगुटे यांनी स्त्रीच्या दुसऱ्या मनास जर लिहिण्याची मुभा असती, तर स्त्री साहित्याची उंची नक्कीच वेगळी असती या रचनाद्वारे स्त्री जगताच्या कोंडमारावर प्रकाश टाकला. मुंबईतील कवयित्री डॉ. मनीषा देवगुणे यांनी लाडकी माझी लेक जणू चांदणं टिपूर या कवितेने मायलेकीच्या नात्याचा गोडवा व्यक्त केला.

सोलापूर येथील सीमा पाटील यांनी आई तू बहीण तू प्रेयसी तू ह्या कवितेतून स्त्रीच्या विविध भूमिकांचे महत्त्व स्पष्ट केले. पुण्यातील मधुरा कर्वे यांनी ती जर नसती तर ह्या कवितेने स्त्रीचे महत्त्व दर्शवले. धाराशिव येथील ॲड. जयश्री तेरकर यांनी रोज बलात्कार रोजच मरण ही कविता सादर केली, ज्यात त्यांनी समाजातील भयावह परिस्थितीवर भाष्य केले.

या कवी संमेलनाने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने स्त्री जागराची गोड गोड गाणी सादर केली.

## भारतीय महिलांच्या कर्तुत्वाला मान-सन्मान प्राप्त : ज्सोत्सना पाटील



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ मार्च -**

महिलांचे खरे सौंदर्य हे बाह्य अंगावर अवलंबून नसून, भारतीय संस्कृतीच्या शिकवणीतून निर्माण झालेल्या धैर्य, शौर्य व चारित्र्यात खरे सौंदर्य असते. ती आपली परंपरा आहे आणि या गुणामुळेच आज जागतिक स्तरावर भारतीय महिलांच्या कर्तुत्वाला मान सन्मान मिळत आहे. त्याची जपणूक करून पुढील पिढीला त्याचे ज्ञान करून देणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन सहशिक्षिका ज्योत्स्ना पाटील यांनी केले.

आठ मार्च रोजी श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित, स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर व महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी ज्योत्स्ना पाटील अध्यक्षपदावरून बोलत होत्या. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून वर्षा शाईवाले, मुख्याध्यापिका सविता लोहार, सहशिक्षिका संगीता भावसार, शिमंता शेटगार, बेबी पवार, सुमन कुवर, सुरेखा नारायणकर, रूपाली वेदपाठक, जैतून मेंडके, आशा सरपे, सविता जाधव, ज्योती काळे, ज्योती पंडित, मंगल पोतदार आदी महिला शिक्षिका उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता आठवी अच्या विद्यार्थिनी तजीन शेख यांनी तर प्रस्ताविक समृद्धी पोतदार तर आभार पूर्वा होदलूरकर यांनी मानले.

याप्रसंगी साक्षी सुदर्शन माळी या विद्यार्थिनीने महिलेवर तयार केलेली अत्यंत सुंदर कविता सादर केली. कार्यक्रमाला दोन्ही शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षक हजर होते.

## कुलस्वामिनी आश्रमशाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.८ मार्च -**

श्री कुलस्वामिनी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, जळकोट यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी संस्थेचे सचिव संतोष चव्हाण, मुख्याध्यापिका आशा पवार, कल्पना लवंद, शांता चौगुले, प्रमिला कुचंगे, नागेंद्र गुरव, सुरेश कोकाटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कल्पना लवंद यांनी केले. प्रा. सुरेश कोकाटे याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बिळेणसिध्द हक्के, किरण कांबळे, खंडेराव कारले, संतोष दुधभाते यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी लबडे तर आभार मयुरी कांबळे यांनी मानले.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## आ. राणाजगजितसिंह पाटील यांचा तालुका भाजपच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ मार्च -**
केंद्र सरकारच्या नीति आयोगाच्या धर्तीवर स्थापन केलेल्या 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन' अर्थात 'मित्र' या राज्याची आर्थिक व धोरणात्मक दिशा ठरविणाऱ्या महत्वपूर्ण संस्थेच्या उपाध्यक्षपदी आ. राणाजगजितसिंह पाटील यांची निवड झाल्याबद्दल



भाजपच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी बाळासाहेब शिंदे, किशोर गंगणे, विनोद गंगणे, संतोष बोबडे, आनंद कंदले, शांताराम पेंदे, प्रतीक रोचकरी, धैर्यशील दरेकर, संदीप गंगणे, विनोद पंलगे, साहेबराव घुगे, प्रभाकर मुळे, विजय शिंगाडे, राम चोपदार, राजेश्वर कदम यांच्यासह भाजपचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### महिला पोलीस व होमगार्ड यांचा पुष्प देवून महिला दिन साजरा

**परंडा, दि.८ मार्च -**
आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला सन्मान व सशक्तिकरण करण्यासाठी पोलीस अधीक्षक धाराशिव संजय जाधव यांच्या संकल्पनेतुन, अपर पोलीस अधीक्षक धाराशिव शफकत आमना व उपविभागीय पोलीस अधिकारी गौरीप्रसाद हिरेमठ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परंडा येथील सर्व कारभार महिला पोलीस व महिला होमगार्ड यांच्या ताब्यात देण्यात आला होता. पोलीस ठाणे प्रभारी दिलीपकुमार पारेकर यांनी बोलताना सांगितले की, महिला ही समाजाची शक्ती आहे. तिच्या विकासाशिवाय संपूर्ण समाजाची प्रगती अशक्य आहे. समाजाच्या प्रगतीसाठी महिलांचे सशक्तिकरण अनिर्वाय आहे. महिला समक्ष झाल्या तर समाज आणि देशाची वाटचाल समृध्दीकडे वेगाने होईल, असे बोलुन महिलाचा फेटा, शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.



### लहू कदम मित्र परिवारातर्फे भीमाशंकर राठोड यांचा सत्कार

**जळकोट, दि.८ मार्च -**
येथून जवळच असलेल्या आलियाबाद येथील सामाजिक कार्यकर्ते भीमाशंकर गणपती राठोड यांची राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या तुळजापूर तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल जळकोट येथील सामाजिक कार्यकर्ते लहू कदम मित्र परिवारातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी आलियाबाद ग्रामपंचायत सदस्य मनोज चव्हाण, मेघराज किलजे, संजय रेणुके, व्यंकट पवार, सिद्धेश्वर मडोळे आदि उपस्थित होते.



### ड्रीम फाउंडेशनकडून जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांचा सन्मान

**मंगरूळ, दि.८ मार्च -**
जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने स्वराज्य जननी राज माता जिजाऊ माँ साहेब व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून ड्रीम फाउंडेशन चिकुंद्रा यांच्या वतीने गावातील, बचत गटातील महिला, आशा कार्यकर्त्या, जिल्हा परिषद शिक्षिका व विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी गावच्या सरपंच सोनाली बाबुराव कानडे, उपसरपंच सुकेशनी संजय मोटे, ग्राम पंचायत सदस्य जयश्री भैरवनाथ गरड, उमेद गटाच्या केशर जाधवर, जिल्हा परिषद शिक्षिका किरण भिसे, सरिता गरड, राणी राम जाधव, शोभा धनराज एकंडे व तसेच सर्व बचत गटातील अध्यक्ष, सचिव व सर्व सदस्या यांचा पुष्प गुच्छ देवून त्या करत असलेल्या कार्यमुळे त्यांचा व जिल्हा परिषद शाळेतील तसेच श्री भैरवनाथ विद्यालयातील सर्व विद्यार्थिनींचा सन्मान ड्रीम फाउंडेशनच्या वतीने करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक गजानन मक्तेदार, ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष नजीर शेख, गावातील असंख्य महिला व किशोरवयीन मुली उपस्थिती होत्या.



### शेवाळेनगर शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न

**परंडा, दि.८ मार्च -**
परंडा तालुक्यातील शेवाळे नगर (शेळगाव) शाळेत जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या विशेष दिवशी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मासाहेब आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन पोलीस पाटील शितलताई शेवाळे व शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा भाग्यश्रीताई शेवाळे यांच्या हस्ते पार पडले. यानंतर शाळेतील विविध महिला भगिनींचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. यामध्ये शितल शेवाळे, मीना गायकवाड, भाग्यश्री शेवाळे, सुमन गायकवाड, राणी गायकवाड, सुशीला झरेकर, भाग्यश्री देवकर, पूनम राऊत, अश्विनी गायकवाड, निलाबाई गायकवाड, शिलावती शेवाळे, शिवकन्या भालेराव, नीता धेंडे आणि शाळेतील शिक्षिका रूपाली हजारे यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षिका रूपाली हजारे यांनी केले. तर आभार मुख्याध्यापक अनिल गिरी यांनी मानले.

# तुळजाभवानी मंदिराचे प्राचीन बांधकाम न पाडता काही बदल करून मंदिराचा पुरातन ठेवा जतन : आशिष शेलार

### अॅड. आशिष शेलार यांनी तुळजाभवानी मातेचे दर्शन करून मंदिरची पाहणी केली





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ मार्च -**
राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड. आशिष शेलार यांनी दि.८ मार्च रोजी श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेतले. दर्शनानंतर त्यांनी तुळजाभवानी मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकास कामांची पाहणी केली. पाहणी दरम्यान त्यांनी काही सूचना देखील केल्या.


मंदिर व परिसराची पुरातत्व कार्यालयाचे सर्व अधिकारी वर्ग पुरातत्त्व खात्याकडून जी मंदिराची विस्तारीकरण, विकास कामे, यांची पाहणी करून केंद्रीय पुरातत्व खात्याच्या व महाराष्ट्र शासनाच्या सल्लयानुसार मंदिराचे प्राचीन बांधकाम न पाडता काही बदल करून मंदिराचा पुरातन ठेवा जतन करण्याचे व परंपरागत रूढी परंपरा चालू ठेवण्याचे आश्वासन दिले. तुळजापूर व धाराशिव चे सर्व पत्रकार व कार्यकर्ते उपस्थित होते. मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालयात अॅड. आशिष शेलार यांनी श्री. तुळजाभवानी मंदिराच्या नवीन विकास कामासंदर्भात पुरातत्व विभागासोबत आढावा बैठक घेतली. गेल्या महिन्यात देखील मंत्रालयामध्ये सांस्कृतिक कार्य मंत्री शेलार यांच्या दालनात पुरातत्व विभागासोबत बैठक झाली होती. 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन' अर्थात 'मित्र' या संस्थेचे नवनियुक्त उपाध्यक्ष तथा विश्वस्त आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी श्री. तुळजाभवानी देवींची प्रतिमा, कवड्याची माळ व महावस्त्र देऊन मंदिर संस्थानच्या वतीने शेलार यांचा सत्कार केला.

यावेळी तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) अरविंद बोळंगे, पुरातत्व विभागाचे संचालक डॉ. तेजस गर्गे, सहायक संचालक जया वहाणे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नीलेश देशमुख, सहायक व्यवस्थापक (स्थापत्य) राजकुमार भोसले, सहायक व्यवस्थापक (धार्मिक) अनुप ढमाले, जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध देशपांडे, सहायक जनसंपर्क अधिकारी अभिजीत तेरखेडकर, नितीन काळे, विनोद गंगणे, संतोष बोबडे, आनंद कंदले, अमर परमेश्वर, किशोर गंगणे, विपिन शिंदे, शांताराम पेंदे, विकास मलबा यांच्यासह पुजारी नागरिक उपस्थित होते.

## कुनसावळी ग्रामस्थांचा ठेकेदारावर कडक कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ मार्च -**
तुळजापुर तालुक्यातील कुनसावळी येथील जल जीवन मिशन योजनेअंतर्गत सुरु असलेल्या ५६ लाख रुपयांच्या पाणी पुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या ठेकेदारावर कडक कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याप्रकरणी कारवाई न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.


कुनसावळी येथील पाणी पुरवठा योजने अंतर्गत सध्या एकच बोअरवरून पाणी पुरवठा करण्यात येत आहे, त्यामुळे गावातील पाणी पुरवठा कमी दाबाने होतो. यावरून ग्रामस्थांनी चिंता व्यक्त केली आहे. यासोबतच, या योजनेअंतर्गत जे काम सुरु आहे, त्यात रस्त्याच्या दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. पाणीपुरवठ्याच्या कामासाठी जलवाहिनी टाकण्याच्या कामात रस्ता फोडून जलवाहिनी टाकण्यात आले आहे, पण रस्ता दुरुस्तीचे काम अर्धवट आणि निकृष्ट दर्जाचे होत आहे.



ग्रामस्थांनी सांगितले की, संबंधित ठेकेदाराने मुख्य काम पोट गुत्तेदाराला दिले असून त्याच्या किमान प्रयत्नांमुळेच तुळजापुर तालुक्यात विकासकामांमध्ये अडचणी येत आहेत. तसेच, या ठेकेदाराने सांगितल्यावरही कामाच्या गुणवत्तेचा सुधारणा केली नाही. यामुळे ग्रामस्थांनी संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याचा इशारा दिला आहे.

शिवसेनेचे श्रीकांत कोकरे यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे या कामाच्या निकृष्ट दर्जावर तक्रार केली आहे. यावरून ग्रामस्थांनी या कामाची चांगल्या दर्जाची दुरुस्ती व दीर्घकाल टिकणारे काम करून घ्यावे अशी मागणी केली आहे.

## पोदार जम्बो किड्स येथे चिमुकल्या कडून विज्ञानाच्या प्रयोगाचे प्रदर्शनातून सादरीकरण



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ मार्च -**
पोदार जम्बो किड्स, उमरगा येथे विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. ज्यामध्ये नर्सरी ते सिनीयर के.जी पर्यंतच्या १९६ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. तसेच १९३ विद्यार्थांनी स्वतः च्या विज्ञान प्रकल्पाचे उत्कृष्ठ रित्या सादरीकरण केले.

या दिनी शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत वारुडे,उपमुख्याध्यापक अतुल फावडे आणि पोदार जम्बो किडस च्या पालकांनी रिबीन कापून प्रदर्शनाची सुरुवात केली. तसेच नर्सरी वर्गातील विद्यार्थी अयात शेख व सावी डांगे ह्या मुलींनी मुख्याध्यापक श्रीकांत वारूडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या प्रदर्शनात परिक्षक म्हणून शाळेतील सहशिक्षिका तृप्ती कटके, वर्षा गिते, पूजा कुंभार व सहशिक्षक मनिष पांडे, मनोज सोनटक्के हे लाभले.तसेच या परिक्षकांनी चिमुकल्याचे निरीक्षण करून त्यांच्या कला गुणांचे भरभरून कौतुकही केले. ३ ते ७ वयोगटातील चिमुकल्यांनी विज्ञान प्रकल्पासह सहभाग घेतला होता.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक श्रीकांत वारुडे, उपमुख्याध्यापक अतुल फावडे, मंजिरी सूर्यवंशी व त्यांच्या सहकारी रागिनी जावळे, अश्विनी पाटील, ज्योती काळे, आश्विनी दुधभाते, नीतीप्रिया पांचाळ, रेणूका हिरमुखे, विजयालक्ष्मी अंबुसे, अनुसया शिंदे, अंजली क्षीरसागर, सरस्वती भालके यांनी परिश्रम घेतले.

## तुळजाभवानी मंदिर बांधकामदरम्यान दर्शन आणि दैनंदिन विधी अबाधित राहतील : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ मार्च -**
तुळजाभवानी मंदिर विकासात तुळजाभवानी देवीचा गाभारा आणि भवानी शंकर सभामंडप बांधकामावेळेस दैनंदिन दर्शन पूजा विधी जशाच्या तशा चालू राहणार आहेत आईचं दर्शन आणि दैनंदिन पूजा विधि मध्ये बाधा होणार नाही असे आमदार तथा तुळजाभवानी मंदिर संस्थानचे विश्वस्त राणाजगजितसिंह पाटील यांनी येथील शासकीय विश्रामगृह येथे दिनांक ८ मार्च रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये सांगितले



यावेळी तुळजाभवानी दूध संघाचे चेअरमन बाळासाहेब शिंदे, आनंद कंदले, नागेश नाईक विजय शिंगाडे, शांताराम पेंदे, सुहास गायकवाड, विनोद गंगणे, सुहास साळुंके, शिवाजी बोधले यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना राणा दादा म्हणाले की, छत्रपती संभाजी राजे यांनी सुचवल्याप्रमाणे केंद्रीय पुरातन विभागाला कळवले असून पुढील आठवड्यात त्यांची टीम येऊन तुळजाभवानी मंदिरची पाहणी करणार आहेत. मंदिरचे पुरातन कायम राहण्यासाठी संभाजीराजे आणि माझी एक बैठक होणार असून देवीचे पुरातन कायम ठेवून मंदिर विकासकामे करण्याचा प्रयत्न राहणार आहे. भवानी शंकर सभा मंडपाचे काही खांब वाकडे आणि जीर्ण झाले आहेत. त्यामुळे तो सभामंडप उतरावून आहे तसा चढवण्यात येणार आहे. तज्ञ इंजिनिअर कडून गाभारा सुरक्षितेसाठी सल्ला घेऊन ते लेखी स्वरूपात घेतले जाणार आणि उपाययोजना केल्या जाणार आहेत. देवीचा मुख्य गाभारा बांधण्यासाठी

> तुळजाभवानी देवीच्या गाभाऱ्याच्या कामाच्या वेळेस मंदिर बंद राहणार अशा शहरात अफवा पसरल्या होत्या. भाविक भक्त पुजारी, व्यापारी आणि नागरिकांमध्ये नैराश्य वातावरण पसरले होते पण मंदिर बंदच्या अफवांवर आमदार तथा मंदिर संस्थानचे विश्वस्त राणाजगजितसिंह पाटील यांच्या मंदिर विकास कामात दर्शन आणि दैनंदिन पूजा विधी सुरळीत चालू राहणार या वक्तव्यानंतर पडदा पडला.

सहा महिन्याचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे नवरात्र यात्रा महोत्सव झाल्यानंतर ते काम हाती घेण्यात येणार आहे त्यापूर्वी मुख्य गाभाऱ्याच्या बांधकामची तयारी केली जाणार आहे.

तुळजाभवानी देवीचे शिखर देवीचेच स्वरूप आहे त्यामुळे शिखर सोन्याचं होणार आहे. तुळजाभवानी देवीच्या मंदिर विकास कामादरम्यान भाविक भक्त, व्यापारी, पुजारी यांचा विचार करूनच विकास कामे होणार आहेत नागरिकांच्या मंदिर विकास कामा संदर्भात ज्या काही सूचना असतील त्या लेखी स्वरूपात जिल्हाधिकारी यांना द्याव्यात असे आव्हान यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील यांना केले आहे.



**धाराशिव :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात कार्यरत असणाऱ्या मातृशक्तीचा जागतिक महिला दिनाच्या औचित्य साधून सत्कार करण्यात आला. यावेळी वैद्यकीय महाविद्यालयातील उपअधिष्ठाता डॉ. उज्वला गवळी, प्रा.डॉ. पुष्पा अग्रवाल, प्रा.डॉ. चारुशीला हलगलकर, डॉ. आनंदवाडीकर, डॉ. मोनिका युनाती, डॉ. किरण देशमुख, डॉ. अनुजा कंदले, सहायक प्रा.डॉ. शितल पिसाळ, डॉ. क्षितिजा बनसोडे, डॉ. प्रीती घोरपडे, सुरक्षा रक्षक बाराते, लिपिक आशा राऊत, संगीता फड, भालेराव, गवई, गोरे, जाधव यांच्या हस्ते वृक्षारोपणही केले.

### केंद्रीय पथकाकडून बर्ड फ्लू बाधित क्षेत्राची पाहणी

**धाराशिव, दि.८ मार्च -** ढोकी (ता. धाराशिव) येथे उद्भवलेल्या बर्ड फ्लूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या पशुधन अधिकाऱ्यांच्या पथकाने आज (दि. ८ मार्च २०२५) बाधित क्षेत्राला भेट देऊन पाहणी केली. केंद्रीय पशुधन अधिकारी डॉ. विवेक सरोज यांच्या नेतृत्वाखालील या पथकाने परिस्थितीचा आढावा घेतला आणि प्रशासकीय उपाययोजनांवर समाधान व्यक्त केले.

# आरोग्य कर्मचाऱ्यांना वेठीस धरणाऱ्या समाजकंटकांवर कडक कारवाई करा

### आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे पोलीस प्रशासनाला निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मार्च -**
सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार आणि तातडीने तज्ञांच्या निगराणीखाली उपचार उपलब्ध व्हावे यासाठी वैद्यकीय महाविद्यालय शासनाने सुरू केले आहे. त्याठिकाणी रुग्णांना दिलासा देण्यासाठी कर्तव्यावर असलेल्या वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी बांधवांना कोणी वेठीस धरत असेल तर आपण हे कदापि सहन करणार नाही. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसरात उपद्रव माजविणाऱ्या समाजकंटकांचा तात्काळ कायदेशीर मार्गाने बंदोबस्त व्हायलाच हवा अशा शब्दात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिलासा देत समाजकंटकांवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याचे पोलीस प्रशासनाला निर्देश दिले.

समाजकंटकाकडून त्रास होत असल्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलनाचा इशारा दिला होता. त्या पार्श्वभूमीवर आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसराला भेट देऊन सुरक्षेचा आढावा घेतला. रुग्णालय परिसर आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपद्रव माजविणाऱ्या या समाजकंटकांवर तातडीने योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना उपविभागीय पोलीस अधिकारी स्वप्नील राठोड यांना दिल्या. यावेळी उपस्थित कर्मचारी व वैद्यकीय अधिकारी यांच्या अडीअडचणीही जाणून घेतल्या. उपस्थित करण्यात आलेल्या अडचणी दूर करण्याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचनाही देण्यात आल्या. या परिसरात पुरेसा पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याबाबत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी स्वप्नील राठोड यांना निर्देश दिले. तसेच परिसरात सीसीटीव्ही व सुरक्षा रक्षक आणि सुरक्षा व्यवस्था अधिक वाढविण्याबाबतही सांगितले.



यावेळी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनाही आवर्जून पाचारण करण्यात आले होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय परिसरातील आवश्यक ती सर्व कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या. जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांसाठी जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता या सर्वांनी संयुक्तपणे आरोग्य शिबिर आयोजित करण्याची सूचना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी केली. महात्मा फुले जन आरोग्य व इतर आरोग्य योजनांच्या माध्यमातून शासनाकडून प्राप्त होणाऱ्या प्रती पूर्ती रकमेतून डॉक्टरांना प्रोत्साहनपर मानधन देण्याबाबतही त्यांनी आवर्जून महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान यांना सांगितले. याप्रसंगी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान, शल्यचिकित्सक डॉ. चाकूरकर, डॉ. लाकाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. स्वप्नील राठोड, बांधकाम विभागाचे अभियंता मोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जयंती समितीच्या अध्यक्षपदी शिंदे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ मार्च -** येथील दयानंद कला महाविद्यालयात प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांच्या अध्यक्षतेखाली 'जी-२४' चे सदस्य आणि अन्य समविचारी संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक संपन्न झाली.

यावेळी झालेल्या चर्चेत येणाऱ्या एप्रिल महिन्यात महात्मा ज्योतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा बसवण्णा यांच्या जयंती निमीत लातूर जिल्ह्यात महिनाभर समाजप्रबोधनाचे कार्यक्रम घेण्याचे ठरले. भारताची लोकशाही आणि संविधानाला धोका निर्माण झाला असून यासंबंधाने महापुरुषांच्या जयंती निमीत्त लोकजागृती करण्यासाठी विविध उपक्रम घेण्याचे निश्चीत करण्यात आले.

यावेळी प्रा.डॉ. अशोक नारनवरे, प्रा.सुभाष भिंगे, प्रा.सुधीर अनवले, प्रा.डॉ. निशीकांत वारभूवन, यु.डी. गायकवाड यांनी मार्गदर्शन करून सूचना मांडल्या. बैठकीचे प्रास्ताविक प्रा.डॉ. हर्षवर्धन कोल्हापूर यांनी केले. रामराजे आत्राम यांनी सूत्रसंचलन केले तर नरसिंग घोडके यांनी आभार मानले.

यावेळी ' फुले-आंबेडकर -बसवण्णा बुध्दीजीवी जयंती समिती ' गठीत करण्यात आली. ती पुढील प्रमाणे आहे. समाजवादी नेते शिवाजीराव शिंदे (अध्यक्ष) ओबीसी नेते भारत काळे (सचिव) प्रा.मकबूल शेख (कार्याध्यक्ष) यु.डी. गायकवाड (कोषाध्यक्ष) प्रा.डॉ. सुधाकर सदानशिव,राजकुमार नामवाड, विजयकुमार पिनाटे, प्रा. अनंत चौधरी, धनराज माने, हरिभाऊ गायकवाड (उपाध्यक्ष) श्रीकांत मुद्दे, भीमराव गडेराव, वामन काळे, प्रताप माने -पाटील (सहसचिव) पद्माकर वाघमारे, नरसिंग घोडके, सुदर्शन बोराडे, (सहकोषाध्यक्ष ) डी. उमाकांत (प्रसिद्धीप्रमुख ) रामराजे आत्राम (निमंत्रक ) प्रा.डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे, प्रा.डॉ. निशिकांत वारभूवन आदिंची विविध पदावर निवड झाली.



## संक्षिप्त वृत्त...

### प्रा. निंगप्पा रेड्डी जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ मार्च -** महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद, पुणे यांचेकडून दिला जाणारा २०२४-२५ चा 'भूगोलशास्त्र अध्यापक जीवनगौरव पुरस्कार' महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील माजी भूगोल विभागप्रमुख प्रा. निंगप्पा लक्ष्मीबाई भिमन्ना रेड्डी यांना सी. बी. खेड्गीज कॉलेज, अक्कलकोट, जिल्हा सोलापूर, संस्थेचे अध्यक्ष, सचिव व अन्य संचालक यांच्या उपस्थितीत पुण्यश्लोक अहिल्याबाई होलकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर व महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषदचे कार्याध्यक्ष डॉ. प्रवीण सप्तर्षी यांच्या शुभहस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

सी. बी. खेड्गीज कॉलेज, अक्कलकोट, महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद, पुणे, सोलापूर भूगोल शिक्षक संघ, सोलापूर व मराठवाडा असोसियशन ऑफ जिऑग्राफर्स, लातूर यांच्या सयुंक्त विद्यमाने दोन दिवसीय आयोजित राष्ट्रीय परिषदेमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### विद्यार्थी वाहतूक संघटनेचा रविवारी लातुरात महामेळावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ मार्च -** स्कूलबस चालकांचे प्रश्न तसेच महामंडळाकडूनच्या अपेक्षा याअनुषंगाने लातूर जिल्हा विद्यार्थी वाहतूक संघटनेकडून राज्यस्तरीय महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यासह राज्यभरातील स्कूलबस चालकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संघटनेचे अध्यक्ष श्रीकृष्ण पाडे यांनी केले आहे. सेव्हन प्लस वन ही गाडी पुन्हा स्कूलबस म्हणून चालू करावी, स्कूलबस परवानाधारकांना गाडीची वयोमर्यादा असे मेळाव्यातील विषय आहेत. रविवार (दि. ९) रोजी दिवसभर रिंगरोडवरील गजराज पॅलेस याठिकाणी कार्यक्रम होणार आहे. स्कूलबस चालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

### पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांना 'बाल स्नेही' पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ मार्च -** बालकांमध्ये जनजागृती निर्माण करून त्यांना सुरक्षा देण्यासाठी राबविण्यात आलेल्या विविध योजनांची दखल घेवून केलेल्या विशेष कार्याबद्दल उत्कृष्ट पोलीस अधीक्षक म्हणून 'बाल स्नेही' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथील विशेष समारंभात हा पुरस्कार देण्यात आला.

पुरस्कार वितरण समारंभास महिला बाल व विकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मंत्री पंकज भोयर, आमदार संजय केळकर, आमदार मनीषा कायंदे, बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा ॲड. सुशीबेन शाह, अपर पोलीस महासंचालक अश्वती दोरजे तसेच आयोगाचे सर्व सदस्य आणि पदाधिकारी उपस्थित होते.

### महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे १५ व १६ मार्चला अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ मार्च -** महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे ४० वे वार्षिक अधिवेशन दि.१५ व १६ मार्च २०२५ रोजी वर्धा येथील सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालयात आयोजिले असून,या अधिवेशनाचे उद्घाटन दि.१५ मार्च रोजी सकाळी सायंकाळी ५ वाजता खा.अमर काळे यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षपदी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रा.डॉ.गजानन कोटेवार हे राहणार आहेत.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आ.विजय वडेट्टीवार,आ.अभिजित वंजारी, आ.सुधाकर अडबाले हे लाभणार असून, प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे प्र.ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, मराठवाडा सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,नागपूर विभाग सहाय्यक ग्रंथालय संचालक रामदास साठे,वर्धा जिल्हा माहिती अधिकारी रवी गीते, वर्धा जिल्हा ग्रंथालय अधिकारी नितीन सोनोने तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. श्रीपाद जोशी,प्रा.डॉ.नारायण निकम आदिंची उपस्थिती राहणार आहे.

## जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला झाला प्रशासनातील महिलांचा सन्मान

### कर्तृत्ववान महिलांच्या कार्याचा लातूर जिल्हा प्रशासनाकडून गौरव




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ मार्च -** वरिष्ठ पदांवर कार्यरत अधिकाऱ्यांना त्यांच्या विभागाच्या कामगिरीचे श्रेय दिले जाते. मात्र, प्रशासनाच्या उतरंडीत तळाशी असलेल्या कर्मचाऱ्यांच्या कर्तृत्वाची दखल सहसा घेतली जात नाही. त्याचे स्वतंत्रपणे मूल्यमापन होत नाही. असाच अनुभव महिला दिनानिमित्त आयोजित अनेक कार्यक्रमात येतो. नेमकी हीच बाब हेरून, विविध विभागात प्रत्यक्ष फिल्डवर काम करणाऱ्या महिलांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या संकल्पनेतून जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला 'मान्विथा कर्मसिध्दी पुरस्कार वितरण' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यानिमित्ताने शहरातील स्वच्छता कर्मचारी, फायरमन ते ग्रामीण भागात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या आरोग्य सेविका, आशा कर्मचारी अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांना सन्मानित करण्यात आले.

जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला जिल्हाधिकारी कार्यालयात रंगलेल्या या आगळ्यावेगळ्या कौतुक सोहळ्याला जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जागतिक महिला दिनाचा कौतुक सोहळा केवळ शीर्षस्थ पदावर काम करणाऱ्या महिलांपर्यंत मर्यादित राहू नये, प्रत्यक्ष फिल्डवर काम करणाऱ्या महिलांच्या कार्याची दखल यानिमित्ताने घेतली जावी, ही संकल्पना घेवून यंदा जिल्हा प्रशासनाने मान्विथा कर्मसिद्धी पुरस्कार वितरण समारंभ आयोजित केला होता. साचेबद्ध स्वरुपाला फाटा देत, कोणतेही व्याख्यान, भाषण न देता संवादात्मक स्वरूपाचा हा कार्यक्रम सर्वांसाठी उत्साहवर्धक ठरला. यानिमित्ताने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांची विवेक सौताडेकर यांनी घेतलेली प्रकट मुलाखत आणि त्यामध्ये उपस्थित महिलांनी नोंदविलेला सहभाग हे कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. सोबतच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्या मुलाखतीतून महिला अधिकारी, कर्मचारी यांच्यासोबत काम करताना येणाऱ्या अनुभवाविषयी, तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये महिला आणि पुरुषांची भूमिका कशी असावी, याबाबत त्यांचे विचार जाणून घेतले.

## भिकाऱ्याला जिवंत जाळणारा आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ मार्च -** रस्त्यावर झोपलेल्या भिकाऱ्याला पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला २४ तासाच्या आत अटक करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक ४ मार्च २०२५ च्या मध्यरात्री एका अज्ञात आरोपीकडून औसा शहरातील एका दुकानासमोर झोपलेल्या भिकाऱ्याच्या अंगावर पेट्रोल टाकून त्याला जिवंत जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. सदर घटनेमध्ये सदरचा भिकारी जळून गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर औसा व त्यानंतर लातूर येथील रुग्णालयात उपचार चालू असताना त्याने दिलेल्या फिर्यादीवरून ०५ मार्च रोजी पोलीस ठाणे औसा येथे दिनांक गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, औसा कुमार चौधरी यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे औसा चे पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे यांचे पथकाने गुन्ह्याचा अतिशय बारकाईने तपास करून गोपनीय माहिती मिळवून रस्त्यावर दुकानासमोर झोपलेल्या भिकाऱ्याच्या अंगावर पेट्रोल टाकून जिवंत जाळणारा आरोपी योगेश सिद्राम बुट्टे, (वय ३५ वर्ष, राहणार अन्नपूर्णा नगर, औसा.) याला त्याच्या राहते ठिकाणाहून अटक करण्यात आली आहे.

भिकाऱ्याने आरोपीला शिवी दिल्याचा राग मनामध्ये धरून रात्री रोडवर झोपलेल्या भिकाऱ्याला पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला असल्याचे कबूल केले आहे. सदरची कामगिरी वरिष्ठांचे व पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांच्या मार्गदर्शनात पोलीस ठाणे औसा चे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक महावीर जाधव, सहाय्यक फौजदार कांबळे, पोलीस अंमलदार गुट्टे, रतन शेख, समीर शेख आदिंनी बजावली.

## अध्यात्माशिवाय सुखशांती लाभत नाही : कराड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ मार्च -** कितीही पैसा असला तरी कोरोना काळात उपयोग झाला नाही. माणूस पैशाने श्रीमंत होऊ शकतो. मात्र, अध्यात्माशिवाय सुखशांती, समाधान लाभत नाही. प्रत्येक अध्यात्मिक, धार्मिक कार्यात महिलांचा मोठा सहभाग आहे. आज केवळ महिलांमुळेच अध्यात्मिक क्षेत्र टिकून आहे. येणाऱ्या पिढीचा अध्यात्मात सहभाग वाढावा यासाठी महिलांनीच पुढाकार घ्यावा, असे आवाहन भाजप युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ऋषिकेश रमेश कराड यांनी केले.

येथील श्री बालाजी व ज्ञानेश्वर मंदिर परिसरात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ गेल्या २८ फेब्रुवारी ते ६ मार्च दरम्यान झाला. या सप्ताहात दररोज स्वामी चैतन्यजी महाराज यांची भागवत कथा झाली.



## मराठीचा अवमान करणाऱ्या जोशींचा ठाकरे सेनेतर्फे निषेध

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ मार्च -** मराठी भाषेविषयी वादग्रस्त वक्तव्य करणारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी यांचा लातूर जिल्हा ठाकरे सेनेच्यावतीने येथील महात्मा गांधी चौकात शुक्रवारी निदर्शने करून निषेध नोंदवण्यात आला. जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्त्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैयाजी जोशी यांनी मुंबईत येणाऱ्यांनी मराठी भाषा शिकलीच पाहिजे, असे नाही, असे वक्तव्य करून मराठी भाषेचा व मराठी माणसाचा अपमान केला आहे. या वक्तव्याचा निषेध म्हणून जिल्हा ठाकरे सेनेच्यावतीने जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्वात शुक्रवारी लातूरच्या महात्मा गांधी चौकात जोशी यांच्या विरोधात घोषणाबाजी करत निषेध आंदोलन करण्यात आले. भैय्याजी जोशी यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल जाहीर माफी मागावी, अशी मागणी सोमवंशी यांनी यावेळी केली.

या आंदोलनात जिल्हाप्रमुख सोमवंशी यांच्यासह सहसंपर्क प्रमुख नामदेव चाळक, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, महिला जिल्हा संघटक सुनीता चाळक, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, सी. के. मुरळीकर, शहरप्रमुख विष्णू साठे, रमेश माळी, एस. आर. चव्हाण, बसवराज मंगरूळे, माधव कलमुकले, शंकर रांजनकर, विलास लंगर, कैलास पाटील, दत्तू मोरे, भास्कर माने, सूरज बाहेती, मारुती सूर्यवंशी, मारुती सावंत, राजू कतारे, राजू घटमल, रोहित दोपारे, गणेश गंगणे, प्रदीप बनसोडे, विष्णू कांबळे, कृष्णा जाधव, प्रेम शाहीर, राम चोथवे, सोमनाथ आग्रे, परमेश्वर कांबळे, अभिजित गायकवाड यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होते.

## भारतीय स्त्री शक्तीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ मार्च -** भारतीय स्त्री शक्ती लातूर शाखेच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी स्त्री सुरक्षा आणि स्त्री सन्मान या स्त्रियांच्या गंभीर विषयाबाबत कौटुंबिक स्तरावर व शासकीय स्तरावर कार्यवाही करण्याच्या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांना देण्यात आले.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या या निवेदनामध्ये, ग्रामीण भागात तसेच कार्यालयात आणि कुटुंबामध्ये आई बहिणीवरून शिव्या देण्याचे प्रमाण खूप जास्त आहे. त्यात कांही गैर किंवा चुकीचे आहे, हेच पुरुषवर्गाच्या लक्षात येत नाही. कांही वेळेस या शिव्या स्त्रियांच्या अवयवावरून अत्यंत किळसवाण्या शब्दात दिल्या जातात. घरातील लहान मुलेही याचे अनुकरण करतात आणि सार्वजनिक ठिकाणी व कार्यालयात स्त्रियांचा सन्मान राखला जात नाही. वास्तविक, अशी वर्तणुक भारतीय दंड संहिता कलम ५०९ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ७९ नुसार गुन्हा ठरतो आणि या गुन्ह्याला शिक्षा देण्याची तरतूद या कायद्यात आहे, याचा उहापोह करण्यात आला आहे.

याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी प्रत्येक कार्यालयात, विद्यालयात, महाविद्यालयात अशा शिव्या न देण्याची शपथ अनिवार्य करणे गरजेचे आहे, या बाबतचे शपथपत्रही निवेदनासोबत देण्यात आले. यावेळी भारतीय स्त्री शक्ती लातूर शाखेच्या अध्यक्षा प्रेमा बाहेती, सचिव संजीवनी सबनीस, उपसचिव विभा बोकील, सदस्या शैला कारंडे, ज्येष्ठ मार्गदर्शक लीला कर्वा व सुलोचना नोगजा इत्यादी पदाधिकारी उपस्थित होत्या.

## 'एक धाव' स्वतःसाठी रॅलीचा अनेकांच्या उपस्थितीत शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ मार्च -** जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय लातूर व वुमन्स डॉक्टर विंग आय एम ए लातूर यांच्या वतीने आयोजित एक धाव स्वतः साठी या रॅलीचा शुभारंभ राहुल कुमार मीना यांच्या हस्ते व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले डॉ. मंगेश सेलुकर, डॉ. विमल डोळे, डॉ. संजय ढगे, डॉ. बालाजी बरुरे, डॉ. सरीता मंत्री, डॉ. क्रांती साबदे, डॉ. मोहीनी गाणु, डॉ. अशोक सारडा, डॉ. श्रीधर पाठक आदी मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे संपन्न झाला.

या प्रसंगी बोलताना डॉ. सरीता मंत्री यांनी सर्व महिलांनी स्वतः च्या हक्कासाठी एकत्र येऊन लढणे आवश्यक आहे. तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळातील महीला पर्यंत पोहचण्यासाठी महीलानी प्रयत्न केले पाहिजेत असे मत व्यक्त केले.

डॉ. प्रदीप ढेले यांनी शासकीय कार्यालयात महीलाना सुरक्षित वातावरण प्राप्त होण्यासाठी स्थापन केलेल्या विशाखा समितीच्या कार्यपद्धती बाबत सविस्तर माहिती दिली. जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाच्या वतीने गरोदर मातांच्या तपासणी, स्तनाच्या व गर्भाशयाच्या कर्करोगाच्या निदानासाठी सर्व ग्रामीण रुग्णालयात मोफत शिबिरे आयोजित करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच या वर्षीचे घोष वाक्य स्लरेटक्शन म्हणजेच महीला वर होणारा अन्याय दुर करण्यासाठी प्रशासनाने तात्काळ कारवाई करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी अध्यक्षीय समारोप करताना कार्यक्रमाचे नेटक्या आयोजना बद्दल जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय व वुमन्स डॉक्टर विंगचे अभिनंदन करतांना, महिलाच्या आरोग्याची काळजी घेणारे व जागृती करणारे कार्यक्रम सातत्याने राबविणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.

या पुढील काळात आरोग्य विभाग व महीला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून लातुर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात महीलाच्या आरोग्या विषयक व सक्षमीकरण करण्यासाठी कार्यक्रम राबविले जाणार आहेत असे सांगितले. एक धाव स्वतः साठी ही रॅली डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क ते गंज गोलाई ते परत डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे येऊन समारोप करण्यात आला.

या रॅलीमध्ये महिला डॉक्टर, महिला कर्मचारी, नर्सींग कॉलेजच्या विद्यार्थ्यीनी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ आनंद कलमे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. माधुरी उटीकर, ॲड. मेखले, श्रीमती पुजा पाटील आदिंनी परिश्रम घेतले.

## लातूरमध्ये बँक कर्मचाऱ्यांची तीव्र निदर्शने




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.८ मार्च -** मागील दोन वर्षापासून प्रत्येक राष्ट्रीयकृत बँकांमधून पुरेशा प्रमाणात नोकर भरतीची मागणी कर्मचारी संघटना करीत आहेत.

यासाठी अनेक वेळा आंदोलनाचे वेगवेगळे कृती कार्यक्रम त्यांनी राबविले आहेत परंतु प्रत्येक राष्ट्रीयकृत बँकेचे व्यवस्थापन कुठल्याही बँकांमधून पुरेशी नोकर भरती करायला तयार नाही. तसेच ज्या काही जागा भरण्यात येत आहेत. त्यातल्या बहुतांश जागा कंत्राटी भरती द्वारे भरण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. याला सर्व संघटनांचा विरोध आहे. मार्च २०२४ मध्ये झालेल्या द्विपक्षीय करारानुसार सहा महिन्याच्या आत उर्वरित मुद्दे निकाली काढणे गरजेचे असताना सुद्धा केंद्र सरकार व आयबीए कडून पाच दिवसाचा आठवडा, जुनी पेन्शन योजना, यासारख्या कुठल्याही विषयावरती भूमिका घेतली जात नाही.मार्च महिन्यात दोन दिवसांचा संप बँक कर्मचाऱ्यांनी पुकारलेला आहे व त्यातून जर योग्य तो तोडगा निघाला नाही तर एप्रिल महिन्यात बँक कर्मचाऱ्यांना नाईलाजाने बेमुदत संपाकडे वाटचाल करावी लागेल असा इशारा यावेळी बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड उत्तम होळीकर यांनी दिला.

जर सरकार बँक कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या एकजुटीला गांभीर्याने घेत नसेल व प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी टाळाटाळ करत असेल तर याचे गंभीर परिणाम बँकिंग व अर्थव्यवस्थेला सोसावे लागू शकतात हे सरकारने लक्षात घ्यायला हवे. कारण बँक कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या एकजूटीमध्ये बँकिंग व अर्थव्यवस्थेची चाके थांबविण्याची ताकद अजूनही आहे हे सरकारने लक्षात घ्यावे.कामाचा वाढता भार पाहता वैयक्तिक आयुष्य व काम यामध्ये संतुलन करण्यासाठी पाच दिवसाच्या आठवड्याची आज नितांत गरज आहे. परंतु आयबीए कडून दरवेळी याबाबत टोलवाटोलवीची उत्तरे देण्यात येत आहेत. हा लढा फक्त या मुद्यांपुरताच मर्यादित नसून अनेक बँकांमध्ये सुरू असलेल्या एकाधिकारशाही विरोधात तसेच बँकांच्या संचालक मंडळामध्ये कर्मचाऱ्यांचे, अधिकाऱ्यांचे, ठेवीदारांचे, शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व असावे यासारख्या अनेक धोरणांच्या मुद्द्याचा देखील आहे. कारण कोणत्याही बँकेचे धोरण काय असावे हे केवळ त्या बँकेचे चेअरमन यांना ठरविण्याचा अधिकार नसून बँकेतील सर्व घटकांच्या एकत्रित विचाराने बँकेचे धोरण ठरायला हवे. यासारख्या अनेक गोष्टी या आंदोलनाच्या पाठीमागे असल्याचेही कॉम्रेड होळीकर म्हणाले. यावेळी उमेश आडगावकर, सचिन नंदागवळे, विवेक पदरे, राजेंद्र दरेकर, बालाजी बावलगे, आदित्य देशपांडे, स्वप्निल जाधव, भीमाशंकर उटगे आदिंची उपस्थिती होती.

लातूर
जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# विद्यार्थ्यांनी संशोधनाची सवय विकसित करावी : प्रा.एस.जी. गट्टानी

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.८ मार्च -**

आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीत 'संशोधन साहित्य-प्लॅगीरिझम' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रा. डॉ.एस.जी. गट्टानी उपस्थित होते.

प्रा. गट्टानी यांनी कार्यशाळेत विद्यार्थ्यांना साहित्य चोरी रोखण्यासाठी नैतिकतेचे महत्त्व समजून संशोधनाची सवय विकसित करण्याचे आवाहन केले.

त्यांनी सांगितले की, डिजिटल युगामुळे संशोधन सुलभ झाले असले तरी साहित्य चोरी ही एक गंभीर समस्या आहे, जी रोखण्यासाठी कठोर उपाययोजना आवश्यक आहे.

कार्यशाळेच्या उद्घाटनाच्या वेळी स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रा.आर.एस. माने, महाविद्यालयाचे प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, तसेच अन्य प्रमुख पाहुणे उपस्थित होते. कार्यशाळेत १०५ पेक्षा अधिक संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थी सहभागी झाले.सूत्रसंचालन पायल जाधव यांनी केले, तर कार्यशाळेचे समन्वयक डॉ. सुरज मालपाणी यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी एम. फार्मसी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी महत्वाची भूमिका बजावली.

## ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### इनरव्हील क्लबकडून सिमेंटची बाक भेट

**उदगीर, दि.८ मार्च -**

येथील इनरव्हील क्लबच्या वतीने येथील स्मशानभूमी व बसस्थानकात येणाऱ्या लोकांना बसण्यासाठी सिमेंटची बाके दिली आहेत. या बाकांचा लोकार्पण सोहळा राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त विश्वनाथ मुडपे, उदगीर बस आगाराचे सहाय्यक वाहतुक निरीक्षक रविकांत कांबळे, वाहतूक नियंत्रक दीपक कांबळे, ज्येष्ठ चालक जयवंत पाटील, वाहक संतोष पावले, व्ही.एस. कुलकर्णी, गोविंद गायकवाड, सूर्यकांत मुंडे, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा मानसी चन्नावार, उपाध्यक्षा अश्विनी देशमुख, सचिव पल्लवी मुक्कावार, कोषाध्यक्ष मीरा चंबुले, माजी अध्यक्षा स्वाती गुरुडे, सदस्य रोहिणी चाटे, स्वाती बिरादार, कल्पना चौधरी, अलका येरोळकर, सुप्रिया महाजन, स्वाती जेठुरे, दिपा कुलकर्णी, पुजा मुडपे, नंदिनी निटुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.



### शंकर मिटकर यांची निवड

**शिरूर अनंतपाळ, दि.८ मार्च -**

तालुक्यातील थेरगाव येथील शतकवीर विमा सल्लागार मिटकर शंकर गोविंदराव यांची व त्यांच्या सहकाऱ्यांची भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या क्षेत्रीय प्रशिक्षण कार्यालय आकुर्डी पुणे येथील प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली. दोन दिवसीय प्रशिक्षणामध्ये अनेक नामवंत विचारवंतांचे प्रशिक्षण मिळाले वरीष्ठ झोनल अधिकारी बि. गोपीप्रसाद, डायरेक्टर डी. घनश्याम वरंदानी, अशोक जयसिंग, आर. मालती या वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य विकास अधिकारी डी.एस. काळे यांच्या नेतृत्वाखाली प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. यात भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या वतीने देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणासाठी मधुकर पवार, शंकर मिटकर, पवण आनंदराव, राधिका चांडक, मथुरा सुर्यवंशी, अनिता सोळुंखे, सुरेखा कर्रे, ज्योती पवार, ज्योत्स्ना भुसावळे, माया सदावर्ते, सविता वाघमारे, अस्मिता अवसारे इत्यादींनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

# विभागीय आयुक्तालय लातूरलाच करा : आ. अभिमन्यू पवार

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.८ मार्च -**

लातूर येथे २२ प्रादेशिक व विभागीय कार्यालय असून आयुक्तालय नसल्यामुळे दररोज ३०० किलोमीटरची फरफट करावी लागते. तसेच सर्वसामान्यांची होत असलेली गैरसोय टाळण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून लातूर विभागीय आयुक्तालयाची मागणी असून कार्यालयाच्या दृष्टीने इमारतीसह सर्व सुविधा उपलब्ध आहेत. यामुळे नैसर्गिक न्यायाने लातूरला विभागीय आयुक्तालय करा, अशी मागणी आ. अभिमन्यू पवार यांनी मुंबई सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली आहे.



मागील काळात नांदेड येथे विभागीय आयुक्तालय होऊन गेले. तत्कालीन मुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस आजही मुख्यमंत्री आहेत. त्यावेळी त्यांनी दांगड समिती गठीत केली होती. त्या समितीचा अहवाल लागू करावा.

लातूर येथे विभागीय आयुक्तालय करावे, अशी बऱ्याच वर्षापासून मागणी आहे. नैसर्गिक, प्रशासकीय व भौगोलिक दृष्ट्या आणि गुणवत्तेच्याच्या दृष्टीने लातूरला विभागीय आयुक्तालय व्हायला पाहिजे. तसेच लातूरला २२ विभागीय व प्रादेशिक कार्यालय आहेत. त्यामुळे विभागीय आयुक्तालय व्हायचे असेल तर लातूरलाच व्हायला हवे. नाही तर एखाद्या नवीन जिल्ह्याची निर्मिती करून नांदेड जिल्ह्याला तीन व लातूर जिल्हे जोडून दोन विभागीय आयुक्तालय करावे, असेही होत नसेल तर लातूर व नांदेड येथे अपर आयुक्तालय करावे, अशी मागणी आ. अभिमन्यू पवारांनी यावेळी केली.

विभागीय आयुक्तालय लातूरकरांच्या अस्मितेचा विषय झाला असून कामकाजासाठी तीनशे किलोमीटरचे अंतर कापावे लागत आहे. होत असलेली सर्व सामान्यांची फरफट थांबविण्यासाठी लातूर विभागीय आयुक्तालय करावे. आणि दोन्ही जिल्ह्यातील राजकीय, भौगोलिक वाद न करता दोन्ही जिल्ह्यात अपर आयुक्ताय तयार करावे, अशी मागणी यावेळी आ. अभिमन्यू पवार यांनी केली आहे.

## 'त्या' दुचाकीस्वारावर कार्यवाही करावी

दुचाकीस्वाराच्या बेजबाबदारपणामुळे लातूर-नांदेड रोडवर बस अपघात झाला. यामध्ये जखमी प्रवाशांवर मोफत आरोग्य उपचार करण्यात यावेत, गंभीर जखमी व जखमी प्रवाशांना आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच अपघातासाठी जबाबदार असलेल्या दुचाकीस्वारावर योग्य कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आ. अभिमन्यू पवार यांनी अधिवेशनाच्या माध्यमातून सरकारकडे केली.

# चक्रीवादळामुळे ज्वारी नासधूस; रानडुकरांचा धुमाकूळ



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.८ मार्च -**

अनंतपाळ तालुक्यातील बाकली शिवारात असलेल्या सतीश बाबुराव लांबोटे यांच्या शेतात अचानक आलेल्या चक्रीवादळामुळे ज्वारीचे पिक जमीनदोस्त झाले आहे. तसेच, आडव्या पडलेल्या ज्वारीच्या पिकांमध्ये रानडुकरांनी धुमाकूळ घालून मोठे नुकसान केले आहे.

अचानक येणाऱ्या संकटांची सवय होऊन गेली असली तरी, रात्री उशिरापर्यंत गस्त घालूनही रानडुकरांच्या हल्ल्यापासून पिकांचे संरक्षण करणे अवघड बनले आहे. शेतकरी सतीश लांबोटे यांनी तरुण भारतशी बोलताना सांगितले की, शेतकरी दररोज रात्री फटाके वाजवून रानडुकरांना पळवून लावत आहेत, परंतु एकट्या शेतकऱ्यांना या कळपाचा मुकाबला करणे अत्यंत कठीण आहे. शेतकऱ्यांकडून वनविभागाच्या अधिकाऱ्यांना यावर तातडीने लक्ष देण्याची मागणी केली जात आहे. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान करणाऱ्या वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करण्याची आणि नुकसान भरपाई देण्याची मागणी जोर धरत आहे. याशिवाय, शासनाने शेतकऱ्यांना कुंपण तार मोफत उपलब्ध करावीत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे.

बाकली व माचरटवाडी येथील शेतकऱ्यांनी वनविभागाला या समस्येचे गांभीर्य समजून मदतीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे.

# लंडन येथील फार्मासुटिकल एज्युकेशनच्या सल्लागारपदी प्राचार्य बुमरेलांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.८ मार्च -**

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला यांची लंडन येथील स्कूल ऑफ फार्मासुटिकल एज्युकेशनच्या सल्लागार पदी निवड झाली आहे. यामुळे या संस्थेचे शैक्षणिक आणि प्रशासकीय सल्लागार म्हणून काम पाहणार आहेत.

लंडन येथील स्कूल ऑफ फार्मासुटिकल एज्युकेशन संस्थाअंतर्गत क्लिनिकल रिसर्च, फार्माकोव्हिजिलन्स आणि ड्रग रेग्युलेटरी अफेअर्स मध्ये प्रशिक्षण देण्यात येते. याचबरोबर सतत व्यवसायिक विकास प्रमाणन सेवांचे सदस्य आहे. तसेच युनियटेड किंगडम मधील १९९६ पासून स्थापित असून प्रमाणन सेवा जगातील आघाडीची आणि सर्वात मोठी स्वतंत्र संस्था आहे. या जागतिक दर्जाच्या लंडन येथील संस्थेचे शैक्षणिक आणि प्रशासकीय सल्लागार म्हणून लातूर कालेज आफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला काम पाहणार आहेत.

या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालिका माधुरी बावगे, प्राचार्य नंदकिशोर बावगे व संस्थेच्या सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



# सद्गुरु उदागिर बाबा महाराज यांचा २२ पासून उत्सव सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.८ मार्च -**

श्री सद्गुरु उदागिर बाबा महाराज यांचा उत्सव सोहळा २२ ते ३० मार्च दरम्यान संपन्न होत आहे. उदगीरचे आद्यदैवत श्री सद्गुरु उदागिरी बाबा महाराज यांचा उत्सव सोहळा प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शनिवार दि. २२ मार्च ते ३० मार्च दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमाने संपन्न होणारं आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी संत ज्ञानेश्वर माउली उत्तरेश्वर पिंपरी चाकरवाडी व प.पु.वै. नागेंद्रगिर गुरु नारायणगिर महाराज व संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज कपिलधार यांच्या चरणी उत्सव सोहळा कार्यक्रम पत्रिका अर्पण करुन गुरु माऊलीच्या कृपा आशिर्वादाने सद्गुरु उदागिर महाराज श्री गुरु कृपेने उत्सव सोहळा प्रारंभ होणार आहे. शनिवार दि.२२मार्च रोजी अखंड हरिनाम सप्ताह व श्रीज्ञानेश्वरी पारायणाचा शुभारंभ उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांच्या हस्ते सपत्निक रुद्राभिषेक व ज्ञानेश्वरी पारायण ग्रंथाची पुजा करुन तसेच विना पुजन करुन हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ होणार आहे. रविवार दि.३० मार्च रोजी गुडी पाडव्यानिमित्त प्रतिवर्षा प्रमाने श्री सद्गुरु उदागिर बाबा उत्सवानिमित्त ३० मार्च रोजी सकाळी ९ ते ३ या वेळेत भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

सद्गुरु उदागिर बाबा महाराज उत्सवात भाविक भक्तांनी सहभागी होवून दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन मठाधिश जयेशगिर गुरु सतिषगिर महाराज यांनी केले आहे

# ग्रा.पं.च्या विशेष वसुली मोहिमेत एकाच दिवशी पंधरा लाखांची वसुली



निलंगा तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या विविध कर वसूली बाबत बोलताना निलंगा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सोपान अकेले म्हणाले की, कर वसूली मोहीम यापुढेही राबविण्यात येणार असून ग्रामस्थांनी त्यांच्याकडे असलेल्या विविध कराचा भरणा ग्रामपंचायतीकडे जमा करून त्यांच्या पावत्या घ्याव्यात. या वसुली मोहिमेला सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनीही सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.८ मार्च -**

पंचायत समिती निलंगा चे गटविकास अधिकारी सोपान अकेले यांच्या संकल्पनेतून मार्च अखेर जवळ येत असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांचा वसुलीमध्ये सहभाग असणे गरजेचे आहे. म्हणून एकाच दिवशी वसुली मोहीम हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. त्यामुळे गुरुवारी दि.७ मार्च रोजी तालुक्यातील ११६ ग्रामपंचायतीने एकाच दिवशी पंधरा लाख वीस हजार रुपये वसूल करून या रकमेचा भरणा शासन दरबारी जमा करण्यात आला आहे.

ग्रामीण भागामध्ये ग्राम पंचायतच्या विविध कर वसुलीसाठी वसुलीसाठी मोठी उदासीनता असते. विविध कागदपत्राची आवश्यकता भासल्यानंतरच नागरिक कर भरत असतात.

परंतु वेगवेगळ्या कर स्वरूपातील रक्कम त्यांच्या नावे तशीच वाढत असते. याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली गटविकास अधिकारी सोपान अकेले यांनी एकाच दिवशी तालुक्यातील ११६ ग्रामपंचायत मध्ये वसुलीची मोहीम राबवली. ग्रामस्थांना घरोघरी जाऊन ग्रामसेवक व लोकप्रतिनिधींनी वसुलीसाठी विनंती करीत वसुलीची विशेष मोहीम राबवून या मोहिमेत ११६ ग्रामपंचायत मधून एकाच दिवशी पंधरा लाख वीस हजार ४८८ रुपयाची वसुली करून ही वसुलीचा भरणा केला आहे.

त्यामुळे या विशेष मोहिमेचे सर्वत्र कौतुक केले जात असून सध्या मार्च महिना सुरू झाल्यामुळे वेगवेगळ्या विभागाकडून वसुलीसाठी तगादा सुरू असतो त्याचाच एक भाग म्हणून मार्च महिन्यात मार्च अखेरपर्यंत एकाच वेळी अतिरिक्त भार पडू नये म्हणून विशेष वसुली मोहीम राबवत अधिक प्रमाणात असलेल्या घराची वसुली केली आहे.

### लालबहादुर शास्त्री प्राथमिक शाळेची उद्यानास भेट व परीसर स्वच्छता

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.८ मार्च -**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित लालबहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दी वर्षानिमित्त 'प्रेक्षणीय स्थळास भेट व परीसर स्वच्छता' या उपक्रमाचे आयोजन अहिल्यादेवी होळकर उद्यानात केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन शालेय समिती अध्यक्ष व्यंकटराव गुरमे यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख अतिथी काशिनाथ रामराव शिंदे (उपनिरीक्षक, लातूर), नरेंद्र संजयराव मेडेवार (गटविकास अधिकारी, जळकोट), शंकरराव लासुणे (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, भा.शि.प्र.संस्था) यांच्या हस्ते झाले.

# शिऊर ते नदीवाडी पाणंद रस्त्यासाठी पुन्हा १७ मार्चपासून आमरण उपोषणाचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.८ मार्च -**

निलंगा तालुक्यातील शिऊर ते नदीवाडी हा दोन वर्षांपासून मंजूर असलेल्या पाणंद रस्ता होण्यासाठी शिऊरच्या शेतकऱ्यांनी निलंगा पंचायत समितीसमोर अनेकवेळा उपोषण केले. लेखी आश्वासन देऊनही रस्त्याचे काम झाले नाही. त्यामुळे लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले.

रस्त्याचे काम सुरु केल्याचे नाटक करण्यात आले. २८ फेब्रुवारी पर्यंत रस्ता करून देतो म्हणून आश्वासन देण्यात येऊन उपोषण सोडवण्यात आले. मात्र शिऊर ते नदीवाडी पाणंद रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आलेच नाही. त्यामुळे संपूर्ण रस्ता बांधकाम नीट करून द्यावे, या मागणीसाठी पुन्हा लातूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बी.डी. वाघ यांना

## शंभर मीटर पर्यंतचाच अर्धवट...

शेतकऱ्यांनी ५ मार्च रोजी निवेदन देऊन जर रस्ता झाला नाही तर पुन्हा १७ मार्च पासून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा एका निवेदनाद्वारे दिला आहे. सदर रस्त्याच्या कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधित गटविकास अधिकारी व ग्रामसेवकविरुद्ध कार्यवाही करावी. या रस्त्याच्या कामात राजकारण करणाऱ्या विरुद्ध कडक कार्यवाही करून सदरचा रस्ता तात्काळ करून देण्यात यावा. जोपर्यंत रस्त्याचे काम होणार नाही, तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहील, असा इशारा शेतकरी अरुण अष्टुरे, नामदेव तुगावे, शेषेराव बिरादार, दिलीप सूर्यवंशी, सरोजा अष्टुरे, वत्सलाबाई सूर्यवंशी, भरत सूर्यवंशी, सुशीलाबाई अष्टुरे, हिरकणबाई तुगावे, शिवराज अष्टुरे आदी शेतकऱ्यांनी दिला आहे.

# विद्यार्थ्यांना कलावंत होण्याची संधी स्नेहसंमेलनात मिळते : प्रा.डॉ. राजपंखे

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.८ मार्च -**

शिवनेरी महाविद्यालयात आयोजित केलेल्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी अंबाजोगाई येथील प्रसिद्ध गझलकार प्रा.डॉ. मुकुंद राजपंखे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांना कलावंत होण्याची संधी स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून मिळते. हे एक व्यासपीठ आहे, जिथे विद्यार्थ्यांना नृत्य, गीत आणि इतर कलागुण सादर करण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कलागुणांचा वापर करून इतरांना आनंद देण्याचे महत्त्व समजून काम केले पाहिजे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष प्रताप माने होते. उद्घाटक म्हणून प्रा.डॉ. मुकुंद राजपंखे उपस्थित होते. यावेळी पदमाकर मोगरगे, सुतेज माने, डॉ. अरुण धालगडे उपस्थित होते.

# अरविंद पाटील-निलंगेकर यांना विधान परिषदेवर घेण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.८ मार्च -**

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव अरविंद पाटील-निलंगेकर यांना महाराष्ट्र विधान परिषदेवर संधी देण्याची मागणी लातूर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांकडून जोरदारपणे केली जात आहे.

अरविंद पाटील-निलंगेकर यांनी भारतीय जनता पार्टीच्या बांधणीसाठी मोठे योगदान दिले असून, संपूर्ण महाराष्ट्रभर वाडी, तांडे, गावे, शहर, तालुका आणि जिल्हा पातळीवर पक्ष वाढवण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. लातूर जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीच्या कार्यास प्रोत्साहन देत, त्यांनी ग्रामपंचायत, नगरपंचायत, जिल्हा परिषद, महानगरपालिका यासारख्या विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भारतीय जनता पार्टीची स्थापना केली आहे.



लातूर जिल्ह्यात काँग्रेसच्या वर्चस्वाखाली असलेल्या अनेक संस्थांना भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात आणण्याचे कार्य त्यांनी केले आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रचारासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना प्रोत्साहन मिळाले आणि त्यांचा प्रभाव वाढला.

लातूर जिल्ह्याच्या विकासामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असताना, त्यांनी क्रीडा संकुल, राष्ट्रध्वज उभारणी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उभारणी आणि अन्य समाजिक कार्यातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आता, विधान परिषदेच्या काही जागांच्या मुदतीतून निवडी होणार आहेत आणि लातूर जिल्ह्याला एक जागा मिळाल्यामुळे, स्थानिक कार्यकर्त्यांच्या व सामाजिक संघटनांच्या वतीने मागणी केली जात आहे की, ही जागा अरविंद पाटील-निलंगेकर यांना दिली जावी.

या मागणीला भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि स्थानिक प्रमुखांचा पाठिंबा मिळाला आहे. त्यांचे म्हणणे आहे की अरविंद पाटील-निलंगेकर यांच्या संघटनात्मक कौशल्यामुळे लातूर जिल्ह्यातील आगामी निवडणुकांमध्ये पार्टीला मोठा फायदा होईल.

कार्यकर्त्यांनी पक्षाच्या नेत्यांकडे लातूर जिल्ह्याची जागा अरविंद निलंगेकर यांना दिल्यास, आगामी स्थानिक निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टीचे स्थान मजबूत होईल, अशी आशा व्यक्त केली आहे.